

ज्यूल व्हर्नची
अद्भुत सृष्टी
भा. रा. भागवत

कुमारांसाठी ज्यूल व्हर्न कादंबरी माला : २०

ज्यूल व्हर्नची अद्‌भुत सृष्टी

मूळ फ्रेंच लेखक ज्यूल व्हर्न
यांच्या कादंबरीचा संक्षिप्त अनुवाद

अनुवादक
भा. रा. भागवत

राजा प्रकाशन

प्रकाशक
सौ. शुभदा ज्ञानेश्वर मुळे.
२२५ / ३ पांडुरंग भुवन,
ले.ज. रोड, शिवाजीपार्क,
मुंबई : ४०० ०१६,
दुरध्वनी क्र : ४३० ०४ ०३.

प्रकाशन क्र : १४१

द्वितीयावृत्ती : ३१ मे १९९८

मुखपृष्ठ व आतील चित्र
अनिल दाभाडे

अक्षरजुळणी
अभिषेक टाइपसेटर्स
१२४३, सदाशिव पेठ,
पुणे : ४११ ०३०

मुद्रक
श्रीवेदविद्या मुद्रणालय
४०, बुधवार पेठ,
पुणे : ४११ ००२

मूल्य रुपये ५० /- फक्त

ISBN - 81 - 7424 - 041 - 1



''अशा चमत्कारिक स्थळांमधून
मला भटकावंसं वाटतं...
जिथे पसरली आहेत
ताडाची फताडी पानं.
जिथे उडत आहेत
हिरवे तांबडे पक्षी
जिथे वाढल्या आहेत उंच उंच
पिसांसारख्या वनस्पती.
अशा रम्य गूढ अरण्यांतून
रहस्यमय गुंफांमधून,
ज्या गुहांचे अंतर्भाग
अजून कोणी शोधलेले नाहीत,
जिथे आहेत गुप्त भुयारवाटा
आणि जिथून उठत आहेत
विचित्र पडसाद''
--बालवयातला ज्यूल व्हर्न

आणि मोठेपणी याहीपेक्षा विलक्षण
अशा ज्या मानससृष्टीतून तो हिंडला
ती ही अदभूत सृष्टी
ज्याची त्याला अर्पण

ओझरती ओळख

'कुमारांसाठी ज्यूल व्हर्न कादंबरीमाला' या मालेत आतापर्यंत ज्या कादंबरिका प्रसिध्द झाल्या त्यांपैकी अनुक्रमे झपाटलेला प्रवासी (Around The World in Eighty Days), साता समुद्राचा सुलतान (Twenty Thousand Leagues Under The Sea), पाताळलोकची अदभूत यात्रा (A Journey To the Centre of The Earth), बलून बहाद्दर (Five Weeks in A Balloon), चंद्रावर स्वारी (A Trib to the Moon & Round The Moon) कंपनी चालली सूर्याकडे आणि धूमकेतूच्या शेपटावर (Off On A Comet) या सर्वोत्तम कादंबऱ्यांची प्रस्तुत पुस्तकात एकत्र व ओझरती ओळख करून देत आहे.

फिलिअस फॉगच्या पैजेच्या प्रवासाने अनेकांना रोमांचित केले. 'न्यूयॉर्क वर्ल्ड' या अमेरिकन वृत्तपत्राच्या नेली ब्लाय नावाच्या स्त्री बातमीदाराच्या मनात आले की आपण फॉगपेक्षाही कमी वेळात जगप्रवास करावा. लगेच तिने आपल्या बॅगेत चार किरकोळ कपडे कोंबले अन् तडकाफडकी ती न्यूयॉर्कहून निघाली. पॅसिफिक महासागरातून जाताना तिची आगबोट वादळात सापडली. पण ती शूर मुलगी हताश न होता म्हणाली, 'मी वाटेत मेले

तरी बेहत्तर. पण माझं प्रेत वेळेवर पोचलं पाहिजे!' आणि फॉगच्या ८० दिवसांपेक्षाही आधी म्हणजे ७२ व्या दिवशीच तिने आपली पृथ्वीप्रदक्षिणा पुरी केली.

वैज्ञानिक प्रगतीची विस्मयजनक स्वप्ने पाहणाऱ्या या द्रष्ट्या लेखकाचे कौतुक करावे तेवढे थोडे होईल. त्याच्यानंतर 'झाले बहु, होतिल बहु, आहेतहि बहु' उदाहरणार्थ : एच्. जी. वेल्स, रे ब्रॅडबरी, आर्थर क्लार्क, सी. जे. ल्युविस. पण या विशिष्ट क्षेत्रातला श्रेष्ठ प्रणेता हे ज्यूल व्हर्नचे अग्रस्थान आजही कोणी हिरावून घेऊ शकलेला नाही.

विज्ञानकथांच्या या बादशहाला दिवंगत होऊन २४ मार्च १९६५ रोजी साठ वर्षे पूर्ण झाली. त्या निमित्ताने त्याच्या निवडक कथांचा हा संग्रह काढण्याची कल्पना माझ्या मनात आली. या संग्रहासाठी निवडलेली सहा पुस्तके मी स्वतः अनुवादित केलेली आहेत. त्यांतली चार भाषांतरित असून दोन 'पाताळलोकची अद्भुत यात्रा' व 'चंद्रावर स्वारी' ही मराठी साज चढवलेली रूपांतरे होत. 'ज्यूल व्हर्नची अद्भुत सृष्टीक्ष' मांडताना व्हर्नची मूळ पात्रे त्या त्या स्थळकाळासह ठेवणे योग्य हे लक्षात घेऊन मी वरील दोन्ही कादंबऱ्यांतल्या उताऱ्यांचा नव्याने अनुवाद केला आहे. आणखी एक पुस्तक मूळ नाव 'बलूनमधून पाच आठवडे' या कादंबरीच्या त्या कथानकाची दखील एक झलक या संग्रहात घातली आहे.

– भा. रा. भागवत

विज्ञानकथांचा बादशहा ज्यूल व्हर्न

ज्यूल व्हर्न * हे साहित्यसृष्टीतले एक रोमहर्षक नाव आहे यात संशय नाही. शंभर वर्षांपूर्वी फ्रेंच भाषेतून अद्‌भुत गोष्टी लिहिणाऱ्या या लेखकाने युरोप-अमेरिकेत अगदी अलीकडे नवे कुतूहल निर्माण केले. प्रो. पिकार्ड या धाडसी बेल्जियन संशोधकाने १९३२ साली बलूनमधून ५४, ४५० फूट (१०.५ मैल) उड्डाण केले आणि वातावरणातला पहिला उच्चांक प्रस्थापित केला. अमेरिकेत डॉ. गोडार्ड यांनी याच सुमाराला बंदुकीच्या तत्त्वाचा (प्रत्येक क्रियेला तेवढयाच जोराची प्रतिक्रिया असते) उपयोग करून पहिले यंत्रसज्ज रॉकेट आकाशात उडवले आणि कसलीही मोडतोड न होता ते पॅराशूटच्या साह्यायाने सुरक्षित खाली आणून दाखवले. पुढे यात सुधारणा करून व्हॅन ब्राऊनने आपले नवे रॉकेट तयार केले. पण याच्या कितीतरी अगोदर बोल्शेविक राज्यक्रांतीच्या सुमाराला रशियात झियोलूकोवूस्की या शास्त्रज्ञाने रॉकेटचे प्रयोग केले होते.

१९५७ साली रशियाने पहिले 'स्पुटनिक' अंतराळात सोडले आणि ते पृथ्वीभोवती घिरटया घालू लागले. त्यानंतर एकामागून एक अशा कितीतरी रशियन व अमेरिकन कृत्रिम उपग्रहांचे अंतराळात भ्रमण सुरू झाले. हा विलक्षण इतिहास घडत असता अंतराळ-प्रवासाकडे कल्पक लेखकांचे लक्ष गेल्यावाचून कसे राहील? अंतराळ-उड्डाणाच्या कथांना यापूर्वीच अमेरिकेत बहर आलेला होता. स्थळकाळाच्या ज्ञात मर्यादा उल्लंघून कल्पनेतले वीर या ग्रहावरून त्या ग्रहावर अन् या शतकातून त्या शतकात उडया मारू लागले होते. विज्ञान ही एक नवी जादू उपलब्ध झाली होती; तिच्या चमत्कारांना मुळी धरबंधच राहिला नव्हता. ललितकथांचा कल्पनाविलास अशा रीतीने अप्रतिहतपणे चालू असता कोणाला तरी एकदम आठवण झाली की विज्ञानालासुध्दा मर्यादा

---

* Jules Verne चा इंग्रजीला अनुसरून 'ज्यूल व्हर्न' असा उच्चार पुष्कळ जण करतात. वस्तुत: Jules मधल्या शेवटच्या अक्षराचा उच्चार फ्रेंच भाषेत होत नाही; आणि 'ज्यूल' मधल्या 'ल' चा जवळजवळ पूर्ण उच्चार होतो -संस्कृत 'बाल' प्रमाणे.)

असतात. चमत्कार हवेत, पण त्यांनासुध्दा शास्त्रीय संभाव्यतेचा भक्कम पाया हवा. प्रतिभेला नुसतेच भरकटू दिले तर ती चोखंदळ वाचकांचे समाधान करू शकणार नाही. आज ही पथ्ये पाळणारे लेखक थोडे असले तरी एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात फ्रान्समध्ये असा एक लेखक होऊन गेला की ज्याने अत्यंत चटकदार, चमत्कृतिपूर्ण पण वैज्ञानिक दृष्ट्या बिनचूक अशा कादंबऱ्या लिहिल्या. त्याचे नाव ज्यूल व्हर्न.

आणि त्याचे पुन्हा स्मरण होताच ज्यूल व्हर्नचे मध्यंतरी मागे पडलेले वाङ्.मय पुन्हा भराभर छापले जाऊ लागले. जगातल्या अनेक भाषांमधून त्याची भाषांतरे झाली. त्याच्या कथानकांवर-अर्थात् त्यांत स्वत:चा भरपूर मसाला घालून - नामवंत सिनेमा कंपन्यांनी उत्कृष्ट चित्रपट काढले. ज्यूल व्हर्नला नवी लोकप्रियता लाभली.

अशा या ज्यूल व्हर्नचा जन्म फ्रान्समधल्या नॉम्त गावी १८२८ साली झाला. ज्यूलचे आपल्या बापाशी कधी पटले नाही, तरी त्याला आपल्या घराण्याचा फार अभिमान होता. तो म्हणतो, ‘‘माझी वंशावळ चाळायला मी बसतो तेव्हा मला सेनानी, न्यायधुरंधर, कायदेपंडित अन् खलाशी भेटतात.’’ यांपैकी शेवटच्या जातीचे लोक त्याला फार आवडत. त्याच्या सबंध लिखाणातून समुद्राचे वारे वाहत आहेत असे वाटते. इतकेच नाही तर त्याच्या वडिलांच्या कायदेविषयक कागदपत्रांनासुध्दा समुद्राचा खारा वास यायचा. कारण त्यांनी लढवलेले बहुतेक खटले आयात-निर्यात मालाबाबत, गलबतांच्या विम्याबाबत किंवा खलाशांच्या तंटयांबाबत असायचे !

ज्यूल व्हर्नचे वडील विलक्षण कडक स्वभावाचे होते आणि घडयाळ हा त्यांचा आदर्श होता (फिलिअल फॉगप्रमाणे !). वयाच्या बाराव्या वर्षीसुध्दा ज्यूल व्हर्न लेख लिहीत असे. विनोदी बोलण्यात तो पटाईत होता, त्यामुळे त्याने एक शोकान्तिका लिहिली व आपल्या मित्रांना वाचून दाखवली तेव्हा ते खो खो हसत सुटले!

लहानपणीच तो एकदा घरून पळाला आणि एका आगबोटीवर कॅबिन बॉय म्हणून चढला. हिंदुस्थान-चीन-जपान हे देश त्याच्या दृष्टीपुढून तरळू

लागले. पण बोटीचा भोंगा होऊन ती आता बंदर सोडणार तोच धक्क्यावर उभी असलेली एक व्यक्ती पाहून ज्यूलच्या मनात भीतीचा गोळा उठला. ती व्यक्ती म्हणजे ज्यूल व्हर्नचे खुद्द वडील होते!

मान खाली घालून तो घराकडे परतला आणि त्याच वेळी त्याने आईजवळ शपथ वाहिली, ती अशी की 'यापुढे मी जे जे प्रवास करीन ते कल्पनेतच!'

आणि ती प्रतिज्ञा त्याने जन्मभर पाळली.

त्याच्या लेखणीने पृथ्वी, समुद्र, आकाश, पाताळ आणि अवकाश या सर्वांना गवसणी घातली. बलूनचा उपयोग हाताच्या बोटांवर मोजण्याइतके संशोधक नुकता कोठे करू लागले होते; ज्यूल व्हर्नने आपल्या धाडसी मानसपुत्रांना बलूनमध्ये बसवून आफ्रिकेच्या या किनाऱ्यापासून त्या किनाऱ्यापर्यंत नेले. इतकेच नाही तर अंतराळातून फिरवले! आज सांगितले तर खरे वाटणार नाही. पण ज्यूल व्हर्नच्या या पहिल्या वहिल्या पुस्तकाला प्रकाशक मिळेना म्हणून वैतागून त्याने हस्तलिखित चुलीत फेकले होते. सुदैवाने त्याच्या बायकोने ते वेळीच बाहेर काढले. आपल्या आततायीपणाची भरपाई म्हणून व्हर्नने ते दुसऱ्याच दिवशी आणखी एका प्रकाशकाकडे नेले आणि त्याने ते स्विकारले! या हेत्झेलनेच मग त्याची पुढली पुस्तकेपण प्रसिध्द केली. हवेपेक्षा जड वस्तू हवेतून उडू शकेल ही कल्पनासुध्दा ज्या काळी हास्यास्पद वाटत होती त्या काळी व्हर्नने आपल्या रोब्रर नामक कथानायकाला यांत्रिक वाहनात बसवून आकाशभर हिंडवले. पाणबुडीचा शोध उंबरठयावर असतानाच ज्यूल व्हर्नचा नायक कॅ. नेमो आपल्या अद्‌भुत पाणबुडीतून समुद्राच्या तळाशी हिंडला आणि जगाला सतावू लागला. रॉकेटशिवाय चंद्रावर जाणे अशक्य हे आज पटलेले आहे. असले रासायनिक इंधन वापरणारे रॉकेट ज्यूल व्हर्नच्या काळी कोणाच्या कल्पनेतही नव्हते. आणि तरी रॉकेटचे तत्त्व वापरून त्याने आपल्या प्रतिभेची तोफ ठासली अन् आपल्या तीन मानसपुत्रांना कुलपी गोळयात बसवून चंद्राकडे पाठवून दिले. एवढयाने समाधान न पावून त्याने पृथ्वीवर एक उत्पात घडवून आणला आणि सूर्यावर स्वारी (?) केली. हे अद्‌भुत प्रवास सुरू असतानाच तो जाता जाता विश्वकिरण, उल्का, धूमकेतू व तारे

यांच्या संबंधात बहुमोल माहिती आपल्या विज्ञानवेडया वाचकांना देत होता. पुढे आपली तीन साहसी मानवरत्ने त्याने एका ज्वालामुखीच्या विवरात फेकली आणि ती पृथ्वीच्या पोटातून हिंडत हिंडत तिच्या मध्याचा शोध घेऊन आली!

ज्यूल व्हर्नच्या या शेवटच्या कथेत काही ठिकाणी अतिरंजित वर्णने अन् शास्त्रीय सत्याचा अपलाप आढळतो हे खरे असले, तरी एकंदरीत त्याने शास्त्रीय सत्ये काटेकोरपणे पाळण्यासाठी अतोनात मेहनत घेतलेली आहे. भूगोल-खगोलविषयक टिपणांच्या त्याच्याकडे शंभर फायली होत्या असे म्हणतात! ज्यूल व्हर्नच्या कथासाहित्यातील नवलाई नि शास्त्रशुध्दता यांमुळेच त्याला अपूर्व लोकप्रियता लाभली-फ्रान्सप्रमाणे इंग्लंडमध्ये आणि इंग्लंडप्रमाणे अमेरिकेतसुध्दा. ८० दिवसांत पृथ्वीप्रदक्षिणा करणाऱ्या फिलिअस फॉगची नवलकथा इंग्रजीतून क्रमशः प्रसिध्द होत असताना नवे प्रकरण केव्हा येते म्हणून आतुर बनलेले अमेरिकेतले वाचक बंदरावर घिरटया घालीत. आपल्याला अधांतरी लोंबकळत ठेवल्याबद्दल ते कादंबरीकारावर चिडून त्याला धमक्या देत. फॉगच्या मागे डिटेक्टिव्ह फिक्स जेव्हा हात धुवून लागला, तेव्हा त्याच्या चोंबडेपणावर वाचक भयंकर खवळले. आता फॉगला हा पकडतो की काय अशी त्यांना भीती वाटू लागली. पॅसिफिक कंपनीच्या 'जनरल ग्रँट' बोटीत बसून त्याने याकोहामा सोडले तेव्हा पॅसिफिक महासागराच्या लाटांप्रमाणे वाचकांची हृदयेही खालीवर होऊ लागली. त्याच वेळी काही आगबोट कंपन्या पुढे सरसावल्या-ज्या बोटीतून हा झपाटलेला प्रवासी चाललेला आहे तिला आपल्या एखाद्या बोटीचे नाव दिले तर आपली केवढी जाहिरात होईल असे कल्पनातरंग त्यांच्या मनात उठले. पण ज्यूल व्हर्नने फिलिअस फॉगला कोणाच्याही बोटीत चढवले नाही. त्याने 'हेन्रिएटा' नामक मोडकळीला आलेली आगबोट निवडली आणि तिचीही आपल्या कथानायकाच्या हस्ते वाटेतच होळी पेटवून दिली! का ? तर आगबोटीला सर्पण हवे होते म्हणनू.

पुढे पुढे तर कमालच झाली. फिलिअस फॉगच्या या अचाट प्रवासाचे नाटक करून एका धाडसी दिग्दर्शकाने लंडनच्या रंगभूमीवर आणले. फॉगने हिंदुस्थानात पाहिलेले सती-प्रकरण त्याने हुबेहूब स्टेजवर उभे केले इतकेच

[illegible] हत्तीला स्टेजवरून फिरवले. त्या हत्तीला [illegible] गर्दी उडू लागली, तेव्हा ज्यूल व्हर्नने [illegible] 'तोबा तोबा' केले असल्यास नवल नाही.

फिलिआस फॉगच्या पैजेच्या प्रवासाने अनेकांना रोमांचित केले. 'न्यूयॉर्क वर्ल्ड' या अमेरिकन वृत्तपत्राच्या नेली ब्लाय नावाच्या स्त्री बातमीदाराच्या मनात आले की आपण फॉगपेक्षाही कमी वेळात जगप्रवास करावा. लगेच तिने आपल्या बॅगेत चार निरनिराळे कपडे कोंबले अन् तडकाफडकी ती न्यूयॉर्कहून निघाली. पॅसिफिक महासागरातून जाताना तिची आगबोट वादळात सापडली. पण ती शूर मुलगी हताश न होता म्हणाली, "मी वाटेत मेले तरी बेहत्तर. पण माझं प्रेत वेळेवर पोचलं पाहिजे!" आणि फॉगच्या ८० दिवसांपेक्षाही आधी, म्हणजे ७२ व्या दिवशीच तिने आपली पृथ्वीप्रदक्षिणा पुरी केली.

वैज्ञानिक प्रगतीची विस्मयजनक स्वप्ने पाहणाऱ्या या द्रष्टया लेखकाचे कौतुक करावे तेवढे थोडे होईल. त्याच्यानंतर 'झाले बहु, होतिल बहु, आहेतहि बहु-' उदाहरणार्थ; एच्. जी वेल्स, रे ब्रॅडबरी, आर्थर क्लार्क, सी. जे. ल्युविस. पण या विशिष्ट क्षेत्रातला श्रेष्ठ प्रणेता हे ज्यूल व्हर्नचे अग्रस्थान आजही कोणी हिरावून घेऊ शकत नाही.

विज्ञानकथांच्या या बादशहाला दिवंगत होऊन २४ मार्च १९६५ रोजी साठ वर्षे पूर्ण झाली. त्या निमित्ताने त्याच्या निवडक कथांचा हा संग्रह काढण्याची कल्पना माझ्या मनात आली. या संग्रहासाठी निवडलेली सहा पुस्तके मी स्वत: अनुवादित केलेली आहेत. त्यांतली चार भाषान्तरित असून दोन 'पाताळलोकची अद्भुत यात्रा' व 'चंद्रावर स्वारी' ही मराठी साज चढवलेली रूपान्तरे होत. 'ज्यूल व्हर्नची अद्भुत सृष्टी' मांडताना व्हर्नची मूळ पात्रे त्या त्या स्थळकाळासह ठेवणे योग्य हे लक्षात येऊन मी वरील दोन्ही कादंबऱ्यांतल्या उताऱ्यांचा नव्याने अनुवाद केला आहे. सातवे पुस्तक 'बलून-प्रवास' कै. वि. वा. हडप यांनी मराठीत आणले होते; तेही रूपान्तरित होते. त्यामुळे 'बलूनमधून पाच आठवडे' या कथेतल्या प्रकरणाचे मी नवीन भाषान्तर केले.

भा. रा. भागवत



फिलीअस फॉगचा झपाटा !

काळ आहे शंभर वर्षांपूर्वीचा आणि गोष्ट आहे फिलिअस फॉग नावाच्या चमत्कारिक माणसाची. जितका चमत्कारिक तितकाच दिलदार आणि जितका दिलदार तितकाच धाडसी.

पण त्याचा सर्वात मोठा गुणविशेष म्हणजे तो घड्याळाप्रमाणे चालणारा होता. लंडनच्या एका छोटेखानी घरात तोएकटाच राहत असे. त्याचा एकमेव उद्योग म्हणजे वर्तमानपत्रांचे वाचन. सकाळी साडेसात वाजता तो उठे तेव्हापासून ते साडेअकरा वाजता रिफॉर्म क्लबात जाण्यासाठी तो घराबाहेर पडे तोपर्यंत त्याचा प्रत्येक कार्यक्रम टिपल्याप्रमाणे पार पडे. सात वाजून तीन मिनिटांनी चहा व टोस्ट हजर करण्याचा त्याच्या नोकराला हुकूम होता. नऊ वाजून त्रेपन्न मिनिटांनी त्याला हजामतीचे पाणी लागे. कोंबट पण जास्त गरम

नाही. किती डिग्री उष्ण ते ठरलेले ! नंतर पावणेदहा वाजेपर्यंत साहेबांचे स्नान, केस विंचरणे वगैरे चाले. जेवणाचा 'मेनू' ठरलेला. सोमवारी कोणती कोशिंबीर, मंगळवारी कोणती भाजी, साऱ्याचे वेळापत्रक स्वयंपाकघरातल्या भिंतीवर लटकलेले असे. भोजनपात्रांच्या नि काट्या-चमच्यांच्या जागा ठरलेल्या. त्यात इकडेच तिकडे झाले तर तो गुन्हा गणला जाई. रात्री बरोबर बारा वाजता साहेब झोपत.

फिलिअस फॉगची ही रोजनिशी व्यवस्थितीतपणे पार पडावी म्हणून जपणारा एक मजेदार इमानी नोकरही त्यांना लाभलेला होता. त्याचे नाव पासपार्तू. 'पासपार्तू' म्हणजे 'पासपोर्ट' - कुठेही जाण्याचा परवाना ! त्याचे हे नाव पुढे सार्थ ठरले. कारण आपल्या मालकाच्या बरोबर त्याची जगभर धिंड निघाली !

एक दिवस रिफॉर्म क्लबात वृत्तपत्रे चाळीत असता फिलिअस फॉगला एक बातमी कळली. 'बँक ऑफ इंग्लंड' वर धाडसी दरोडा पडला होता. पंचावन्न हजार पौंडाची रक्कम कोणीतरी हातोहात लांबवली होती.

या दरोड्यावर क्लबात गरमागरम चर्चा झाली. कोणीतरी म्हणाले, 'स्कॉटलंड यार्डचे गुप्तपोलीस चोराला तेव्हाच शोधून काढतील !'

दुसरा कोणीतरी म्हणाला, 'मला नाही वाटत तसं ! चोराला लपायला जागा काय थोड्या आहेत ? आपली पृथ्वी चिकार मोठी आहे !'

यावर फॉगने हळूच म्हटले, 'एके काळी मोठी होती. आता नाही. आगगाड्या, आगबोटी* नि तारायंत्र यामुळे आता दळणवळण सुलभ झालं आहे. शंभर वर्षांपूर्वी जगाभोवती चक्कर मारायला जेवढा वेळ लागे त्याच्या एक दशांशही वेळ आता लागत नाही. आज ऐंशी दिवसात पृथ्वीप्रदक्षिणा करता येते.'

'ऐंशी दिवसात ? इतका बरोब्बर हिशेब कसा केलात तुम्ही ?'

---

* विमाने मात्र त्या काळात नव्हती.

आपण हिशेब कसा केला ते फिलिअस फॉगने वेळापत्रक काढून दाखवले. तो म्हणाला, 'जवळ पैसे भरपूर असले अन् आपण घड्याळाप्रमाणे चाललो तर यात चूक होणं शक्य नाही. मी तरी पैजेवर ऐंशी दिवसात पृथ्वीप्रदक्षिणा करीन!'

त्याचे ते शब्द त्याच्या श्रीमंत मित्रांनी झेलले. फिलिअस फॉगने आपली सारी श्रीमंती पणाला लावली आणि तो त्याच पावली जगाच्या प्रवासाला निघाला. बरोबर त्याचा मित्र पासपार्तू, हातात एक जुजबी कपड्यांची बॅग आणि खिशात एक नोटांचे लठ्ठ पुडके!

त्याचा सुरवातीचा प्रवास बिनबोभाट पार पडला. नव्हे -- पॅरिस, ब्रिंडिसी, सुएज करीत याची 'मंगोलिया' बोट मुंबई बंदरात दाखल झाली ती ठरल्यापेक्षा दोन दिवस अगोदर!

कलकत्ता मेल रात्री आठ वाजता सुटायची. त्याच्या आत बोरीबंदर स्टेशनवर हजर राहायला पासपार्तूला बजावून त्याने त्याला काही किरकोळ खरेदीसाठी पाठवले आणि स्वत: आपला पासपोर्ट घेऊन कस्टम्स कचेरीत गेला.

फिलिअस फॉग खुषीत होता. पण आपल्या मागे कोणते संकट लागले आहे याची त्याला कल्पना नव्हती. एक विलक्षण प्रकार दरम्यान घडला होता.

लंडनहून तो खूप खूप पैसे घेऊन घाईघाईने निघाला अन् वाटेत त्याने लागतील तसे पैसे उधळले. यामुळे लंडनच्या गुप्त पोलीस खात्याला त्याच्याबद्दल संशय उत्पन्न झाला होता. 'बँक ऑफ इंग्लंड' वर पडलेल्या दरोड्याशी त्यांनी त्याचा संबंध जोडून टाकला आणि लगेच फिक्स नावाच्या डिटेक्टिव्हला त्याच्यामागे धाडून दिले. फिक्सची लवकरच खात्री झाली की फिलिअस फॉग हाच तो धाडसी दरोडेखोर आहे. पण त्याला पकडायचे कसे? लंडनहून वॉरंट आलेले नव्हते आणि ते येण्याची तो वाट पाहत होता.

फिलिअस फॉगला पत्ताही नव्हता की हा फिक्स सावलीसारखा आपल्या

मागे हिंडतो आहे आणि आपण मुंबईत उतरलो त्याच वेळी तोही मुंबईत उतरला आहे!

फिक्सने उतरल्याबरोबर पोलीस कमिशनरची गाठ घेतली आणि दरोड्याबद्दलची हकीगत त्याला सांगून लंडनहून वॉरंट काढण्यात आले आहे की नाही म्हणून चौकशी केली.

वॉरंट आलेले नव्हते. फॉग लंडनहून निघाल्यानंतर वॉरंट काढण्यात आले होते. ते अद्याप मुंबईत दाखल होणे अशक्य होते.

'तुम्ही आपल्या जबाबदारीवर नाही का त्याला अटक करू शकत?'

पोलीस कमिशनरने तसे करायला साफ नकार दिला.

फिक्स खट्टू झाला. पण वॉरंट हातात पडेपर्यंत थांबण्याखेरीज इलाज नव्हता. दरम्यान 'चोरा'वर पक्की देखरेख ठेवायचे मात्र त्याने मनाशी ठरवले होते.

'आपला पासपार्तू आहेच' तो मनाशी पुटपुटला.

पण पासपार्तू त्यावेळी काय करीत होता?

त्याने फारच बहार केली. मालकाने सांगितलेली खरेदी पुरी झाल्यावर त्याने पाहिले तो अजून कितीतरी वेळ शिल्लक होता. तेव्हा जिवाची मुंबई करावी म्हणून तो ट्रॅममध्ये बसून भटकला. मग एका मिरवणुकीत सामील झाला. त्या दिवशी कसला तरी पारशी सण होता आणि ती पारश्यांचीच मिरवणूक होती. तिच्याबरोबरच एक - दोन करीत हे बुवाजी थेट मलबार हिलवर जाऊन पोचले. तिथे बाबुलनाथाच्या देवळाचा सुंदर नक्षीदार कळस पाहून त्याची कलासक्ती उसळून आली आणि देवळाचा अंतर्भागही नीट पाहावा म्हणून तो सरळ आत घुसला. या बुवाजींच्या पायात बूट होते. तो तसाच आत घुसलेला पाहून मंदिराच्या पुजाऱ्यांना संताप आला. 'गोरा साहेब झाला म्हणून काय झालं? असली माजोरी कोण सहन करील?' असे बडबडत त्यांनी एकदम त्याच्यावर हल्ला केला. त्याचे बूट मोजे हिसकून काढले आणि

त्याला यथास्थित बुकलले.

बिचाऱ्या पासपार्तूला हिंदूंच्या चालरीती माहीत नव्हत्या. नाहीतर तो देवळापासून चार पावले दूर राहिला असता किंवा अनवाणी आत गेला असता. आपल्यावर 'निष्कारण' हल्ला झालेला पाहून खवळून त्यानेही चार ठोसे लगवले. शेवटी हार खाऊन तो पळत सुटला.

त्याने धापा टाकीत बोरीबंदर गाठले तेव्हा आठला पाच मिनिटे कमी होती. त्याने खरेदी केलेल्या सामानाचे पुडके तर गहाळ झाले होतेच पण त्याच्या मोज्यांचा व बुटांचा पत्ता नव्हता. त्याची हॅटही कुठेतरी उडून गेली होती.

भिरभिरत्या नजरेने त्याने पाहिले तो कलकत्ता मेल स्टेशनात उभी होती आणि फॉगसाहेब एका फर्स्ट क्लासच्या डब्यात शिरत होते.

धावत धावत जाऊन पासपार्तूने आपल्या साहेबांना घडलेली सगळी हकीकत सांगितली आणि त्यांची क्षमा मागितली.

'पुन्हा असं करू नकोस' एवढे बोलून मि. फॉग आपल्या सीटवर बसले आणि पासपार्तूही त्याच डब्यात त्यांच्याच समोर बसला.

हा सर्व प्रकार गुप्त पोलीस फिक्स याने अगदी जवळून पाहिला व ऐकला. त्याने यांना कलकत्त्यापर्यंतची सोबत करण्याचे ठरवले होते, पण एकाएकी दुसरीच एक कल्पना त्याच्या डोक्यात आली.

'बस्स. आपण इथेच राहावं हे उत्तम.' तो स्वत:शी म्हणाला. 'हिंदुस्थानच्या हद्दीत गुन्हा घडलेला आहे. माझा माणूस कसा पकडायचा ते आता बरोबर समजलं मला.'

इकडे गाडीने कर्कश शीळ वाजवून बोरीबंदर सोडले.

- २ -

कलकत्ता मेलच्या त्याच डब्यात तिसरा एक प्रवासी होता. त्याचे नाव

ब्रिगेडियर जनरल सर फ्रान्सिस क्रोमार्टी. बनारसला आपल्या लष्करी हुद्द्यावर रुजू होण्यासाठी हे गृहस्थ चालले होते. त्यांची आणि फॉगसाहेबांची चांगलीच गट्टी जमली.

हिंदुस्थानातली शहरे आपल्या माहितीची आहेतच, तेव्हा या प्रवासाची विस्तृत हकीकत काही द्यायला नको. कसाऱ्याचा घाट, नाशिक, भुसावळ करीत करीत गाडी दुसऱ्या दिवशी साडेबारा वाजता बऱ्हाणपूरला पोचली. इथे पासपार्तूने नकली मोती जडवलेला एक फक्कड चढाव खरेदी केला. तो पायात घातल्यावर स्वारी बरीच खुषीत आलेली दिसली.

दुसऱ्या दिवशी एक गंमत झाली. ब्रिगेडियरनी पासपार्तूला किती वाजले म्हणून विचारले. तो म्हणाला, 'तीन.' वास्तविक संध्याकाळचे सात वाजले होते. आपण जसजसे पूर्वेला जाऊ तसतसा सूर्य लवकर उगवतो. त्यामुळे दिवस लवकर सुरू होतो. डोक्यावर सूर्य आला की बारा वाजले, ही कुठेही झाले तरी घड्याळ लावण्याची ठरलेली पद्धत आहे. तिला धरून घड्याळ लावायचे म्हणजे देशोदेशींच्या वेळात फरक असायचाच. पासपार्तूचे घड्याळ अजून लंडनचीच वेळ दाखवीत होते. हे सगळे शास्त्र ब्रिगेडियरनी त्याला समजावून सांगितले. त्याला समजले किंवा नाही हे कुणास ठाऊक, पण त्या पठ्ठ्याने आपल्या घड्याळात फरक करण्याचे साफ नाकारले एवढे खरे!

दुसऱ्या दिवशी सकाळी आठ वाजता दाट जंगलात गाडी एकाएकी उभी राहिली. सभोवार बरेच बैठे बंगले व कामगारांच्या राहुट्या होत्या. गार्डने घोषणा केली, 'सर्वांनी इथे उतरावे.'

'म्हणजे काय?' सर फ्रान्सिसनी कपाळावर आठ्या चढवल्या.

'हे नानकीपूर गाव. याच्यापुढे रेल्वे रस्ता अजून केलेला नाही. काम चालू आहे.'

'मग वर्तमानपत्रात छापून आलंय ते काय?'

'वर्तमानपत्रांबद्दल आम्ही जबाबदार नाही, साहेब. अजून मधला पन्नास

मैलांचा रस्ता पुरा व्हायचा आहे. कंपनी थेटपर्यंतची तिकिटं देते खरी, पण मधला हा पन्नास मैलांचा प्रवास उतारूंनी आपापल्या जबाबदारीवर करायचा हे गृहीत धरलेलं असतं.'

बाकीच्या बहुतेक उतारूंनी ते गृहीत धरलेले होतेच. कारण उतरल्याबरोबर ज्याने त्याने गाडी, घोडा असे काही ना काही वाहन मिळवून स्वत:ची सोय पाहिली होती. आमच्या या त्रयीने जेव्हा जवळच्या खेड्यात चौकशी केली तेव्हा त्यांना असे आढळले की आपल्या वाट्याला गाडी - घोडा तर राहोच, पण पालखी - मेणा, तट्टू, रेडा, गाढव किंवा बैलसुद्धा उरलेला नाही. करायचा कसा अलाहाबादपर्यंतचा प्रवास ?

फिलिअस फॉग कच खाणारा गडी नव्हता. तो म्हणाला, 'मी पायी जातो.'

ते ऐकल्याबरोबर पासपार्तूच्या अंगावर शहारे आले. त्याने केविलवाण्या दृष्टीने आपल्या पायांतल्या सुंदर चढावांकडे पाहिले. मग त्याने नव्या दमाने गावात चौकशी केली आणि मालकाला येऊन सांगितले की गावात एक हत्ती मिळण्यासारखा आहे.

'कुठे आहे ? चल, चल.'

एका दरिद्री झोपडीत या हत्तीचा मालक राहत होता आणि स्वत: हत्ती बाहेर एका झाडाखाली बांधलेला होता.

फॉगने लगेच त्याची भाड्याने मागणी केली. पण हत्तीवाला हत्ती द्यायला मुळीच तयार होईना. भाड्याची रक्कम पाच पौंडापासून चाळीस पौंडापर्यंत वाढवली तरी त्याचा हट्ट आपला कायमच.

त्याच्या त्या मूर्ख हेक्याकडे दुर्लक्ष करून यत्किंचित न चिडता किंवा चेहऱ्यावर कसलाही विकार न दाखवता फिलिअस फॉग म्हणाला, 'हत्ती विकत देतोस ? तुला एक हजार पौंड म्हणजे दहा हजार रुपये देईन.'

पण तरीही हत्तीवाला तयार होईना ! त्या धूर्त माणसाने या बुवाजीची नड

बरोबर जोखली असावी. आपल्या मालकाच्या आचरटपणामुळे बिचारा पासपार्तू मात्र अगदी स्तंभित झाला होता.

सर फ्रॅन्सिसनीही फॉगला एकीकडे नेले आणि म्हटले, 'तुम्ही काय करता आहा हे?'

'काही नाही' फॉग म्हणाला. 'मला एवढंच माहीत आहे की वीस हजार पौंडाची पैज जिंकायला ही रक्कम काही भारी नाही.' त्याने बाराशे, चौदाशे, सोळाशे असा क्रमाक्रमाने आकडा वाढवीत शेवटी दोन हजारांना नेऊन भिडवला. काय असेल तो असो, हत्तीवाल्यानेही मग आपला हट्ट सोडला आणि फॉगने दिलेले दोन हजार पौंड अर्थात २० हजार रुपयांच्या नोटा कुडत्याच्या खिशात घालीत हत्ती त्यांच्या स्वाधीन केला.

पासपार्तू चक्क बोंब मारीत म्हणाला, 'दोन हजार पौंडांचा हत्ती! मेलो ग आई! ठार झालो!'

हत्ती घेतला, आता एखादा वाटाड्या हवा होता. तो मिळायला विशेष अडचण पडली नाही. एका चुणचुणीत पारश्याला मोठे बक्षीस देऊ केल्यावर तो यायला तयार झाला.

लगेच हत्तीचा साजशृंगार करण्यात आला. वाटाड्याने हत्तीच्या पाठीवर गादी, अंबारी वगैरेंची सर्व व्यवस्था नीट केली. सर फ्रान्सिस क्रोमार्टीनाही फॉगने एक सीट देऊ केली आणि त्यांनी आनंदाने तिचा स्वीकार केला. मग तिघेही प्रवासी अंबारीत चढून बसले. पासपार्तूला दोघांच्या मध्ये जरा अवघडून बसावे लागले. पारशी वाटाड्या हत्तीच्या मानेवर म्हणजे माहुताच्या जागी बसला आणि सुमारे नऊ वाजता गजराजांनी प्रवासाला सुरुवात केली.

संध्याकाळपर्यंत पंचवीस मैल वाटचाल केल्यानंतर ते थांबले.

रात्रीचा प्रवास धोक्याचा असल्यामुळे त्यांनी एका पठारावर मुक्काम केला आणि सकाळी सहा वाजता उठून पुन्हा वाटचालीला सुरुवात केली. त्यांच्या वाटाड्याच्या मनातून संध्याकाळपर्यंत अलाहाबाद गाठायचे होते. तसे करता

आले असते तर फिलिअस फॉगच्या राखीव ४८ तासांपैकी फारच थोडे तास खर्च झाले असते.

पण तसे होणार नव्हते. चारच्या सुमाराला एक भलतीच अडचण उपस्थित झाली.

सुरळीत चाललेला हत्ती एकाएकी अस्वस्थ झाला आणि अकस्मात एका जागी उभा राहिला. तो हलेचना.

'काय झालं बुवा?' सर फ्रान्सिस उद्गारले.

'काही कल्पना नाही' असे म्हणून वाटाड्याने खाली उडी मारली. तो जरा पुढे जाऊन कानोसा घेऊन आला.

'सती येते आहे' त्याने वर्दी दिली.

सती म्हणजे काय हे तुम्हाआम्हाला माहीत आहे. पण या पाश्चात्य मंडळींना ते सर्वच कोडे असल्यामुळे वाटाड्याला सर्व खुलासेवार सांगावे लागले. त्याकाळी सतीची चाल आपल्याकडे बंद झालेली नव्हती. नवरा मेल्यावर त्याच्या विधवा स्त्रीने .चितेवर उडी घेऊन स्वत:ही मरण पत्करणे म्हणजे सती. ही चाल क्रूरपणाची असली तरी आपल्याकडच्या बऱ्याच स्त्रिया ती स्वेच्छेने पत्करीत. नवऱ्याबद्दलचे प्रेम व्यक्त करण्याचा तो एक मार्ग होता. पण हा मार्ग केव्हाही अतिरेकाचा, हट्टी आणि मूर्खपणाचाच म्हटला पाहिजे. कोणाही स्त्रीला जबरदस्तीने कोणी सती जायला सांगत नसे हे खरे असले, तरी एकदा ही चाल रूढ झाली म्हणजे बऱ्याच बायकांच्या मनावर दडपण येत असेल आणि त्या थोड्याफार भीतीनेदेखील सती जायला तयार होत असतील. पण निग्रहाने पतिप्रेमामुळे मरण कवटाळणाऱ्या बायकांची कीव वाटली तरी त्यांचा उद्देश लक्षात घेऊन या पद्धतीची उठल्यासुटल्या टर उडवणेही बरोबर नाही.

हे सर्व त्या पारश्याने बरोबरच्या मंडळींना समजावून सांगितले. तेवढ्यात सतीची मिरवणूक जवळ आलीच.

युरोपियन लोकांना चमत्कारिक वाटावी अशीच ती मिरवणूक होती. पहिल्याने ताशे, तुताऱ्या, शंख, भेरी वाजवणारे वाजंत्री आले. मग अंगाला भस्म नि गंध फासलेले व डोक्याला जरीचे रुमाल गुंडाळलेले उपाध्ये आले. तोंडाने ते सारखे कसले तरी मंत्र बडबडीत होते. मागोमाग कालीमातेची पालखी आली. गळ्यात रुंडमाला घातलेली आणि पायांखाली राक्षसाला तुडवणारी ती चार हातांची मूर्ती पाहून पासपार्तू तर घाबरूनच गेला. पालखीच्या मागे एक तरुण स्त्री चालली होती किंवा तिला दोघा पुजाऱ्यांनी दोन बाजूंनी धरून चालवले होते म्हटले तरी चालेल. तिच्या मागोमाग चौघांनी खांद्यावर घेतलेली एक तिरडी येत होती. तिरडीपुढे एकजण मडके धरून चालला होता आणि मडक्यातून निघणाऱ्या उग्र दर्पाने वातावरण भरून जात होते.

तिरडीवर बांधलेले प्रेत श्रीमंती कपड्यता गुंडाळलेले असले तरी म्हाताऱ्या माणसाचे होते.

सर फ्रान्सिस आश्चर्याने म्हणाले, 'सती जाणाऱ्या स्त्रिया आपखुषीने जीवदान देतात हे खरं असलं तरी असल्या म्हाताऱ्या नवऱ्यासाठी या पोरीने जीव द्यायला निघावं हे किती वाईट, नाही?'

पारशी वाटाड्या बारीक नजरेने सगळा प्रकार पाहत होता. त्याने शेवटी सांगितले, 'साहेब, हा आपखुषीचा प्रकार नाही. ही आजची सती म्हणजे जुलूमजबरदस्ती आहे.'

ते कसं काय?'

'या मुलीची हकीगत आसपासच्या गावात सर्वांना माहीत झालेली आहे. जगात चांगल्यांबरोबर वाईट लोकही असतात. सतीच्या चालीचा गैरफायदा घेणारे दुष्ट काही कमी नाहीत. केवळ पैशासाठी मुलीचं लग्न त्या म्हाताऱ्याशी लावण्यात आलं. आता तिचा पैसा मिळवण्यासाठी तिला जाळून हे लोक मोकळे होणार आहेत. ती स्वतः सती जायला मुळीच तयार नव्हती.'

'मग ती धडपड का नाही करीत मुळीच?'

'उपयोग काय धडपडीचा? शिवाय तिला भांग पाजलेली आहे. त्यामुळे ती शुद्धीवरदेखील नाही.'

'तिला सती केव्हा देणार आहेत?'

'उद्या सूर्योदयाच्या वेळी. इथून दोन मैलांवर एक देऊळ आहे तिथे नदीच्या काठावर.'

फिलिअस फॉगने एक अमूल्य मिनिट विचार करण्यात घालवले. मग तो फ्रान्सिस क्रोमार्टीकडे वळून म्हणाला, 'ब्रिगेडियरसाहेब, या पोरीला वाचवूया आपण?'

'म्हणता काय, मि. फॉग?'

'त्यात काय झालं? अजून बारा तास माझ्या शिलकीत आहेत. मग हे सत्कृत्य केलेलं काय वाईट?'

सर फ्रान्सिस आवेगभराने म्हणाले, 'मि. फॉग, तुमचं हृदय अगदी योग्य जागेवर दिसतं.'

फॉग घड्याळाकडे पाहात म्हणाला, 'होय. कारण मला सध्या भरपूर वेळ आहे.'

- ३ -

लगेच त्याने आपल्या मित्रांबरोबर काही मनसुबे केले आणि ती प्रेतयात्रा निघून गेल्यावर थोड्याच वेळाने ही मंडळी पुन्हा हत्तीवर बसून त्याच दिशेने जाऊ लागली.

अर्ध्या तासात त्यांनी ते देऊळ गाठले. देवळाभोवती दाट झाडी होती. त्यामुळे तिथे काय चालले आहे ते त्यांना नीट दिसेना. तेव्हा रात्र पडेपर्यंत त्यांनी वाट पाहिली.

काळोख होताच त्यांनी बघितले तो मशाली घेतलेल्या सशस्त्र लोकांनी देवळाला गराडा घातलेला. देवळात पुजाऱ्यांचा काहीतरी मंत्रघोष चालू होता आणि नदीकाठावर चिता रचलेली होती. पहाटेपर्यंत मंत्रपठण चालून सूर्य उगवताक्षणी चितेला भडाग्नी देण्याचा त्यांचा विचार होता. त्याचवेळी तो सतीचा यज्ञही पार पाहणार होता. देवळाच्या अंतर्भागात कुठल्या तरी कोपऱ्यात ती पोरगी रडत बसली असावी. तिचा या बाहेरच्या मंडळींना कुठून पत्ता लागणार?

पण बाहेर दिसणाऱ्या या एकूण एक गोष्टी पासपार्तूने चोरून पाहिल्या. आपल्या साथीदारांना सोडून तो एकटाच एका उंच वृक्षाच्या शेंड्यावर चढला होता आणि त्याच्या दाट पर्णराजीतून किलकिल्या दृष्टीने खालचा प्रकार पाहात होता.

पाहता पाहता त्याच्या डोक्यात एक अजब कल्पना आली. ती त्याला इतकी आवडली की त्याने आपल्याशीच एक टाळी वाजवली. लगेच पारंब्यांना धरून लोंबकळत तो हलकेच खाली उतरला.

हळूहळू रात्र सरत आली. पूर्व दिशेला तांबूस छटा दिसू लागल्या. मंत्रोच्चारांना दुप्पट जोर आला. त्यात आणखी वाजंत्रीची भर पडली. पुजाऱ्यांची ये-जा सुरू झाली. जवळपासच्या गावातले लोक नेहमीप्रमाणे जमा झाले. सूर्य उगवायच्या जरा आधीच हा सगळा मेळावा मिरवत मिरवत नदीकाठावर गेला. बरोबर तिरडी होतीच. ती मोठ्या सन्मानपूर्वक चितेवर ठेवण्यात आली. त्याच तिरडीवर सतीला जबरदस्तीने निजवण्यात आले. मग रात्री विश्रांती घेऊन सकाळी तिला उपाध्येबुवांनी विधिपूर्वक अग्नी दिला.

चिता धडधडून पेटली. पण त्याच क्षणी दुसरा एक चमत्कार झाला. जमलेले लोक डोळे चोळून पाहतच राहिले. ते डोळे चोळीत होते कारण चितेचा धूर त्यांच्या डोळ्यांत गेला होता म्हणून नव्हे! एक अगदीच अनपेक्षित प्रकार घडला होता. प्रेत उठून बसले होते! . . . भूत!

बसले तरी कुठले ? त्याने ताडदिशी चितेबाहेर उडीच मारली आणि मग बाजूच्या रानात ते पळाले. मिनिटभराने भूत पुन्हा बाहेर पडले ते एका तरुण मुलीला खांद्यावर टाकून !

हा अद्भुत चमत्कार पाहिल्याबरोबर सर्वांच्या तोंडचे पाणीच पळाले यात नवल काय ? सर्व मंडळी इतकी घाबरून गेली की त्यांना काय करावे ते सुचेना. जमिनीला खिळल्यासारखे सर्वजण उभे राहिले. बोबडी वळल्यामुळे कोणाच्या तोंडून शब्दसुद्धा फुटेना.

फिलिअस फॉग आणि सर फ्रान्सिस क्रोमार्टी एका बाजूस उभे राहून हा प्रकार पाहत होते. त्यांनाही याचा काही उलगडा होईना. ते जिवंत प्रेत जेव्हा त्या मुलीसह त्यांच्याच दिशेने धावत आले तेव्हा तर त्यांच्या गोंधळात आणखीच भर पडली.

'एक क्षणभरही थांबून उपयोग नाही. चला - पळ काढा !...' ते भूत आपल्या खांद्यावरचे ओझे उतरवून म्हणाले.

तो पासपार्तू होता ! त्याने रचलेला व्यूह जेव्हा या मंडळींच्या लक्षात आला, तेव्हा त्यांच्या विस्मयाला पारावार राहिला नाही.

पण आता जास्त वेळ न घालवता तिघेही परत हत्तीवर स्वार झाले. त्या बेशुद्ध मुलीलाही त्यांनी सांभाळून वर घेतले आणि हत्ती पिटाळला !

इकडे त्यांचे कारस्थान लवकरच पुजाऱ्यांच्या लक्षात आले. झालेला प्रकार भुताटकीचा नसून या 'बदमाष' माणसांची ती कारवाई होती हे त्यांनी ओळखले. ताबडतोब त्यांनी यांचा पाठलाग सुरू केला.

पण त्यांना हत्तीला गाठता आले नाही. त्या चतुर प्राण्याला एकंदर परिस्थिती कळली होती की काय कुणास ठाऊक ! पण तो आता दुप्पट जोराने धावत होता एवढे खरे. लवकरच पुजारी मंडळीने कंटाळून त्यांचा नाद सोडला आणि आपल्या दिग्विजयी हत्तीने ते दाट अरण्य मोठ्या सफाईने ओलांडून दहा वाजायच्या सुमारास अलाहाबाद गाठले.

आवडा हे त्या तरुण मुलीचे नाव. ती अजून बेशुद्धच होती. पणअलाहाबादच्या वेटिंग रूममध्ये ती शुद्धीवर आली. तिला सगळी हकीकत कळल्यावर तिने या मंडळींचे फार आभार मानले. तिला जगात नात्यागोत्याचे कोणीच नव्हते. तेव्हा सध्या तरी आपल्या उपकारकर्त्यांबरोबर यात्रा करण्याचे तिने पसंत केले.

अलाहाबादला फिलिअस फॉगने पारशी वाटाड्याला निरोप दिला. ठरवलेली रक्कम त्याने त्याच्या हातावर ठेवली आणि बक्षिशी म्हणून तो सबंध हत्तीच त्याला देऊन टाकला!

दुसऱ्या दिवशी बारा वाजता आपले यात्रेकरू बनारसला पोचले. इथे ब्रिगेडियरसाहेबांचे मोहरे गळले, कारण त्यांची लष्करी छावणी तिथून जवळच होती. जाताना त्यांनी फॉगला बजावले, 'डोकं जरा यापेक्षा कमीच वापरून प्रवास केलात तरी चालेल. ईश्वर तुमचं भलं करो!'

– ४ –

सकाळी सात वाजता गाडी कलकत्त्याला पोचली. हाँगकाँगची आगबोट दुपारी बारा वाजता सुटणार असल्यामुळे फॉग मंडळींच्या वाट्याला आता पाच तास उरले होते. आजची तारीख २५ ऑक्टोबर. वेळापत्रकाप्रमाणे फॉग कलकत्त्याला योग्य दिवशी पोचला होता. दोन दिवस हातचे मिळालेले 'सती प्रकरणा'ने खाल्ले होते, पण त्याची त्याला एवढी फिकीर नव्हती.

पण आता एक नवीनच संकट त्यांना सामोरे आले. कलकत्ता स्टेशनच्या बाहेर हे प्रवासी पडतात न पडतात तोच एका पोलीस अधिकाऱ्याने येऊन त्यांना हटकले.

'आपण मि. फिलिअस फॉग काय?'

'होय.'

'आणि हा इसम आपला नोकर ना?'

'होय.'

'माझ्याबरोबर चला, साहेब.'

फॉगने आश्चर्याने विचारले, 'अन् या बाई?'

'त्याही आल्या तरी हरकत नाही.'

दोन घोड्यांची एक गाडी तयार होती. तीत बसवून या मंडळींना वीस मिनिटांत पोलीस ठाण्यावर नेण्यात आले. त्यांना एका बाकावर बसायला सांगून पोलीस अधिकारी म्हणाला,

'न्यायमूर्ती ओबादियांच्यापुढे तुमचा खटला साडेआठ वाजता चालेल!'

हा सगळाच प्रकार बुचकळ्यात टाकणारा होता. पासपार्तू हताशपणे म्हणाला, 'आणि बारा वाजता बोट सुटणार! संपलंच म्हणायचं!'

फॉगसाहेब शांतपणे म्हणाले, 'बाराच्या आत आपण बोटीवर चढू.'

बरोबर साडेआठ वाजता जमादाराने त्यांना पलीकडच्या मोठ्या खोलीत नेले. तिथे कोर्ट बसलेले होते. कोर्टात हिंदी तसेच युरेपियन लोकही हजर होते. मॅजिस्ट्रेटच्या समोर एक बाक होता. त्यावरच फॉग, पासपार्तू व आवडा बसली.

न्यायमूर्ती ओबादिया ही एक लठ्ठ गुटगुटीत मूर्ती होती. खुंटीवरचा केसांचा टोप काढून या मूर्तीने आपल्या डोक्यावर ठेवला आणि गुरगुर केली, 'केस नंबर एक!'

कोर्टाचा कारकून ओरडला, 'फिलिअस फॉग - फिलिअस फॉग कोण आहे?'

'हाजीर!' मि. फॉग उभे राहून इंग्रजीत म्हणाले.

'पासपार्तू?'

'तो पण हाजीर!' नोकरानेही उभे राहून उत्तर दिले.

मॅजिस्ट्रेटसाहेब म्हणाले, 'कैदी हो! गेले दोन दिवस पोलीस तुमच्या पाळतीवर आहेत.'

'पण आमच्यावर आरोप तरी काय आहे?' पासपार्तूने विचारले.

'कळेल.' असे म्हणून कोर्टाने हुकूम करताच एक दरवाजा उघडला आणि तीन भटजी येऊन ताठ उभे राहिले.

कारकुनाने त्यांची फिर्याद वाचून दाखवली. मुंबई येथील बाबुलनाथाच्या देवळात भ्रष्टाचार केल्याचा त्यांचा आरोप होता आणि याचा पुरावा म्हणून एक बुटांचा जोडही कोर्टात हजर करण्यात आला होता. ते बूट पाहिल्याबरोबर पासपार्तू ओरडला, 'माझेच आहेत ते बूट! द्या, द्या इकडे!'

एवढी कबुली एका आरोपीने दिल्यावर आणखी काय पाहिजे? कोर्टाने झटपट खटल्याचा निकाल लावला.

'आरोपींना गुन्हा कबूल आहे?'

फॉग थंडपणे म्हणाला, 'कबूल'

कोर्ट गंभीरपणे बोलू लागले, ज्या अर्थी हिंदुस्थानात कायद्याने प्रस्थापित झालेल्या ब्रिटिश सरकारने येथील रहिवाशांच्या धर्माचे संरक्षण करण्याची हमी दिलेली आहे आणि ज्या अर्थी आरोपी पासपार्तूने मुंबईतील मलबार हिलवरच्या हिंदू मंदिरात बूट घालून जाऊन भ्रष्टाचार केला हे सिद्ध झाले आहे त्याअर्थी सदर आरोपी पासपार्तू याला कायद्याप्रमाणे पंधरा दिवसांची साधी कैद आणि तीन हजार रुपये दंड अशी शिक्षा करण्यात येत आहे. आरोपी नंबर दोन फिलिअस फॉग याने स्वत: भ्रष्टाचार केला नसला तरी आपल्या नोकराच्या [illegible]न्याबद्दल तो जबाबदार असल्यामुळे त्याला आठ दिवसांची साधी कैद आणि दोन हजार रुपये दंड अशी शिक्षा करण्यात येत आहे, केस नंबर दोन!'

पण फिलिअस फॉग मध्येच उभा राहून म्हणाला, 'युवर ऑनर, मला जामीन द्यायचा आहे.'

'कायद्याप्रमाणे तुम्हाला तसा हक्क आहे.' कोर्टाने कबूल केले.

हे ऐकल्यानंतर कोर्टात हजर असलेल्या प्रेक्षकांपैकी एकाच्या मस्तकात तिडीक निघाली. हा प्रेक्षक म्हणजे गुप्तपोलीस महाशय फिक्स. या सगळ्या खटल्याच्या मुळाशी फिक्सच होता एवढा कयास तुम्ही केलेला असेलच. कुठून तरी पकड वॉरंट हाती पडेपर्यंत आपली शिकार रोखून ठेवण्यासाठी त्याने रचलेला हा डाव होता. पण आता जामिनाची भाषा निघाल्यावर त्याला पुन्हा अस्वस्थ वाटू लागले.

सुदैवाने हे आरोपी परदेशी असल्यामुळे कोर्टाने जामिनाची रक्कम जबरदस्त मागितली. ती म्हणजे प्रत्येकी दहा हजार रुपये! तो आकडा ऐकून फिक्सला जरा हायसे वाटते न वाटते तो फिलिअस फॉगने आपले पाकीट काढले आणि वीस हजार रुपयांच्या नोटांची बंडले कारकुनाच्या हातात दिली.

कोर्टाने सांगितले, 'शिक्षा भोगून झाल्यावर तुम्हाला ही रक्कम परत मिळेल. दरम्यान तुम्हाला तूर्त जामिनावर मोकळे सोडले आहे.'

मि. फॉग यांनी लगेच एक घोडागाडी ठरवली आणि पासपार्तू व आवडा यांना घेऊन ते बंदरावर गेले. हाँगकाँगकडे जाणारी 'रंगून' बोट अर्धा मैल अंतरावर उभी होती. ती सुटायला अजून एक तास होता. पण मि. फॉग यांनी एक क्षणही न दवडता एक मचवा ठरवला आणि आगबोट गाठली.

इकडे गुप्त पोलीस फिक्सचा चडफडाट सुरू झाला. !काय पाज़ी बेदरकार माणूस आहे!' तो पुटपुटला. 'वीस हजार रुपये म्हणजे दोन हजार पौंड पाहता पाहता टाकलेन्! हा असेच पैसे उधळीत चालला तर लवकरच दरोड्याची सर्व रक्कम खर्चून बसेल पण बच्चंजी! याद राख! जगाच्या अंतापर्यंत मी तुझी पाठ आता सोडीत नाही!'

फिलिअस फॉगने आतापर्यंत खरोखरच पाच हजार पौंडांपेक्षाही जास्त खर्च केलेला होता. लंडनहून आणलेल्या रकमेला झपाट्याने गळती लागली होती.

उरलेल्या पैशात अन् उरलेल्या वेळात फिलिअस फॉगने आपला प्रवास

पुरा केला का ? पैज जिंकली का ? पोचला का तो झपाटलेला प्रवासी लंडनला वेळेवर ? की काही अडचणी आल्या ? घड्याळाने दगा तर दिला नाही ?

तिथेच तर खरी गंमत आहे. आपली उत्कंठा पुरी करायची असेल तर ज्यूल व्हर्नची ही कादंबरी समग्र वाचायला हवी !

♦ ♦ ♦



कॅप्टन नेमोबरोबर समुद्राच्या तळाशी!

आपल्या पृथ्वीचा आठ कोटी एकरांपेक्षाही जास्त मोठा पृष्ठभाग पाण्याने व्यापलेला आहे. पाण्याचा हा एकंदर साठा सव्वादोन अब्ज घन मैल भरेल. या प्रचंड जलाशयाची नीट कल्पना याची म्हणून एक चांगले ठसठशीत उदाहरण देतो. समजा, देव करो नि तसे न घडो! जगातले सर्व महासागर आटून कोरडे ठणठणीत पडले तर पृथ्वीवरच्या सर्व नद्यांना ते पुन्हा भरून काढायला चाळीस हजार वर्षे लागतील!

पण पृथ्वीचे हे गणिती चमत्कार एवढ्यावर संपत नाहीत. फार फार पूर्वी जेव्हा पृथ्वीचा उष्ण गोळा निवला तेव्हा जिकडे तिकडे नुसतेच पाणी झाले होते. नंतर हळूहळू या पाण्यातून पर्वतांची शिखरे वर डोकावू लागली. जरा

दर्शन देऊन. कुणाला ते कुणास ठाऊक! पुन्हा ती पाण्यात बुडाली. पुन्हा वर आली. त्यांची बेटे बनली आणि मग मात्र त्यांना स्थिरपणा येऊन पृथ्वीवर महासागराप्रमाणेच भूखंडही तयार झाले आणि तिला आजचा आकार आला. हा एकंदर कार्यक्रम तीन कोटी वर्षे चालला होता! अशा रीतीने जमीन तयार झाली तेव्हा तिने समुद्राकडून १२ अब्ज ९६ कोटी घन एकर जागा हिसकावून घेतली होती.

या भूखंडामुळे पाच मोठे जलविस्तार वेगळे वेगळे झाले. या महासागरांना आपण आर्तिक व अन्तार्तिक हे दोन थिजलेले ध्रुवसागर आणि हिंदी महासागर, अॅटलांटिक व पॅसिफिक अशी नावे दिली आहेत.

पॅसिफिक या प्रचंड महासागराने उत्तरेपासून ते दक्षिणेपर्यंतची दोन ध्रुवांमधील जागा व्यापलेली आहे. नावाप्रमाणेच हा समुद्र 'प्रशांत' आहे. त्यातले प्रवाह रुंद व मंद आहेत. त्याला भरती ओहोटी मध्यम प्रमाणात येते - आणि त्यावर पाऊस भरपूर पडतो. अशा या पॅसिफिक महासागरातून माझा चमत्कृतिपूर्ण प्रवास सुरू होता.

मी म्हणजे प्रो. अॅरोनॅक्स, पॅरिसच्या सृष्टि-विज्ञान मंदिरातला मी प्राध्यापक. पॅसिफिक महासागरात एका जलराक्षसाने थैमान घातले आहे आणि तो जहाजांमागून जहाजे बुडवीत आहे अशा बातम्यांनी त्या काळी पृथ्वीवरचे सप्तखंड हादरून गेले होते. कोण होता तो जलराक्षस? एखादा प्रचंड देवमासा किंवा नारव्हल तर नसेल?

जलराक्षसाचे ते रहस्य उलगडण्यासाठी जेव्हा अमेरिकेच्या आरमार खात्याने 'अब्राहाम लिंकन' नावाचे जहाज पाठवले तेव्हा त्यावर सागरसृष्टीचा तज्ज्ञ म्हणून माझी नेमणूक झाली. माझ्याबरोबर माझा सच्चा सेवक कॉंझील आणि एक धट्टाकट्टा उमदा उंच कॅनेडियन तरुण, हार्पूनबहाद्दर नेड लँड असे दोघे होते. चार महिने सबंध पॅसिफिक समुद्रात गस्त घालून झाल्यावर अचानक आमची जलराक्षसाशी गाठ पडली. गाठ म्हणजे काय?

त्याने आम्हाला सरळ धडकच दिली. आमच्या बोटीवरून तोफांचा भडिमार करण्यात आला पण त्याचा उपयोग झाला नाही. 'जलराक्षस' म्हणजे देवमाशासारखे लांबलचक अन् पोलादासारखे भक्कम असे काहीतरी होते. त्याला एक लांबच लांब टणक चोच होती. तिने धडका मारमारून त्याने आमच्या जहाजाच्या ठिकऱ्या उडवल्या. आम्हा तिघांखेरीज बाकी सर्व प्रवाशांना जलसमाधी मिळाली. आम्ही मात्र त्या जलराक्षसाच्या पाठीवर चढलो. थोड्या वेळाने एक चोरदार उघडून काही खलाशी बाहेर आले आणि आम्हाला पकडाव करून 'राक्षसा'च्या पोटात घेऊन गेले!

इतके आश्चर्य वाटण्याचे कारण नाही! तो राक्षस म्हणजे प्राणी नव्हता. ते एक यांत्रिक वाहन होते. समुद्राच्या पृष्ठाखालून जाणारी नौका म्हणजे ज्या काळात एक नवलाई मानली जाई, त्या काळात एका विलक्षण माणसाने अफाट पैसा खर्च करून तयार केलेली ती एक विद्युत्सज्ज पाणबुडी होती. हा माणूस म्हणजे कॅप्टन नेमो. कॅ. नेमो हा मितभाषी, चतुर, उमदा गृहस्थ होता. पण त्याला द्वेषाने पछाडलेले होते. 'नॉटिलस' पाणबुडी हे त्याचे जग होते आणि साऱ्या बाह्य जगापासून तो फटकून वागत होता. नव्हे साऱ्या उच्चभ्रू, सुधारलेल्या 'ढोंगी' जगाला तो पाण्यात पाहत होता. त्यामुळेच युरोपमधल्या बलाढ्य राष्ट्रांची जहाजे भराभर पाण्यात बुडवण्याचा त्याने सपाटा लावला होता. कॅ. नेमो म्हणजे एक समुद्र -सुलतान होता किंवा समुद्र- सैतान म्हणा!

त्याने आम्हाला वागणूक उत्तम दिली आणि पाण्याखालून हजारो मैल फिरवले. जलसृष्टीचे त्याचे ज्ञान पाहून मला स्वत:च्या तुटपुंज्या ज्ञानाची अक्षरश: शरम वाटू लागली. पण माझ्या ज्ञानात नित्य नवी भर पडत होती तरी आम्ही त्याचे कैदी होतो आणि ते शल्य आम्हाला तिघांनाही सारखे बोचत होते.

'प्रोफेसरसाहेब, आता पावणेबारा वाजलेले आहेत. तुमची हरकत नसेल तर आपण एकदा नॉटिलसच्या पाठीवर जाऊन पाहणी करूया.' असे म्हणून

कॅ. नेमोने भिंतीवरच्या एका चक्रातला खटका दाबला. त्याबरोबर टाक्यातले पाणी पंपाकडून सपाट्याने उपसले जाऊ लागले आणि पाणबुडी वर चढू लागली. मॅनोमीटरच्या काट्यावरून तिची ही ऊर्ध्वगती स्पष्ट दिसत होती. मग एकाएकी गती थांबली.

'आलो आपण' कॅ. नेमो म्हणाला.

पाणबुडीच्या मध्यभागी जो गोल जिना होता तिथे आम्ही आलो आणि त्याच्या लोखंडी पायऱ्या चढून गोल दरवाजातून वरच्या फलाटावर गेलो. तिथे छोटी नौका तयार होतीच.

नॉटिलसचा फलाट पाण्याच्या पृष्ठभागाबाहेर तीन चार-फूटच वर आलेला होता. पण ही मधली बाजू म्हणजे नॉटिलसची बारीक कंबर होती. पुढचा नि मागचा असे पाणबुडीचे दोन्ही भाग साधारण उंच अशा भिंतींनी परिवेष्टित होते. तरी पण मी थोडे बाजूला जाऊन डोकावून पाहताच सुकाणूवाल्याचा काचेचा पिंजरा किंवा 'जलराक्षसा'चा डोळा मला नीट पाहता आला.

समुद्र शांत नि शोभिवंत होता. आकाश स्वच्छ निळेशार होते. समुद्राचा पृष्ठभाग हलत असला तरी त्या लाटा इतक्या रुंद असणार की आम्हाला हालचाल मुळीच जाणवत नव्हती. पूर्वेकडून वाऱ्याची मंद झुळूक येऊन पाण्यावर तरंग उठत होते. धुकेबिके मुळीच नसल्यामुळे क्षितिजापर्यंत नजर पोचत होती. पण पोचून उपयोग काय ? कुठेही किनाऱ्याची कड दिसत असेल तर शप्पथ! अफाट समुद्राच्या मध्यावर कुठेतरी आम्ही तरंगत होतो- जण काही सहारा वाळवंटातून आमचा उंट चालला होता!

नेमोने कोनमापक यंत्राच्या किंवा सेक्स्टांटच्या मदतीने सूर्य किती उंचीवर आहे ते पाहिले. कारण सूर्याच्या उंचीवरूनच अक्षांश ठरवण्याची पद्धत असते. पण हे करताना यंत्राची बैठक क्षितिजाशी समांतर होईपर्यंत त्याने वाट पाहिली. त्याचा हात जरासुद्धा थरथरत नव्हता. जसे काही एखाद्या दगडी पुतळ्याच्याच

हातात कुणी यंत्र दिले होते!

'बारा वाजले आहेत. जाऊया का आपण खाली?'

पुन्हा गोल जिन्याने न जाता मुख्य दरवाजातून छोटी शिडी उतरून आम्ही खाली आलो आणि कॅ. नेमोने मला सरळ दिवाणखान्यात नेले.

'प्रोफेसरसाहेब, आपलं जहाज पूर्व ईशान्य दिशेला चाललेलं आहे. ही घ्या टिपणं नि हे नकाशे. आपण इथे मनसोक्त अभ्यास करू शकता. घेऊ आपली रजा?'

कॅ. नेमोने नम्रपणे वाकून माझा निरोप घेतल्यानंतर जवळजवळ तासभर मी विचारमग्न स्थितीत बसलो होतो. कॅ. नेमोच्या लोकविलक्षण व्यक्तिमत्त्वाबद्दलच माझे सर्व विचार होते हे सांगायला नको. त्या व्यक्तित्वामागील रहस्य उलगडण्याचा मी खूप प्रयत्न केला, पण माझे समाधान होण्याऐवजी मी आणखीच गोंधळात पडत गेलो. तेवढ्यात मेजावर पसरलेल्या मोठ्या थोरल्या नकाशाकडे माझी दृष्टी गेली. लगेच मी जवळ गेलो आणि कॅप्टनने दाखवलेले अक्षांश रेखांश ज्या ठिकाणी मिळत होते तिथे बोट ठेवले.

तुम्हाला हे माहीत आहे का,की जमिनीवरून जशा नद्या वाहत असतात तशा समुद्रातून वाहणाऱ्याही नद्या आहेत . या नद्या म्हणजे वेगवेगळ्या प्रकारचे प्रवाह. तुम्ही म्हणाल, पाण्यातच पाण्याच्या नद्या वेगळ्या कशा हुडकून काढायच्या? तर उष्णतामान आणि रंग यावरून या नद्या ओळखता येतात. यांतली सर्वांत प्रसिद्ध नदी म्हणजे 'गल्फ स्ट्रीम.' गल्फ स्ट्रीमचे एकंदर पाच प्रवाह आहेत. उत्तर व दक्षिण अॅटलांटिकमध्ये प्रत्येकी एक एक, उत्तर व दक्षिण पॅसिफिकमध्ये एक एक, आणि हिंदी महासागरात एक.

नकाशाकडे पाहताच माझ्या लक्षात आले की या पाचव्या शेवटच्या गल्फ स्ट्रीममध्ये आम्ही आता प्रवेश करीत होतो. हा प्रवाह बंगालच्या उपसागरात उगम पावतो. तिथल्या उष्ण प्रदेशात सूर्याच्या सरळ उभ्या किरणांमुळे त्याचे पाणी तापून मलाक्काच्या सामुद्रधुनीतून पुढे जपान व चीन यांच्या किनाऱ्यांना

स्पर्शून उत्तरेला ॲल्युशियन बेटांकडे जाते. कापराच्या झाडाची खोडे आणि असेच दुसरे पदार्थ त्यातून वाहत जातात. त्याच्या गरम पाण्यात जी शुद्ध नीळ तयार झालेली असते तिच्यामुळे समुद्राच्या लाटांना या भागात निळी किनार दिसते. शेवटी हा प्रवाह पॅसिफिक महासागरात लुप्त होतो. या प्रवाहाला जपानी लोकांनी 'कुरो स्किव्हो' किंवा 'काळी नदी' असे नाव दिलेले आहे.

मी नकाशात हे पाहण्यात रमलो होतो, त्यामुळे नेड लँड अन् कॉंझील दारात केव्हा येऊन उभे राहिले ते मला कळलेच नाही.

'आहोत तरी कुठे आपण?' नेड लँड उद्गारला आणि मी चमकून त्यांच्याकडे पाहिले. त्या दोघांनी या दालनात प्रथमच पाय ठेवला होता, त्यामुळे दोघेही तिथले ऐश्वर्य पाहून थक्क झाले होते.

'मित्रहो!' मी त्यांना आत येण्याबद्दल खूण करून उत्तरलो. 'आपण एखाद्या अजबखान्यात नसून नॉटिलस पाणबुडीत समुद्रसपाटीपासून पन्नास यार्ड खाली उभे आहोत.'

'पण..... पण प्रोफेसरसाहेब! या बोटीत एकंदर किती माणसं आहेत याची तुम्हाला काही कल्पना आहे का? दहा - वीस - पन्नास - शंभर?'

'ते काही मला सांगता येणार नाही, नेड. पण तुला मी एवढंच सांगतो की नॉटिलसमधून पळून जाण्याची कल्पना आपल्याला काही काळ तरी सोडून दिली पाहिजे. हे जहाज म्हणजे एक शास्त्रीय करामत आहे. मला ते बघायला मिळालं हे मी भाग्य समजतो. तुम्हालाही माझं सांगणं आहे की तुम्ही मन शांत ठेवा आणि जे जे घडेल ते नजरेखालून घाला!'

'कसं काय घालू नजरेखालून?' नेड लँड म्हणाला. 'या लोखंडी तुरुंगातले कैदी आम्ही! आंधळ्यासारखे चाचपडत हिंडतो आहो अन् तुम्ही म्हणता -'

नेडचे वाक्य पुरे होण्याच्या आधीच एकाएकी अंधारगुडूप झाला. वरचे तेज:पुंज छत दिसेनासे झाले होते आणि ते इतक्या झटकन की माझ्या डोळ्यांना

दुखावल्यासारखे झाले.

आम्ही गुपचूप उभे राहिलो. पुढे काय होणार आहे याची काहीच कल्पना आम्हाला होईना. एखादी वाईट गोष्ट घडणार आहे की चांगली हे पण कळेना. इतक्यात काहीतरी सरकल्याचा आवाज झाला.

नेड लँड म्हणाला, 'प्रलयकाळ म्हणतात तो आला बहुतेक.'

- २ -

इतक्यात दालन पुन्हा अचानक प्रकाशाने न्हाऊन निघाले. दोन बाजूच्या काचेच्या तावदानातून हा प्रकाश आत आलेला होता. पण दिवे मात्र नॉटिलसच्या बाहेरच्या बाजूंना पेटलेले असावेत. कारण दोन्ही खिडक्यातून आम्हाला बाहेरची जलसृष्टी तेजाळलेली दिसत होती.

आणि त्या अद्‌भुत सृष्टीचे वर्णन मी काय करू? प्रकाशाने पारदर्शक बनवलेल्या त्या अज्ञात जगाचे वर्णन कुणाची तरी लेखणी कधी करू शकेल का?

खडकातल्या पाण्यापेक्षा समुद्राचे पाणी जास्त पारदर्शक असते असे आपण ऐकले आहे. त्या पाण्यात जी खनिज नि सेंद्रिय द्रव्ये तरंगत असतात त्यामुळे त्याची पारदर्शकता वाढते. अँटिलीसजवळ काही ठिकाणी साडेचारशे फूट खोल समुद्राच्या तळाची वाळू स्पष्ट दिसते. सूर्याचे किरण नऊशे फुटापर्यंत खोल पाणी भेदू शकतात. पण आता नॉटिलस जिथून चालली होती तिथे जणू लाटांच्या काळजांचा सुद्धा भेद झाला होता आणि एक मैल लांबीपर्यंतचा जलभाग विद्युत्प्रकाशाने भरला होता. किंबहुना पाणी प्रकाशित झालेले नव्हते, प्रकाशच पाणी बनला होता.

'नेड, तुला बघायचंय् ना? बघ!'

'कमाल आहे!' नेड पुटपुटला.

क्षणापूर्वीचा आपला राग विसरून तो मंत्राने भारल्यासारखा उभा होता.

'असला देखावा पाहण्यासाठी काही माणसं जगाच्या अंतापर्यंत जायला तयार होतील!'

मी आपल्याशीच म्हणालो, 'या कॅप्टन नेमोच्या जीवनाचं रहस्य आता मला कळायला लागलंय. त्याने मुळी स्वत:साठी एक स्वतंत्र जगच शोधून काढलंय. त्यात तो रंगून गेला तर नवल नाही.''

पण खुद्द कॅ. नेमो त्या क्षणी तिथे येऊन उभा राहिला होता हे मला कळलेही नाही. समुद्रशोभेने आम्हाला जणू गिळून टाकले होते!

त्यानंतर दोन तास आम्ही ती चित्रविचित्र शोभा पाहत उभे होतो. नाना तऱ्हेचे जलचर आम्ही पाहिले. सौंदर्यात एकापेक्षा एक वरचढ! आपल्या रंगीबेरंगी अंगाचे प्रदर्शन करीत कसे इकडे तिकडे सूर मारीत होते. मध्येच थबकत होते, उड्या मारीत होते, तोंडाचे बोळके करीत होते, गपकन् ते मिटून घेत होते, पंखे फलकारीत होते, डोळे वटारीत होते. माशांच्या इतक्या जाती होत्या की त्या सर्वांची नावेसुद्धा मला माहीत नाहीत. पण त्यात दुहेरी काळ्या पट्ट्याचा मलेट मासा होता. गोल शेपटीचा गोबी होता. त्याच्या अंगावर जांभळे ठिपके होते. जपानी समुद्रात आढळणारी निळ्या अंगाची नि रुपेरी डोक्याची स्कोम्ब्रस नावाची सुंदर मासळी होती. अत्यंत सुंदर असा नीलमत्स्य होता, ज्याचे वर्णन करायला शब्द अपुरे पडतील! हिंदुस्थानचे फताड्या अंगाचे नि चाबकासारख्या शेपटाचे भगतमासे होते, आगगाडीसारखी जाणारी मरळ होती, हातोडामासा होता, तलवारमासा होता अन् झगमग करणारा झेब्रामासा नि वाघमासाही होता. पाण्यात राहणारे कोळी होते. सहा फूट लांबीचे सर्प होते. त्यांचे डोळे बारीक पण चुणचुणीत अन् जबडा केवढा तरी मोठा आणि त्यात लांब लांब सुळे! आणखीसुद्धा कितीतरी प्राणी दिसले, त्यांना गणतीच नाही. या सर्वांनी समुद्रतळचे रस्ते खराब केले तर त्यांची साफसफाई करण्यासाठीच जणू मोठ्या थोरल्या 'झाडूमाशां'ची एक राखीव

फलटण ठेवलेली होती ती सर्वांच्या मागून फलकारत गेली!

जलचरांची ही परेड पाहात असताना आमच्या तोंडून आश्चर्योद्गार निघाला नाही असा एक क्षणही गेला नसेल. नेड लँड माशांची नावे घेत होता आणि काँझील त्यांचे वर्गीकरण करीत होता. मला त्यांच्या विविध सौंदर्याने आणि हालचालींनी वेड लावले होते. हे प्राणी जिवंत स्वरूपात अनिर्बंध संचार करीत असलेले यापूर्वी कधी मला बघायला मिळाले नव्हते. चीनच्या आणि जपानच्या नानाविध माशांची त्या ठिकाणी जणू परिषद भरली होती. तुम्ही म्हणाल, हे सर्व मासे एकाच ठिकाणी कसे गोळा झाले? तर माझी अगदी पूर्ण खात्री आहे की विद्युत्प्रकाशाच्या मोहिनीमुळे ते तिथे आकर्षित झाले होते.

इतक्यात अकस्मात दिवाणखान्यात सूर्यप्रकाश दिसू लागला. बाजूच्या गवाक्षांचे लोखंडी दरवाजे मिटले आणि ती अपूर्व सृष्टिशोभा एकाएकी डोळ्यांपुढून दिसेनाशी झाली. पण कितीतरी वेळ माझ्या मनाला त्याचेच स्वप्न पडत होते. अखेरीस समोर टांगलेल्या यंत्रोपकरणांनी जेव्हा माझे लक्ष वेधले तेव्हा मी ताळ्यावर आलो. कंपासकडे पाहताच आम्ही उत्तर-ईशान्य दिशेने चाललो आहो हे माझ्या लक्षात आले. मॅनोमीटरवरून कळले की नॉटिलस सध्या दीडशे फूट खोलीवर आहे आणि विद्युस्फुरित 'लॉग' वरून कळले की बोटीचा वेग ताशी पंधरा मैल आहे. कॅ. नेमो येईल असे मला वाटले होते; पण तो आला नाही. घड्याळात पाच वाजलेले होते.

नेड लँड नि काँझील आपल्या खोलीकडे निघून गेले. मीही माझ्या खोलीत परतलो.

त्या दिवशी जेवण झाल्यावर संध्याकाळचा बराच वेळ मी लिहिण्यात अन् विचार करण्यात घालवला. मग झोपेने घेरल्यामुळे मी माझ्या पलंगडीवर आडवा झालो आणि लवकरच मला गाढ झोप लागली.

इकडे नॉटिलस काळ्या नदीमधून मोठ्या वेगाने पुढे निघाला.

- ३ -

त्यानंतर आठ दिवस कॅ. नेमोचे नखसुद्धा आमच्या दृष्टीला पडले नाही. मला फार आश्चर्य वाटले. पण वेळ घालवायला हाताशी पुष्कळ साधने असल्यामुळे आणि आमच्या सुखसोयीत कोणतेही न्यून नसल्यामुळे मी हळूहळू या गोष्टीकडे दुर्लक्ष करायला शिकलो. नेमोची वर्तणूक जितकी आदबशीर तितकाच त्याचा स्वभाव लहरी नि हेकट होता याबद्दल माझी खात्री झालेली होतीच.

नवव्या दिवशी नेड अन् कौंझील यांना घेऊन मी माझ्या खोलीत परत येतो तो टेबलावर एक पाकीट पडलेले मला दिसले. मी ते लगेच फोडले. आत पुढील पत्र होते -

१० नोव्हेंबर १८६७

प्रो. ॲरोनॅक्स यांस -

उद्या सकाळी क्रेस्प्रो बेटाच्या जंगलात शिकारीला जाण्याचा बेत आहे. आपण आपल्या मित्रांसह येऊ शकलात तर आनंद होईल.

- कॅप्टन नेमो, कमांडर : नॉटिलस.

'शिकार ?' नेड उद्गारला.

'आणि क्रेस्पोच्या जंगलात !' कौंझीलने त्याला जोड दिली.

'म्हणजे हे सद्गृहस्थ आता जमिनीवर पाय ठेवणार म्हणायचे !' नेड.

'या मजकुरावरून तरी तसंच दिसतंय !' मी पुन्हा पत्र वाचून म्हटले.

नेड म्हणाला, 'जरूर जाऊया आपण ! एकदा कोरड्या जमिनीवर पाय ठेवला की पाहता येईल काय करायचं ते ! आणि बाकी सगळं सोडा म्हणा, पण हरीण बिरीण दिसलं तर माझ्या तोंडाला असं पाणी सुटणार आहे म्हणता !'

मी म्हणालो, 'थांबा. हे क्रेस्पो बेट आहे तरी कुठे ते पाहूया आपण.'

नकाशा पाहिल्यावर उत्तरेला ३२°४० अक्षांश आणि पश्चिमेला १५७°५० रेखांशावर एक लहानसे बेट मला आढळले. १८०१ साली कॅप्टन क्रेस्पोनावाच्या खलाशाने त्याचा शोध लावला म्हणे. जुन्या स्पॅनिश नकाशात त्याला 'रॉका द ला प्लाटा' म्हणजे 'रुप्याची नदी' असे नाव दिलेले होते. निघाल्या जागेपासून आम्ही १८०० मैलांवर आलो असून नॉटिलसने आता थोडे आग्नेय दिशेकडे वळण घेतले आहे ही गोष्ट स्पष्ट होती. मध्य पॅसिफिकमधले ते खडकाळ बेट माझ्या मित्रांना नकाशात दाखवून मी म्हणालो, 'कॅ. नेमोला कधी कोरड्या जमिनीवर जायची इच्छा झालीच तर तो किती एकीकडची निर्जन बेटं निवडतो ते पहा!'

नेडने नुसते खांदे उडवले आणि तो नि कॉंझील निघून गेले.

दुसऱ्या दिवशी सकाळी मी जागा झालो तेव्हा पाणबुडी स्थिर झाली आहे असे मला वाटले. मी घाईघाईने पोशाख केला आणि दिवाणखान्यात गेलो.

कॅ. नेमो माझी वाटच पाहत होता. त्याने मला भोजनगृहात नेले आणि आम्ही अगदी साधी न्याहारी घेतली. पिण्यासाठी शुद्ध पाणी होते. नाही म्हणायला समुद्रातल्या शेवाळापासून काढलेल्या मद्याचे दोन-तीन थेंब नेमोने त्यात टाकले होते.

फराळ करता करता काहीतरी बोलायचे म्हणून मी म्हणालो, 'आजची ही शिकार.... कल्पना मोठी छान आहे! बऱ्याच दिवसानंतर बेटावर पाय ठेवायला मिळणार हे ऐकून मला किती आनंद झाला आहे म्हणून सांगू!'

'जरा बेताने प्रोफेसरसाहेब! कॅ. नेमो पाण्याचा ग्लास खाली ठेवून म्हणाला, 'आपल्याला जमिनीवर जायचंय असं तुम्हाला कुणी सांगितलं?'

'पण.... पण - ही शिकार?'

'पाण्यातच करायची ती! क्रेस्पो बेटाच्या पायथ्याशी समुद्रतळाशी फार मोठं अरण्य आहे. त्या अरण्यात आपण हिंडणार आहो!'

कॅ. नेमोचा हा खुलासा ऐकून मी सर्दच झालो. माझा गडबडगुंडा उडालेला पाहून तो हसून पुढे म्हणाला, 'प्रोफेसरसाहेब, मी सर्व खुलासा करतो. नीट ऐकून घ्या. तुम्हाला माहीत आहेच की हवेचा पुरेसा साठा जवळ असला तर मनुष्यप्राणी पाण्याखाली जिवंत राहू शकतो. हा हवेचा साठा बरोबर नेण्याची मी तरतूद केलेली आहे. पाण्यात उतरण्यापूर्वी आपल्यापैकी प्रत्येकजण पाणबुड्याचा पोशाख घालील. हा पोशाख संपूर्ण रबराचा असून मजबुतीसाठी त्याला मधूनमधून तांब्याची किनार जोडलेली आहे. पायापासून तो गळ्यापर्यंत या पोशाखाने अंग झाकले जाते. गळ्याभोवती एक तांब्याचा गळपट्टा असतो आणि त्या पट्ट्याला अभंग काचेचं घुमटाकार शिरस्त्राण जोडलेलं असतं. प्रत्येकाच्या पाठीवर एक पेटी बांधलेली असते आणि त्या पेटीत हवा भरलेली असते. हवा दाबून घट्ट केलेली असते, तिचा उपयोग करतेवेळी ती विरळ बनते. त्यामुळे थोड्या जागेतली हवा जास्त वेळ पुरते.'

'किती वेळ?'

'आपल्या पेटीतली हवा प्रत्येकाला आतला ऑक्सिजन खराब न होता नऊ-दहा तास सहज पुरेल. या पेटीला दोन रबरी नळ्या जोडलेल्या असतात आणि त्या वर शिरस्त्राणाच्या आत नेलेल्या असतात. एका नळीतून शुद्ध हवा ओढून घेतली जाते. दुसऱ्या नळीतून अशुद्ध हवा निघून जाते.'

'छान! पण उजेडाची सोय?'

'रूह्‌म्‌कॉर्फ दिवा म्हणतात तो बरोबर घ्यायचा. त्यात बनसेन बर्नर असतो. तो सोडियमवर पेटतो आणि जी वीज तयार होते ती एका तारेतून कंबरपट्ट्यावर पुढच्या बाजूला जो दिवा लावलेला असतो तिथे नेली जाते. या दिव्यात एक नागमोडी काचेची नळी असते. तीत कर्बवायू भरलेला असतो. तो लखलख करायला लागतो आणि त्याच्या प्रकाशात चांगले फर्लांगभर अंतर स्वच्छ दिसू लागते.'

'अच्छा! - बरं आपण शिकार करायला जायचं ते कोणती हत्यारं

घेऊन ?'

'बंदुका ! माझी हवाई बंदूक मी तुम्हाला दाखवलेली आहेच.'

'होय ! पण तिचा उपयोग कसा करायचा ते मला अजून कळलेलं नाही.'

'सांगतो.' असे म्हणून कॅ. नेमो जागचा उठला आणि माझा बाहू पकडून त्याने मला पुन्हा दिवाणखान्यात नेले. भिंतीवर लटकत असलेली एक बंदूक त्याने काढली आणि तो म्हणाला, 'पाण्याची घनता हवेच्या ८५५ पट आहे ! अर्थात इतक्या विलक्षण प्रतिकाराला तोंड देऊनच पाण्यात बंदूक मारणं शक्य आहे. फुल्टन म्हणतो की सुरुंगाची दारू वापरूनसुद्धा पाण्यातून बंदूक मारणं अशक्य नाही. आणि त्याप्रमाणे इंग्लंडमध्ये कोल्स आणि बर्ली यांनी, फ्रान्समध्ये फर्सीने अन् इटलीत लांडी कंपनीने एका विवक्षित आवरणाच्या बंदुका तयार केल्या आहेत. मी मात्र त्या वापरत नाही. माझ्या बंदुकीत मी हवा ठासतो. म्हणजे दाबून घट्ट केलेल्या हवेत जी स्फोटक शक्ती असते तिचा उपयोग करतो.'

मी आश्चर्याने थक्क होऊन म्हणालो, 'हं ! ..... पण.... पण तरीसुद्धा या बंदुकीचा नेम पाण्यात दूरपर्यंत जाणं शक्यच नाही. किंवा तिच्या आघाताने सावज मरेलच असंही सांगता येणार नाही.'

कॅ. नेमो स्मितपूर्वक म्हणाला, 'तुमची ही भीती निराधार आहे. उलट आमच्या या बंदुकीने सावज निःसंशय ठार होतं.'

'ते कसं काय ?'

'आम्ही गोळ्या कसल्या वापरतो ते नीट पहा. या साध्या गोळ्या नाहीत, काचेच्या आहेत. त्यांना वरून पोलादाचं आवरण आहे आणि आत वजनासाठी शिशाचा तुकडा घातलेला आहे. 'लेडन' बाटल्यांप्रमाणे या गोळ्या म्हणजे एक प्रकारचे विद्युत्‌घटच आहेत. त्यात अत्यंत जोरदार विद्युत्‌शक्ती कोंबलेली आहे. या गोळ्या बंदुकीतून सुटल्यानंतर त्यांचा एखाद्या पदार्थावर किंचित जरी आघात झाला तरी विद्युत्‌शक्ती बाहेर पडते. या

गोळीचा धक्का बसल्यावर कोणताही प्राणी जिवंत राहणं शक्य नाही.'

- ४ -

गोल जिन्याने उतरून आम्ही नॉटिलसच्या तळमजल्यावर वेष बदलण्याच्या खोलीत आलो. तिथे पाणबुड्यांचे कितीतरी रबरी पोशाख, जाड बूट नि काचेची शिरस्त्राणे टांगून ठेवलेली होती. ते पाहून नेडची पूर्ण निराशा झाली. जमिनीवर उतरून हरणांची शिकार करण्याची जी स्वप्ने त्याने रंगवली होती त्याचा चक्काचूर झाला.

'प्रोफेसरसाहेब!' तो म्हणाला, 'हे सगळं तुम्ही अंगावर घालणार आहा?'

'त्याला काही इलाज नाही, नेड!'

'अच्छा, तुमची मर्जी!' नेड खांदे उडवून म्हणाला, 'मला मात्र कुणी जबरदस्ती केल्याशिवाय मी हे भूत मानेवर घेणार नाही.'

'तुमच्यावर जबरदस्ती कुणाचीच नाही.' कॅ. नेमो म्हणाला.

'काँझील हा धोका पत्करणार आहे?' नेडने विचारले. आणि तो इमानी सेवक लगेच उत्तरला, 'माझे साहेब जिकडे जातील तिकडे जायला मी एका पायावर तयार आहे!'

नेडशी जास्त वाद न घालता आम्ही कॅप्टन व त्याचे नोकर यांच्या साहाय्याने रबरी पोशाख घालून तयार झालो. आमची डोकी शिरस्त्राणात शिरत असताना नेडने व्यंग्य सुरात उच्चारलेले वाक्य माझ्या कानावर पडले -

'अच्छा! शीर सलामत रखो!'

नॉटिलसवरच्या एका खलाशाने माझ्या हातात बंदूक दिली. तिला एक कप्पा होता आणि कप्प्यात वीस गोळ्या ठेवलेल्या होत्या.

कंबरपट्ट्यावर आगगाडीच्या प्रकाशाझोतासारखा तो रूह्मकॉर्फ् दिवा अन् हातात बंदूक घेऊन आमची स्वारी सज्ज झाली. पण पाऊल उचलण्याचा प्रयत्न करताच माझा चांगला फज्जा उडाला. एकंदर पोशाखच इतका अवजड आणि त्यात बुटांना शिशाचे तळ ठोकलेले. त्यामुळे माझे पाय जमिनीला खिळल्यासारखे झाले. कॉंझीलचीही तीच स्थिती झाली. आमची ती अवदशा पाहून नेड 'खो खो' हसत सुटला.

इतक्यात मला कुणीतरी ढकलते आहे असा भास झाला. क्षणभराने पाहतो तो पोशाखाच्या खोलीला लागून जी घुमटाकार छताची जागा होती तीत आम्ही तिघेही येऊन दाखल झालो आहो आणि पाणबंद दरवाजा पुन्हा मिटला असून आम्ही काळोखाच्या साम्राज्यात प्रवेश केला आहे. नंतर 'स्स....स्स्' असा आवाज झाला आणि माझे अंग पायापासून वर वर गारठत चालल्यासारखे मला वाटले. समुद्राच्या पाण्याने आत शिरून आम्हाला ग्रासले होते. थोड्याच वेळाने लख्ख प्रकाश पडला आणि बाजूचे एक गोल दार उघडलेले आम्हाला दिसले. कॅ. नेमोने खूण करताच मी व कॉंझील त्याच्या मागोमाग या दारातून पाण्यात उतरलो-आणि मग दुसऱ्याच क्षणी आमचे पाय समुद्राच्या तळाला टेकले.

कॅ. नेमो नि त्याचा नोकर पुढे चालले. मी नि कॉंझील एकमेकांच्या शक्य तेवढे जवळ राहून त्याच्या मागून चालू लागलो. आता मला चालताना मुळीच अडचण वाटत नव्हती. पायांखाली अतिशय मुलायम अशी वाळू होती. समुद्रकिनाऱ्यावर भरती-ओहटीच्या लाटांमुळे वाळूवर जसे गोफ उमटलेल असतात तसे तिथे मुळीच नव्हते. वाळूचा सबंध विस्तार कसा गोंडस, साफसूफ दिसत होता! त्यावर एकसुद्धा सुरकुती नव्हती. ही वाळूची सतरंजी म्हणजे एक देदीप्यमान आरसाच होता म्हणा ना! त्या आरशापर्यंत पोचणारी सूर्याची किरणे विलक्षण तेजाने परावर्तित होऊन सारा आसमंत लखलखीत करीत होती.

पंधरा मिनिटे आम्ही त्या वस्त्रगाळ वाळूवरून राजासारखे मंद पावले टाकीत चाललो. त्यातच मधूनमधून शंखशिंपल्यांचे पांढरे चूर्ण मिसळून गेले होते.

होता होता आमच्या मागची नॉटिलस दिसेनाशी झाली. पाण्यातून चालण्याची सवय होऊन आमची गती जरा वाढली. पण तेवढ्यात आम्हाला जरा वेगळाच प्रांत लागला. पायांखालची भुसभुशीत वाळू संपली आणि चिखलाला सुरुवात झाली. हा चिखल तुडवायला अर्थात थोडासा त्रास पडला. पण लवकरच हिरवळ सुरू झाली आणि आम्ही पुन्हा झपाझप चालू लागलो. लाल गुलाबी वनस्पतींची रोपटी पायात घोटाळू लागली, इतकेच नाही तर समुद्राच्या पृष्ठभागावर तरंगणाऱ्या शेवाळाची मुळे आमच्या शिरस्त्राणात अडकू लागली. समुद्रातल्या वनस्पतीचा एक विशेष माझ्या लक्षात आला. हिरव्या वनस्पती साधारणपणे पृष्ठभागाजवळ असतात, जास्त खोलीवर तांबड्या असतात आणि अगदी खोल तळाशी विटकरी अन् काळ्या रंगाची झाडे वाढतात. नॉटिलस सोडून जवळजवळ दीड तास झाला. दुपारचे बारा वाजले होते. माझ्या ही गोष्ट लक्षात येण्याचे कारण सूर्याची किरणे आता डोक्यावरून समुद्रात उभी पडत होती. त्यांचे वक्रीभवन होत नव्हते आणि त्यामुळे त्यांची रंगरंगोटी संपून आमच्याभोवती नुसता शुभ्र प्रकाश पसरला होता. आमच्या प्रत्येक पावलाचा आवाज शिरस्त्राणातून वर येऊन कानांत घुमत होता. हवेपेक्षा पाण्यातून आवाज चौपट जोराने घुमतो त्याचा आम्हाला प्रत्यक्ष अनुभव येत होता.

इतक्यात सपाट जमीन संपली आणि उतार सुरू झाला. समुद्र तळाशी असलेल्या एका खोल खोऱ्यात आम्ही उतरत होतो. या वेळी आम्हाला पाण्याच्या प्रतिकाराचा फायदा मिळाला! जमिनीवरचे डोंगर उतरताना पाय घसरून पडण्याची जी भीती असते तिचा या ठिकाणी मुळीच संभव नव्हता. हात किंवा पाय निसटला तरी सावरण्यासारखे होते. खोऱ्यात उतरल्यावर कॅ.

नेमोने समोर बोट दाखवले. थोड्याच अंतरावर एक प्रचंड काळा डाग दिसत होता.

नेमो म्हणाला, 'ते पहा क्रेस्पोचं जंगल!'

- ५ -

क्रेस्पोचे जंगल म्हणजे कॅ. नेमोच्या गुप्त नि अफाट साम्राज्यातला सर्वात नवलपूर्ण देश. त्यावर आपले एकट्याचे निरंकुश स्वामित्त्व आहे असे नेमो समजत होता आणि खरोखर त्याचा हक्क नाकारण्याची कुणाची तरी हिंमत होती का? हातात कुऱ्हाड घेऊन या ओल्याचिंब काळोखी रानातली लाकडे तोडायला दुसरे कोण जाणार होते?

या जंगलात मोठमोठे वृक्ष होते, उंचच उंच वेली होत्या. पण सर्वांचा एव गुण माझ्या ध्यानात आला, तो हा की कोणतेही झाड किंवा वेल वाकलेल नव्हती, एकही फांदी मोडलेली नव्हती. कोणतेही झाड आडवे पसरले नव्हते. इमारतीच्या खांबांप्रमाणे किंवा खिडकीच्या गजांप्रमाणे सर्व वनस्प सरळसोट उंच होत्या नि वर समुद्राच्या पृष्ठभागाला भिडलेल्या होत्य वृक्षवेलींची पाती कितीही बारीक पातळ असोत, ती वरपर्यंत ताठ गेलेल होती.

एक तास चालल्यानंतर कॅ. नेमोने थांबण्याचा हुकूम दिला. मला थकव आला होता त्यामुळे विश्रांतीची जरूर होतीच. एका मोठ्या ॲलरी वृक्षाखाल आम्ही ताणून दिली. या वृक्षाची धारदार पाने भाल्यासारखी वर चढलेली होती. आम्हाला एकमेकांशी बोलणे शक्य नव्हते. पण खाली आडवे झाल्यावर मी माझे काचेचे शिरस्त्राण वळवून कॉंझीलच्या शिरस्त्राणाला भिडवले आणि तेवढ्या क्षुल्लक कृतीमुळे माझ्या त्या दिलदार सेवकाला किती

धन्य वाटलेले दिसले !

नॉटिलस सोडल्याला चार तास झाले तरी आपल्याला भूक लागली नाही याचे मला आश्चर्य वाटत होते. झोप मात्र अगदी डोळ्यांवर आली होती. त्यामुळे खाली डोके टेकल्याबरोबर मी निद्रेच्या अधीन झालो.

किती वेळ मला झोप लागली होती कुणास ठाऊक ! पण मी जेव्हा जागा झालो आणि हातपाय ताणले, तेव्हा समोर दिसलेल्या दृश्याने माझा एकदम थरकाप उडाला.

माझ्यापासून काही पावलांवर एक राक्षसी कोळी माझ्याकडे किलकिल्या डोळ्यांनी पाहत उडी मारण्याच्या तयारीत उभा होता. दोन अडीच फूट तरी त्याची उंची असेल. माझा रबरी पोशाख इतका जाड होता की त्याच्या दंशाचा त्यावर काहीही उपयोग होणार नाही हे मला माहीत होते आणि तरी त्याच्या उघड्या जबड्यातली ती दातांची रांग पाहून माझ्या अंगावर शहारे आले. इतक्यात कॅ. नेमो उठला. त्याचे लक्ष या प्रकाराकडे जाताच बंदुकीच्या दस्त्याचा एक फटका मारून त्याने त्या कोळ्याला गारद केले.

माझ्या जिवात जीव आला. पण आता अशी भीती वाटू लागली की याहीपेक्षा राक्षसी प्राणी आपल्याला कशावरून भेटणार नाहीत ? आपल्या रबरी पोशाखाच्या चावून चिंध्या करणारेही प्राणी इथे कशावरून नसतील ? कॅ. नेमो यावरून धडा घेईल का आणि आजची मोहीम इथेच पुरी करील का ?

पण नाही. कॅ. नेमो माझ्यासारखा कच्च्या दिलाचा गडी नव्हता. त्याने आम्हाला आणखी पुढे नेले. अजूनही पायाखालचा उतार संपत नव्हता. उलट आम्ही अधिकाधिक खोल घसरत चाललो होतो. तीन वाजण्याच्या सुमाराला सुमारे साडेबाराशे फुटांची खोली आम्ही गाठली असावी असा मी अंदाज केला- एवढ्या खोल पाण्यात सूर्याचे किरण प्रवेश करू शकत नाहीत, त्यामुळे अंधार आणखी आणखी वाढत चालला. तेव्हा कॅ. नेमोने आपल्या रूहम्कॉर्फ् दिव्याचा स्क्रू फिरवला. त्याचे उदाहरण पाहून आम्हीही तसेच केले. लगेच

आमच्या पुढ्यातला छत्तीस यार्डापर्यंतचा प्रदेश आम्हाला लख्ख दिसू लागला. मला वाटले, या प्रकाशामुळे एखादा जंगली प्राणी आमच्याकडे आकर्षित तर व्हायचा नाही? त्याप्रमाणे काही प्राणी ओढले गेलेले दिसले खरे, पण फार जवळ येण्याची त्यांची छाती झाली नाही. दुरून दुरूनच त्यांनी आमच्यावर डोळे वटारले. त्यांनाही आपल्या जिवाची भीती होतीच!

हळूहळू झाडी विरळ होऊ लागली आणि चार तासांच्या पायपिटीनंतर एकदम एक धिप्पाड खडक पुढ्यात उभा असलेला आम्हाला दिसला. 'तुमची हद्द इथे संपली' असेच तो जणू कॅ. नेमोला सांगत होता आणि ते अगदी खरे होते, कारण हा खडक म्हणजे क्रेस्पो बेटाचा पाया होता. पृथ्वीच्या पृष्ठभागाचा हा पायथा होता. तो खडक पकडून वर चढू लागण्यासाठी माझे हात शिवशिवलेसुद्धा. पण नेमोने लगेच माझा हात पकडून मला प्रतिबंध केला आणि 'घूम जाव' करून आम्ही पुन्हा नॉटिलसकडे जायला निघालो.

परत जाताना आपण वेगळ्याच रस्त्याने चाललो आहो हे दरीतून वर चढून येताच माझ्या ध्यानात आले. आम्ही दिवे मालवले; कारण आता पुन्हा ऊन पडले होते. मात्र सूर्य मावळायला आला होता, त्यामुळे पाण्यात रंगीबेरंगी पट्टे उठले होते. पस्तीस फूट खोलीवर आम्हाला बारीक बारीक माशांचा अक्षरश: खच लागला. म्हणजे मी जिवंत मासळीचा 'खच' म्हणतोय, बरं का? आमच्या अंगात पाणबुडीचा पोशाख नसता तर त्यातले किती मासे आमच्या नाका तोंडात नि कानात शिरले असते कुणास ठाऊक! आणि मासे तरी किती रंगाचे नि किती जातीचे! 'पण यात शिकार करण्यासारखे सावज एकही दिसत नाही' असा विचार माझ्या डोक्यात येतो आहे तोच कॅ. नेमोने नेम धरून बंदूक झाडली आणि 'स्स' असा आवाज होऊन आमच्यापासून काही अंतरावर मांजरासारखा दिसणारा एक मोठा प्राणी बेशुद्ध होऊन पडला. या पाणमांजराची किंवा 'ऑटर'ची लांबी पाच फूट असेल. समुद्रात राहणारा 'ऑटर' हा एकुलता एक चतुष्पाद प्राणी होय. नेमोने मारलेल्या ऑटरची केसाळ कातडी

पिंगट रंगाची, सुंदर अन् तकतकीत होती. रशियाच्या नि चीनच्या बाजारात असली मऊ 'फर' विकली तर तिची ८० - ९० पौंड किंमत सहज येते! श्रीमंत शौकीन लोक असल्या लोकरीचे कोट घालतात. कॅप्टनच्या खलाशी नोकराने जेव्हा ते मेलेले ऑटर खांद्यावर टाकले तेव्हा त्या मौल्यवान शिकारीकडे मी मोहित होऊन पाहू लागलो. ऑटरने आपले बारीक इटुकले कान, वटारलेले गोल डोळे नि पांढऱ्या मिशा माझ्यावर जणू हेटाळणीने रोखल्या आहेत असेच मला क्षणभर वाटले.

यानंतर एक तासभर आम्ही बारीक वाळूतून प्रवास करीत होतो. या ठिकाणी समुद्र फारसा खोल नव्हता. कधी कधी तर आमच्या डोक्यावर दोन-तीन यार्ड अंतरावरती समुद्राचा पृष्ठभाग दिसायचा, इतकेच नाही तर आमच्याचसारखे शिकारी खाली डोके वर पाय करून त्या डोक्यावरच्या समुद्रातून जात असलेले दिसायचे! ही गंमत मी पाहत होतो, इतक्यात कॅ. नेमोच्या नोकराने बंदूक झाडली. मी चटकन वर पाहिले. एक मोठा अल्बाट्रॉस पक्षी पाण्याच्या पृष्ठभागावर झेप घालण्याच्या बेतात होता. तोच त्याला गोळी लागली आणि दुसऱ्याक्षणी त्याचे धूड पाण्यातून खाली घसरत आले. ते त्या नेमबाज शिकाऱ्याच्या पायाशीच पडले. कॅ. नेमोने त्याच्याकडे नुसती नजर फेकून त्याला धन्यवाद दिले आणि तेवढ्यामुळे तो अगदी खूष झाला.

दोन तास वाळूवरून चालल्यावर एक अति त्रासदायक असे गवताचे रान लागले. ते कसेबसे ओलांडल्यावर अर्ध्या मैलावरचा नॉटिलसचा प्रकाशझोत दिसू लागला. त्याच्या दिशेने आम्ही चाललो. मी नि कॉंझील कॅ. नेमोच्या मागे काही पावलांवर होतो. इतक्यात कॅप्टन आणि त्याचा खलाशी नोकर मागे वळून माझ्याकडे घाईघाईने येत असलेले मला दिसले. आपल्या दणकट हाताने नेमोने मला खाली पाडले आणि माझे डोके खाली दाबले. त्याच्या नोकराने कॉंझीलवर तोच प्रयोग केला. या आकस्मिक हल्ल्याचे कारण तरी काय असावे म्हणून आम्ही नवल करतो आहो, तो आमचे हल्लेकरी स्वतःही

भुईसपाट झाले आणि निश्चल पडले.

दुसऱ्याच क्षणी या प्रकाराचा अर्थ मला कळला. एक विराट आकृती माझ्या अंगावरून आस्ते आस्ते पलीकडे जात असलेली मला दिसली आणि माझे रक्त गोठल्याचा मला भास झाला. कारण ती आकृती म्हणजे शार्क मासा होता. पांढऱ्या पोटाचे नि उघड्या जबड्याचे असेच आणखी दोन-तीन शार्क त्याच्या मागोमाग निघून गेले. सुदैवाने त्यांना आम्ही दिसलो नाही, नाहीतर आपल्या तीक्ष्ण दातांनी आमचे कचाकच तुकडे केले असते!

ही शार्कची फलटण तिथून गेल्यावर आम्हाला किती हायसे वाटले म्हणून सांगू! आम्ही उठलो आणि प्रकाशाच्या अनुरोधाने वाट काढीत पाणबुडीजवळ पोचलो. आम्ही त्या गोल दरवाजातून आत शिरलो नि दरवाजा मिटला. एक कळ दाबताच त्यातले सर्व पाणी निघून गेले आणि मग कॅ. नेमोने एक खटका दाबताच आतला दरवाजा उघडून आम्ही पोशाख बदलण्याच्या खोलीत आलो.

त्या दिवशीच्या या झकास कार्यक्रमाबद्दल मी कॅप्टनचे मन:पूर्वक आभार मानले.

कॅ. नेमोने असे सागरतळीचे आणखी कितीतरी चमत्कार आमच्या कथानायकांना दाखवले. पण किती झाले तरी ते कॅप्टनचे कैदी होते. झाले का ते त्या कैदेतून मुक्त? की निराळ्याच एखाद्या संकटात पडले? कॅ. नेमो हा खरोखरीच 'समुद्र सैतान' होता का? या प्रश्नांची उत्तरे मिळवायची म्हणजे ज्यूल व्हर्नची ही कादंबरी संपूर्णच वाचायला हवी.

◆ ◆ ◆



चला पडू या पाताळात !

पृथ्वीच्या अन्तर्भागात भुयारे, गुंफा, विहिरी असतात आणि त्यात माणसे उतरलेली आहेत. पण किती खोल ? समुद्रसपाटीपासून जास्तीत जास्त पाऊण मैल खोली माणसाने गाठलेली आहे म्हणे. त्यापेक्षा जास्त निश्चितच नाही. सरळ सरळ पाऊण मैल खोली हीसुद्धा अंगावर शहारे आणणारी वाटते, नाही ?

पण आम्ही पृथ्वीच्या पोटात उतरलो, इतकेच नाही तर आत शेकडो मैल चालत गेलो हे सांगितले तर तुमचा विश्वास बसेल का ? नाही ! असले अद्‌भुत साहस आम्ही करू यावर माझादेखील सुरवातीला विश्वास बसला नव्हता. तुम्ही म्हणाल, मग हे आचरट धाडस केलंतच कशाला ? सांगू ? माझं उत्तर ऐकून तुम्ही आणखीनच चकित व्हाल. आम्ही पृथ्वीचा मध्य शोधायला

निघालो होतो! मी अन् माझे मामा. माझे नाव ॲक्सल.

माझे मामा प्रोफेसर लिडेनब्रॉक हे जर्मनीतले खनिजशास्त्राचे नामवंत प्राध्यापक. मोठे तऱ्हेवाईक, तापट स्वभावाचे गृहस्थ. पण तितकेच छांदिष्ट, एका जुन्या पुस्तकात त्यांना जीर्णशीर्ण कागदाचा एक तुकडा सापडला. कागदाचा म्हणण्यापेक्षा चामड्याचा. त्याच्यावर एका पुराण लिपीत लिहिलेला काही गुप्त मजकूर होता. खूप डोकेफोड करून त्यांनी ते कोडे सोडवले, तेव्हा लॅटिन भाषेतले शब्द तयार झाले. त्यांचा अर्थ पुढीलप्रमाणे होता -

"अरे निर्भय भूसंशोधका! जूनच्या अखेरीस स्काटा-
रिसची सावली स्नेफेल्स ज्योकुलच्या ज्या विवरावर
पडेल त्यात तू उत्तर, म्हणजे तुला पृथ्वीचा मध्य
गाठता येईल. मी स्वत: हे केले आहे."

आर्न साक्नुसम

आर्न साक्नुसम हा आइसलँडच्या इतिहासातला एक प्रख्यात वैज्ञानिक. सोळाव्या शतकातले वैज्ञानिक एकाच विषयावर आपली विद्या केंद्रित करीत असत - किमयेवर. आर्न साक्नुसम हाही एक नाणावलेला किमयागार होता. लोखंडाचे सोने करण्यासाठी तो अहर्निश धडपड करीत असे!

पण त्या किमयेचे जेवढे कौतुक आम्हाला वाटले नसते तेवढे या त्याच्या लोकोत्तर धाडसाचे वाटले. मी तर हा सारा प्रकार बनवाबनवीचा म्हणून उडवून लावला. आर्न साक्नुसमने म्हणे पृथ्वीचा मध्य गाठला! काहीतरीच - स्टुपिड! पृथ्वीचा व्यास आहे जवळजवळ ८००० मैल म्हणजे त्रिज्या ४००० मैल. पृथ्वीचा मध्य गाठायचा म्हणजे सरळ आत ४ हजार मैल उतरायला हवे. पृथ्वीच्या पोटात गुहा, विहिरी असतील, पण हिशेबातसुद्धा धरायला नको एवढी त्यांची खोली! ४००० मैल जायचे म्हणजे केवढी अवाढव्य पोकळी हवी! पृथ्वी पोकळ थोडीच आहे? ती तर भरीव आहे!

यावर 'कुणी सांगितलं भरीव आहे?' असे वसकन माझ्या अंगावर ओरडून मामांनीच मला वेड्यात काढले होते आणि ताबडतोब प्रवासाची तयारी करून सामानासह मला आपल्याबरोबर फरपटत आइसलँडला नेले होते. ती मे महिन्याची अखेर होती; म्हणजे जून अखेरीला अद्याप तब्बल महिना होता. पण आमच्या मामांना थोडाच धीर निघणार? तडकाफडकी तो ज्वालामुखीचा गारढोण देश गाठून त्यांनी हान्स नावाचा एक धट्टाकट्टा रंगेल तरुण वाटाड्या म्हणून ठरवलाही.

आइसलँडमध्ये स्नेफेल्स नावाचा सुप्त ज्वालामुखी आहे. त्याला एक नाही तर अनेक मुखे आहेत आणि एवढ्याचसाठी कोणत्या मुखात उतरायचे ते निश्चित कळावे म्हणून आर्न साक्नुसमने ती सूचक माहिती दिलेली होती. आम्ही स्नेफेल्स डोंगर सर्व बाजूंनी पायाखाली घातला. मग जूनच्या शेवटच्या आठवड्यात स्कार्टारिस पर्वताच्या अत्युच्च शिखराची छाया कोणत्या विवरावर पडते ते पाहिले आणि संपूर्ण तयारीनिशी आत उतरलो.

हे सहज बोलल्यासारखा मी लिहून गेलो खरा. पण पाताळलोकात उतरताना आम्हाला केवढे प्रयास पडले आणि किती जिवावरच्या प्रसंगांना तोंड द्यावे लागले ते आमचे आम्हाला माहीत! माझ्या मामांसारखे भूगर्भशास्त्राचे जाडे विद्वान आमच्याबरोबर होते म्हणून बरे. त्यामुळेच भूगर्भातले कोणत्या जातीचे खडक आपण तुडवतो आहो, कोणत्या मातीचे नि लाव्हा रसाचे थर आपल्याला दिसत आहेत त्याची आम्हाला कल्पना आली. कोटीकोटी, अब्ज वर्षांपूर्वीच्या अश्मीभूत प्राण्यांचे नि वनस्पतींचे नमुने आम्ही पाहिले. असंख्य भुयारांमधून आम्ही हिंडलो, इतकेच नाही तर आमचे भाग्य थोर म्हणून जीवनदात्री अशी एक पाताळातली 'नदी' आम्हाला सापडली. त्या प्रवाहाच्या कडेकडेनेच मग आम्ही आणखी खोल उतरत गेलो.

- २ -

ज्या वेळचे वर्णन मी आता करणार आहे त्यावेळी आमची ही अद्‌भुत यात्रा सुरू झाल्याला ४० दिवस लोटले होते. त्या ४० दिवसात आम्ही निघाल्या ठिकाणापासून ६०० मैल दूर आलो असून पृथ्वीच्या पोटात ९० मैल खोल उतरलो होतो. (म्हणजे आता फक्त ३९१० मैल उतरणे बाकी होते!) होकायंत्र नि वायुभारमापक यांच्या साह्याने हिशेब केल्यावर आम्हाला कळले की आपण सध्या अॅटलांटिक महासागराच्या खालून चाललो आहो.

चाललो आम्ही - डोकीवर तो प्रचंड समुद्र पेलीत आम्ही आणखी खोल उतरत चाललो. खडक फोडून आम्ही पाण्याचा एक झरा काढला होता आणि मग तो ज्या भुयारवाटेने वाहात खाली चालला त्या वाटेने आम्ही चाललो होतो. ती छोटी नदीच आम्हाला शक्य तेवढे खोल घेऊन जाईल अशी आमची कल्पना होती .आणि मग अकस्मात मला जाणीव झाली की आपले काहीतरी चुकते आहे. मी चपापल्यासारखा उभा राहिलो आणि आपल्याशी म्हणालो, 'हं! मी फार झपाट्याने चाललो की काय? मामासाहेब नि हान्स मागे पडलेले दिसतात.'

त्यांची आपली चुकामूक होऊ नये म्हणून मी आल्या वाटेने परत निघालो. पंधरा मिनिटे मी ते भुयार पालथे घातले पण मला त्यांचा पत्ता लागला नाही. 'मामा - मामा! हान्स! कुठे आहात तुम्ही?' म्हणून मी मोठमोठ्याने ओरडलो. पण मला उत्तर मिळाले नाही. त्या भीषण काळोखी भुयारात माझ्या हाकांचे एकामागून एक प्रतिध्वनी उठले. जणू माझाच आवाज मला वेडावत होता.

आता मात्र मला घाबरल्यासारखे झाले.

'ते काही नाही. मला शांत राहिलं पाहिजे.' मी मोठ्याने बोललो. 'ते मला सापडतील -नक्की सापडतील. रस्ता एकच तर होता आणि मी पुढे होतो. मागे

जाऊन पाहिलं की झालं!'

मी आणखी मागे गेलो. अर्धा तास मी त्यांना हुडकत होतो. हाका मारीत होतो. कानोसा घेत होतो तिथल्या दाट वातावरणात आवाज उत्तम प्रकारे ऐकू येत होता. पण इतके असून माझ्याखेरीज दुसऱ्या कुणाचाही किं वा कसलाही आवाज मला ऐकू येईना. त्या प्रचंड भुयारात सारे कसे सुन्न होते.

'ते काही नाही. आणखी मागे गेलं पाहिजे!' मी म्हणालो. 'दुसरा मार्गच नाही. भीती एकच आहे की त्या मंडळीच्या एखादवेळेस लक्षात नसेल की मी पुढे होतो. मी मागे पडलो असं समजून तेही जर मागे गेले - हंः! तरीसुद्धा त्यांना गाठता येईल. जरा धावलं म्हणजे झालं!'

हे शब्द मी पुन्हा पुन्हा उच्चारले स्वतःला धीर देण्यासाठी. आणि मग अकस्मात मला दुसराच एक संशय सतावू लागला. मी खरोखरच पुढे होतो का? खात्री आहे का माझी? हो, हान्स माझ्या मागून चालत होता आणि सर्वात शेवटी मामा होते. शंकाच नको त्याबद्दल. हान्स मध्येच थांबला होता अन् खांद्यावरचे ओझे सारखे करीत होता, तेही मला आठवले.

'शिवाय -' मी म्हणालो, 'इथे एक सच्चा वाटाड्या आहेच माझ्याजवळ. हा नदीचा प्रवाह! त्याच्या काठाकाठाने मागे गेलं की झालं!'

या विचाराने मला एकाएकी उत्साह वाटू लागला. आणखी मागे जाण्यापूर्वी पाण्याने तोंड स्वच्छ धुवावे म्हणून मी खाली वाकलो.

आणि पुतळ्यासारखे माझे पाय जमिनीला खिळले. वटारलेल्या भयभीत नेत्रांनी मी खाली पाहत होतो. तिथे थोडीशी कोरडी वाळू होती. पाण्याचा लवलेश नव्हता.

मला केवढ्या भयंकर निराशेने ग्रासले असेल त्याची तुम्हीच कल्पना करा. मी एका नव्वद मैल खोल भुयारात अक्षरशः गाडला गेलो होतो आणि मला साधेसुधे मरण लाभणार नव्हते. तहानेने नि भुकेने जीव कासावीस होऊन मी मरणार होतो. माझ्या तापलेल्या हातांनी माती चाचपून पाहिली-कोरडी

संपूर्णपणे कोरडी!

पण हे कसं झालं ? पायाखालची नदी कुठे गायब झाली ? मी भलतीकडे कसा भरकटत आलो ? बहुतेक असंच झालं असणार- वाटेत कुठेतरी दोन रस्ते फुटले असतील. अंधारात मला नदीचं भान राहिलं नसेल अन् भलत्या वाटेला मी आलो असेन.

आता त्यांचा शोध कसा लावायचा ? मी आतापर्यंत वज्रतुंड जातीच्या खडकावरून आलो होतो, पावलांच्या खुणासुद्धा उमटलेल्या नव्हत्या. अशा स्थितीत मी त्यांना किंवा त्यांनी मला शोधायचं तरी कसं ?

बालपणाच्या स्मृती माझ्या मनात गर्दी करू लागल्या. मन आपसूक देवाचा धावा करू लागले. मी गुडघे टेकून प्रार्थना केली आणि अंमळ शांत झालेल्या मनाने उठलो. काही झालं तरी हातपाय गाळून काही होणार नव्हतंच. डोकं ताळ्यावर ठेवून काय ते केलं पाहिजे.

तीन दिवस पुरेल एवढे अन्न माझ्या पिशवीत होते. बाटली पाण्याने भरलेली होती. असंच मागे मागे मागे गेलं पाहिजे. ज्या ठिकाणी ते दोन रस्ते फुटले ते ठिकाण गाठलं पाहिजे. तिथून मग नदीच्या काठाकाठाने वर जायचं. पुन्हा सहाशे मैल चालून स्नेफेल्स पर्वत गाठायचा.

उठलो. लोखंडी टोपण बसवलेल्या माझ्या काठीवर रेललो. पुन्हा मागे निघालो. मन प्रफुल्ल ठेवून बिलकूल न डगमगता.

अर्धा तास मला कोणताही अडथळा आला नाही. आणि मग एकाएकी माझी काठी खडकावर आपटली. समोरची वाट बंद झाली होती.

त्या क्षणी ज्या भीतीने अन् निराशेने मला ग्रासले त्याचे वर्णन करणे माझ्या शक्तीबाहेरचे आहे. मी अक्षरशः कोलमडलो. विजेच्या वातीचा कंदील हातातून खाली पडला. माझे सर्वांग घामाने डबडबून गेले.

शेवटी याच भुयारात मला मरण येणार का ? मन तरी असे विचित्र असते. घोर निराशेच्या त्या भयानक प्रसंगी एक खुळचट विचार माझ्या मनाला स्पर्शून

गेला. मी मरेन, माझे शरीर कुजेल अन् माझी हाडे या ठिकाणी पडतील. भविष्यकाळात कुणी संशोधक पाताळात उतरला तर नव्वद मैल खोल जागी पडलेला हा माणसाचा सांगाडा पाहून किती चकित होईल तो आणि काय काय तर्क बांधील ?

मी मोठ्याने बोलण्याचा प्रयत्न केला, पण सुकलेल्या घशातून नुसते घोगरे आवाज निघाले. धापा टाकीत मी उभा राहिलो.

तीव्र दु:खाच्या त्या प्रसंगी एक वेगळीच भीती माझ्या मनाचा कब्जा घेत होती. कंदील खाली पडून फुटला होता अन् विझण्याच्या बेतात होता. त्याच्या मंद बनत चाललेल्या वातीकडे मी पाहत होतो. भुयाराच्या भिंतींवरून सावल्यांची मिरवणूक चाललेली होती. मी माझ्या डोळ्यांनी ते अखेरचे दृश्य पिऊन घेत होतो.

शेवटी एक बारीक ठिणगी उरली. त्या ठिणगीकडे मी आधाशासारखा पाहत राहिलो. शेवटी ती ठिणगी पण पार विझून गेली आणि काळ्याकुट्ट काळोखाने मला गिळले.

आपण ज्याला अंधार अंधार म्हणतो तो कसला अंधार ? आत्ता मी ज्यात गुरफटलो होतो तोच खरा अंधार - प्रकाशाचा संपूर्णपणे अभाव ! असला अंधार पृथ्वीच्या पाठीवर कुठेही बघायला मिळायचा नाही.

मला वाटले, आपली दृष्टी कायमची गेली आता. आपण आंधळे झालो.

माझे डोळे गरगरायला लागले. वात झाल्यासारखा मी उठलो आणि त्या अंधारातून भ्रमिष्टासारखा ओरडत धावत सुटलो. भुयार नागमोडी होते, वाट खडकाळ होती आणि अंधार शंभर टक्के होता. पायांना अणकुचीदार दगड बोचत होते, कपाळ कुठे ना कुठे आपटत होते, हातापायांना धडका बसत होत्या. पडत होतो, उठत होतो, पुन्हा पडत होतो, उठत होतो आणि सारखा पिसाटपणे पळत होतो.

शेवटी माझे थकलेभागलेले रक्तबंबाळ शरीर कुठेतरी आपटले, खाली

कोसळले आणि माझी शुद्ध गेली.

- ३ -

मी शुद्धीवर आलो तेव्हा माझा चेहरा आसवांनी ओलाचिंब झालेला होता. कितीवेळ मी मूर्च्छावस्थेत होतो ते मला सांगता येणार नाही. सांगण्याचे साधन माझ्याजवळ नव्हते. असला भयानक एकांतवास - ईश्वरा, कुणाच्याही वाट्याला देऊ नकोस!.

रक्तस्राव बराच झालेला होता आणि कपडेही रक्ताने भरलेले होते. आपण मेलो नाही याचे मला दु:ख वाटले. कारण आता काय काय यातना वाट्याला येणार होत्या देव जाणे!

डोके अद्याप जड झालेले होते. पुन्हा शुद्ध हरपते की काय अशी भीती वाटत होती. इतक्यात एकाएकी माझ्या कानावर कसलातरी आवाज आदळला - मेघगर्जनेसारखा प्रचंड आवाज!

कितीतरी वेळ तो गडगडाट चालू होता!

कसला असेल हा आवाज? भूगर्भातला कसला तरी वायू पेट घेऊन फुटत तर नव्हता? एखादा दणदणीत स्फोट तर होणार नव्हता?

पुन्हा तसलाच आवाज होतो का म्हणून मी वाट पाहू लागलो. पण त्याची पुनरावृत्ती झाली नाही. भुयार पुन्हा शांत झाले होते. माझ्या छातीतली धडधडसुद्धा मला ऐकू येईनाशी झाली होती.

मी खडकाला कान लावलेला होता. अकस्मात मला आवाज ऐकू आला - शब्दांचा आवाज! दूर कुठेतरी उच्चारलेले, पुसट, अस्पष्ट पण शब्दच!

माझे अंग थरथर कापत असतानाच मी स्वत:ला बजावले, 'ऐकू नकोस!

लक्ष देऊ नकोस. हे शब्द नाहीत. हा भास आहे. श्रवण - चमत्कार आहे हा!'

पण नाही, मला ऐकल्याशिवाय थोडेच राहवते ? पुन्हा ऐकू लागलो-कान देऊन ऐकू लागलो.

आणि पुन्हा मला बोलणे ऐकू आले. कुजबुज, दूर कुठेतरी चालू होती. शब्द काय आहेत ते अजूनही उमगत नव्हते. पण कोणी तरी बोलत होते नक्की.

माझ्या दुबळ्या शरीराला ओढत फरफटत मी आणखी थोडे पुढे नेले. आता मला आवाज जास्ती स्पष्ट ऐकू येऊ लागला. मंद स्वरात कुजबुज चाललेली होती. पण त्यातला एक शब्द मला स्पष्ट कळला - 'पुढे' निराशेच्या स्वरात उच्चारलेला तो शब्द होता.

पण माझी आशा त्या शब्दाने पालवली. बोलताहेत, कोण बोलताहेत ? अर्थात माझे मामा नि हान्स. दुसरे कोण ? आणि त्यांचं बोलणं जर मला ऐकू येतं आहे तर माझंही त्यांना ऐकू जाईल. पाहावाच प्रयत्न करून -

मी माझी सर्व शक्ती एकवटून ओरडलो, 'मला सोडवा!'

आणि लगेच कानात प्राण आणून ऐकू लागलो. पण मला जबाब मिळाला नाही. कदाचित असं तर नसेल ? आपला आवाज दुबळा तर पडला नसेल ? पण असणार तेच! नव्वद फूट खोल दुसरं कोण आलं असणार ?

पुन्हा ऐकू लागलो. 'पुढे' हा शब्द परत कानावर पडला.

'हे आहे तरी काय ?' मी म्हणालो, 'हे आवाज काही खडकाच्या भिंतीतून येत नाहीत. हे सरळ भुयारातून येत आहेत. काहीतरी ध्यनिलहरींचा चमत्कार आहे हा ?'

मी पुन्हा ऐकू लागलो. या खेपेस मला माझे नाव उच्चारलेले स्पष्ट ऐकू आले. माझे मामा हान्सबरोबर काहीतरी वाक्य बोलले होते. त्यातला 'ॲक्सल' शब्द अजूनही माझ्या कानात घुमत होता.

आता मला कळले. भिंतीजवळ बोलून उपयोग नाही. भुयाराच्या मध्यभागी उभे राहून बोलले पाहिजे आणि ताबडतोब! ती मंडळी तेवढ्यात

हलून दुसरीकडे गेली तर आवाज त्यांना ऐकू जाईलच असे नाही.

तेव्हा भुयारात उभा राहून मी ओरडलो. 'मामा!'

आणि कान टवकारून सचिंतपणे उभा राहिलो. आवाजाचा वेग फार नाही हे तुम्हाला माहीत आहेच. तिथल्या दाट बनलेल्या हवेमुळे आवाजाची घनता किंवा तीव्रता वाढली होती, वेग वाढलेला नव्हता.

बरीच सेकंदे निघून गेली. मला तर ती युगांप्रमाणे वाटली आणि मग मला उत्तर मिळाले, 'ॲक्सल - ॲक्सल! तूच आहेस का?'

'होय, मीच!' मी म्हणालो.

'बिचारा! बेटा, तू आहेस तरी कुठे?'

'इथेच कुठेतरी अंधारात आहे! मला वाट सापडत नाही!'

'पण तुझा दिवा?'

'केव्हाच विझला!'

'पायाशी नदी तर आहे?'

'नाही. ती पण कुठेतरी गुल झाली!'

'ॲक्सल बेटा! घाबरू नकोस. धीर धर! आम्ही नदीच्या काठाने हिंडत होतो तुला शोधीत! इशारा म्हणून आम्ही बंदुकांचे बार केले. आपले आवाज कसल्यातरी शास्त्रीय चमत्कारामुळे एकमेकांना ऐकू येत आहेत. पण आपली हातमिळवणी होऊ शकत नाही. पण तू धीर सोडू नकोस!'

मी विचारात गढलो होतो. थोड्या वेळाने म्हणालो, 'अंकल!'

'काय रे बेटा?'

'आपण एकमेकांपासून किती दूर आहोत ते तरी कळलं पाहिजे!'

'ते काढणं सोपं आहे.'

'तुमच्याजवळ क्रॉनोमीटर आहे ना? प्रत्येक सेकंदावर लक्ष ठेवून माझं नाव उच्चारा. माझ्या कानावर तुमचा आवाज पडल्याबरोबर मी नाव उच्चारीन. तो आवाज तुम्हाला केव्हा ऐकू जातो याची तुम्ही नोंद करा. सेकंदन्

सेकंद, बरं का ?'

'करतो. म्हणजे एकंदर वेळाच्या निम्मा वेळ काढला की ते अंतर. असंच ना?'

'होय, तसंच. हं ... सुरू!'

'अॅक्सल!'....

माझ्या कानावर तो शब्द पडला न पडला तो मी पण म्हणालो, 'अॅक्सल!' आणि वाट पाहत बसलो...

'चाळीस सेकंद!' मामांकडून उत्तर मिळाले. 'आवाजाला जाऊन, येऊन चाळीस सेकंदं लागली. म्हणजे एका खेपेची वीस सेकंदं. आवाजाचा वेग सेकंदाला १०२० फूट आहे. म्हणजे वीस सेकंदांत झाले २०४०० फूट. म्हणजे जवळजवळ चार मैल.'

'चार मैल! बाप रे!'

'बाप रे करू नकोस. चार मैल तसे फार नाहीत.'

'पण मी आता वर चढू की खाली येऊ?'

'खाली! का ते सांगतो. आम्ही या क्षणाला खूप विस्तीर्ण अशा एका जागेत आहो. इथून पुष्कळसे भुयारी बोळ वर गेलेले आहेत. काच फुटल्यावर तडे जातात तसे या जागेचे तडे आहेत. तू ज्या भुयारात आहेस ते या तड्यांपैकीच असावं. तेव्हा तू आता ऊठ, चालायला लाग. तू थकला असशील तर फरफटत चाल. शेवटी तू आमच्याजवळ येणार याबद्दल खात्री असू दे - नीघ आता, पोरा - नीघ!'...

'अच्छा! मग आता तात्पुरता गुड बाय! वाटेत मी बोलू शकेन असं वाटत नाही....'

'नाही. पण आपण भेटणार हे नक्की!....'

हेच मी ऐकलेले शेवटचे शब्द. त्यानंतर गुडघे टेकून पुन्हा एकदा देवाचे उपकार मानले आणि निघालो. मला त्यावेळी लंडनच्या सेंट पॉल्स

कॅथीड्रलची आठवण होत होती. त्या मंदिरातल्या कुजबुजत्या बोळाबद्दल मी ऐकलेले होते. तसेच सिसिलीत सिराक्यूज गावी जी भुयारे आहेत त्यांचीही मला आठवण झाली. त्या भुयारात एका विवक्षित ठिकाणी उभे राहून एखादा शब्द उच्चारला तर दूर दुसऱ्या एका ठिकाणी पण त्याच विवक्षित ठिकाणी तो स्पष्ट ऐकू येतो.

भुयारातून मी खाली उतरू लागलो. उतार जवळ जवळ उभट होता म्हटले तरी चालेल. मध्येच सरपटत, मध्येच घसरत मी चाललो होतो. शेवटी माझा उतरण्याचा वेग चांगलाच वाढला. मला तो आटोक्यातच ठेवता येईना.

अकस्मात पायाखालची जमीन निसटली असल्याचा मला भास झाला आणि मी जो पडलो - पडलो - पडलो-

एका तीक्ष्ण कपारीला माझे डोके आपटले आणि पुनश्च आमची स्वारी मूर्च्छित पडली.

- ४ -

मी शुद्धीवर आलो तो अर्धवट काळोखाच्या धूसर वातावरणात. जाड अंथरुणावर मला निजवलेले होते अन् माझे मामा चिंतायुक्त नजरेने माझ्याकडे पाहत होते. मी डोळे उघडलेले पाहताच त्यांना जो आनंद झाला तो केवळ अपूर्व होता.

'जिवंत आहे - ॲक्सल जिवंत आहे -' ते हर्षभराने ओरडले. 'देवा - देवा - देवा -'

'होय, अंकल' मी क्षीण स्वरात पुटपुटलो. 'मी जिवंत आहे.'

'बेटा! देवाने वाचवलन् तुला!' इतक्या सद्‌गदित कंठाने बोलताना मामांना मी कधीही ऐकले नव्हते. यापूर्वी त्यांच्या डोळ्यांत अश्रू तर मी कधीच

पाहिले नव्हते. हान्स माझ्या अंथरूणाज़वळ आला. त्यालाही विलक्षण हर्ष झालेला त्याच्या प्रसन्न मुखावर दिसत होता.

'गुड डे हान्स! गुड डे!' मी म्हणालो.

'बेटा ॲक्सल! हा डे नाही. ही नाइट आहे. आज रविवार ऑगस्टची नऊ तारीख आहे आणि आता तू विश्रांती घ्यायची आहे. १० ऑगस्टपर्यंत एक शब्दही तू उच्चारायचा नाही.'

मी निमूटपणे मामांची आज्ञा पाळली आणि गाढ झोपी गेलो. दुसऱ्या दिवशी सकाळी उठून पाहतो तो ही जागा म्हणजे एक रमणीय गुंफा आहे. तिच्या छताला पाषाणाचे शूल झुंबरासारखे लोंबत आहेत. जमिनीवर रेशमासारखी मुलायम वाळू पसरलेली आहे. अंधार फारसा नव्हता. संधिप्रकाशासारखे वातावरण होते आणि तरी एकही दिवा किंवा मशाल पेटलेली नव्हती. पण दुरून कुठूनतरी प्रकाशाचे रुंद पट्टे फटीतून आत घुसलेले होते. इतकेच नाही तर कानांवर दुरून येणारा कसाला तरी मंजुळ ध्वनी पडत होता.

'ही तर वाऱ्याची सळसळ अन् लाटांची खळखळ वाटते!' मी आपल्याशी म्हणालो, 'प्रवास पुरा करून मामा परत वर आले की तो नाद अर्धवट सोडून आले?'

माझे मन या रहस्याबद्दल विचार करीत आहे तोच मामा तिथे आले आणि त्यांनी माझे प्रसन्न मुद्रेने स्वागत केले.

'बरी आहे ना तब्येत, ॲक्सल?'

'उत्तम!' मी अंथरुणात उठता होऊन म्हणालो.

'सुधारलीच पाहिजे. तुला भरपूर झोप मिळालेली आहे. या हान्सने दिलेलं एक विलक्षण मलम चोपडून आम्ही तुझ्या जखमा बऱ्या करीत आणल्या आहेत. मोठा मजेदार माणूस आहे हा हान्स!'

मामांनी मला फराळाचे दिले, ते खाता खाता मी त्यांच्यावर प्रश्नांचा

भडिमार केला. त्यांनी दिलेल्या उत्तरांवरून मला कळले की काल मी जो खाली पडलो तो विहिरीत पडावे तसा सरळ खाली पडलो होतो. माझ्या पायाखालचे दगड घसरले होते अन् त्यांचा एक धबधबाच मला घेरून खाली आला होता. त्यात मी एका मोठ्या खडकाला कवटाळले होते म्हणूनच केवळ वाचलो होतो. खाली मऊ ठिसूळ वाळूत पडल्यामुळे मला हादरा जास्त जाणवला नव्हता. मामांनी मला रक्तबंबाळ स्थितीत ताबडतोब उचलून बिछान्यावर निजवले होते.

'ॲक्सल! आता पुन्हा असं करू नकोस.' मामा कळकळीने म्हणाले. 'काय वाटेल ते झालं तरी आपण तिघांनी एकमेकांपासून फुटता कामा नये. बरोबर राहिलं पाहिजे.

'पण - पण -' मी आश्चर्याने सभोवार पाहात म्हणालो, 'अंकल! माझी प्रकृती आता ठीक आहे म्हणता?'

'असं का विचारतोस? जखमा आहेतच अजून. पण त्या भरतील!'

'या जखमांचं नाही म्हणत मी! माझ्या डोक्या -'

'डोक्यालाही जखमा झाल्या आहेत. पण काळजी करण्यासारख्या नाहीत.'

'जखमांचं नाही हो अंकल!' मी म्हणालो, 'मला भीती अशी वाटते की माझ्या डोक्यावर परिणाम झालेला असावा! मला सारखं असं वाटतंय की आपण पाताळलोकाकडून परत भूपृष्ठावर गेलो.'

'छे छे छे! आपण जवळ जवळ शंभर मैल खोल आलो आहो.'

'पण मग मला वाऱ्याचा आवाज अन् लाटांची खळबळ ऐकू येते आहे ते कसं?'

मामा खूप मोठ्याने हसले आणि म्हणाले, 'ती एक जंमत आहे! पण तुझ्या अंगात अजून शक्ती यायला हवी. उद्या दाखवीन ती जंमत मी तुला आणि मग तुला कबूल करावं लागेल की आपल्या भूगर्भवेत्त्यांना अजून खूप खूप

शिकायचं आहे!'

दुसऱ्या दिवशी सकाळी मामांनी मला हात धरून त्या गुंफेच्या बाहेर नेले. पहिल्याने मला काहीच दिसेना. उजेडाची सवय नसलेले माझे डोळे पार दिपून गेले. डोळ्यांची मी कितीतरी वेळ उघडझाप करीत होतो. शेवटी एकदाचा दृष्टीला सराव झाला आणि मग समोर दिसणारे भव्य दृश्य पाहून मी इतका स्तंभित झालो की कितीतरी वेळ माझ्या तोंडून शब्द निघेना.

माझ्या पुढ्यात एक अतिप्रचंड असे सरोवर पसरलेले होते. सरोवर होते की समुद्र होता कुणास ठाऊक! कारण जिथवर दृष्टी पोचत होती तिथवर पाहिले तरी त्याचा शेवट दिसत नव्हता. दूर क्षितिजाला जाऊन भिडलेला तो एक अफाट जलाशय होता. त्याच्या किनाऱ्यावर सोनेरी रंगाची मऊ मऊ वाळू पसरलेली होती. उजव्या हाताला काही अंतरावर विराट अशा भुईछत्रांचे अरण्य होते आणि सर्वांत आश्चर्याची गोष्ट म्हणजे डोक्यावर खडकाचे छत कुठेही दिसत नव्हते. वरती खूप खूप मैलांवर खडक असतीलही. पण नजर पोचत होती तो डोक्यावरचा भाग तर आकाशासारखा निळाशार दिसत होता.

'देवा, देवा, देवा!' मी उद्गारलो. 'काल मी तुझ्याजवळ मरणाची याचना करीत होतो. बरं झालं माझी प्रार्थना तू मानली नाहीस. नाहीतर हे अद्भुत रमणीय दृश्य कुठून बघायला मिळालं असतं!'

पण प्रिय वाचकहो! ॲक्सलला याहीपेक्षा अद्भुत असे आणखी कितीतरी चमत्कार बघायला मिळणार होते. त्या सर्वांचे वर्णन एवढ्याशा जागेत कसे करणार? त्यासाठी ज्यूल व्हर्नची पाताळलोकाची ती कादंबरी समग्रच वाचायला हवी!

♦ ♦ ♦



बलून बहाद्दर

"**का**य पागल इसम आहे! सबंध आफ्रिका खंड म्हणे बलूनमधून ओलांडणार! छी छी छी! या आत्मघातकी वेडापासून याला मागे खेचलंच पाहिजे!' असे म्हणून केनेडीने तडकाफडकी पोशाख चढवला आणि पहिली आगगाडी पकडून तो एडिंबरोहून लंडनला जायला निघाला.

डिक केनेडी हा एक शूर, दिलदार अन् दृढनिश्चयी स्कॉटिश तरुण होता. ज्याला त्याने 'पागल' म्हणून संबोधले तो त्याचा परममित्र लंडनचा डॉ. फर्ग्युसन. केनेडी हा सहा फूट उंचीचा आडदांड पुरुष होता, तर डॉ. फर्ग्युसन हा मध्यम उंचीचा भावनाप्रधान अभ्यासू गृहस्थ होता. दोघांच्या स्वभावात भिन्नता असली तरी त्यांची मैत्री जीवश्च कंठश्च होती. धाडसाची आवड

दोघांच्याही रोमारोमात भिनलेली. त्यांच्या मैत्रीला बऱ्याच वर्षांपूर्वी हिंदुस्थानात सुरुवात झाली, दोघेही त्यावेळी सैन्यात होते. दोघांनाही शिकारीचा नाद भयंकर. पण केनेडी वाघसिंहाची शिकार करी तर डॉ. फर्ग्युसन कीटकांची करी. प्राणिशास्त्राचे संशोधन हा फर्ग्युसनचा आवडता विषय. त्यात एकदा हा गृहस्थ सापडला की देहभान विसरत असे. गेली दोन वर्षे त्याचे हे संशोधन चालू होते. पण आता एकाएकी त्याच्या साहसी वृत्तीने उचल खाल्ली होती. एक बेफाम धाडस करण्याचे त्याने ठरवले होते.

शंभर वर्षांपूर्वी आफ्रिका खंड हा एक अज्ञात प्रदेश गणला जात असे. फक्त उत्तरेकडचा ईजिप्त अन् किनाराभाग, नाइल नदीचा मुखप्रदेश तसेच पूर्व किनाऱ्यावरचा बराचसा प्रांत याचीच तेवढी युरोपीय प्रवाशांना माहिती होती. नाइल नदीचा उगम शोधण्यासाठी पैज मारून कितीतरी शूर तरुण गेले होते. त्यांतले काही प्राणाला मुकले, काही हार खाऊन परत आले तर काहींचा पत्ताच लागला नाही. मध्य आफ्रिकेतले श्वापद-कीटकांनी गजबजलेले काँगोचे भयाण जंगल अजून कोणी तुडवलेले नव्हते किंवा कोणी तुडवले तरी तो जिवंत परत आला नव्हता. आफ्रिकेचे रहस्य उलगडण्यासाठी ज्यांनी सर्वस्वावर पाणी सोडले अशा नरवीरांची यादी केली तर तीत दीडशेच्या वर नावे घालावी लागतील. आपल्याला फक्त स्टॅन्ले- लिव्हिंग्स्टन माहीत आहेत.

आणि आता हे प्रकांडपंडित डॉ. फर्ग्युसन त्या कागिरीवर निघाले होते. मात्र दाट जंगले नि अवघड वाटा पायाखाली घालण्याचा त्यांचा मनोदय नव्हता. हवाई मार्गाने निरंकुशपणे उडत जायचे असे त्यांनी ठरवले हाते. त्यांचे वाहन होते बलून!

लक्षात ठेवा. बलून ही त्या काळात एक नवलाईची वस्तू होती. वारा अनुकूल असेल तेव्हा बलूनमध्ये बसून थोडे अंतर तोडण्याचे प्रयत्न काही धाडसी लोकांनी केले होते. त्यात काही घायाळ झाले तर एक नुकताच प्राणाला मुकला होता. हवेपेक्षा जड असे विमान नामक वाहन तर कोणाच्या

कल्पनेतसुद्धा नव्हते. पण फर्ग्युसन जिवाची तमा करणारा माणूस नव्हता. त्याने ठरवले की आफ्रिकेच्या पूर्व किनाऱ्यावरील झांझीबार बेटातून बलून उड्डाण करायचे आणि आफ्रिकेच्या अंतर्भागात शक्य तितका दूर खोल प्रवेश करायचा. किती दूर, किती खोल ते अद्याप ठरायचे होते. डॉक्टरसाहेब स्वत: पश्चिम किनाऱ्यापर्यंत जायला तयार होते. पण बलून - प्रवास ही कोणाच्या हातची गोष्ट नाही. बलून विमानासारखे वाटेल तसे वळवता येत नाही, वारा नेईल तिकडे जाणे त्याला भाग असते. आणि तरी वातावरणात हजार फुटांवर गेले की अनेक प्रकारच्या वायुलहरी किंवा वायुमार्ग लागतात हे डॉ. फर्ग्युसनना माहीत होते. त्यापैकी आपल्याला हव्या असलेल्या मार्गावर बलून नेले की आपण सरळ रेषेत पश्चिमेकडे जाऊ शकू असा त्यांना विश्वास वाटत होता. पण तरी त्यांचे हे धाडस माथेफिरूपणाचेच होते. केनेडीने लंडनला पोचल्याबरोबर त्यांना गाठले आणि त्यांची खरमरीत हजेरी घेतली.

'हे काय चालवलंय, डॉक्टरसाहेब?' तो ओरडला.

'काही नाही. तू शांत हो, स्वस्थ बैस अन् मी काय सांगतो ते ऐकून घे -' डॉ. फर्ग्युसन म्हणाले, 'तुला माहीत आहेच की आता या क्षणाला काही मंडळी आफ्रिकेत नवा प्रदेश शोधून काढायला निघाली आहेत. त्यातले काही नाइल नदीच्या उगमाकडे जात आहेत -'

'पायी ना?'

'होय, पायी.' केनेडीच्या व्याजोक्तीकडे दुर्लक्ष करून डॉ. फर्ग्युसन म्हणाले, 'आणि काही मध्यआफ्रिकेत जात आहेत. विषुववृत्ताला लागून खाली इज्योल नदी वाहते, तिच्या काठाकाठाने डॉ. क्राफ्ट जाणार आहेत आणि बॅरन देकन यांनी केनिया नि किलि - मांजारोचे पर्वत पायाखाली घातले असून तेही आता मध्य आफ्रिकेकडे निघाले आहेत.'

'ते पण पायीच ना?'

'होय. पायी किंवा खेचरावर बसून. पण आपण त्या सगळ्यांवर मात करू.

आपण बलूनमधून त्यांच्या आधी तिथे पोचू.'

'आपण?'

'होय, तू पण माझ्याबरोबर चल. तू, मी नि ज्यो.'

ज्यो हा डॉ. फर्ग्युसनचा निष्ठावंत नोकर होता. त्याला 'तू माझ्याबरोबर चल' म्हणून सांगावेच लागत नसे. मालक कुठेही जायला निघाला की ही स्वारी आपली पिशवी भरून त्याच्या मागे हजर असायची. त्याला कुरकुर करणे माहीतच नव्हते. मालकाचे मन, त्याच्या आवडीनिवडी तो बरोबर ओळखायचा अन् त्यांना अनुसरून वागायचा. मालकाचाही त्याच्यावर संपूर्ण विश्वास होता आणि त्या विश्वासाचा त्याने कधीही दुरुपयोग केला नाही. स्वभावाने अतिशय आनंदी, खट्याळ अन् चपळ. लंडनच्या प्राणिसंग्रहालयात जो माकडांचा पिंजरा आहे त्याच्यावर एखादा स्वतंत्र अधिकारी नेमण्याची पाळी आली असती तर कोणीही ज्योची निवड केली असती!

डॉ. फर्ग्युसनचे बलून मिचेल बंधूंच्या कारखान्यात तयार होत होते. हे बलून म्हणजे एक प्रचंड व्याप होता आणि डॉक्टरसाहेबांनी अगदी काटेकोरपणे गणित करून त्याची टिपणे केली होती. माणसे नि आवश्यक सामान मिळून कमीतकमी ४००० पौंड वजन नेणे त्यांना भाग होते. त्या अंदाजाने फुग्यसाठी रेशीम किती लागेल, दोऱ्या किती लांबीच्या, किती मजबूत हव्यात, परडे केवढे हवे वगैरे सर्व हिशेब त्यांनी केला होता. खरे म्हणजे आपल्या बलूनला एकात एक असे दोन फुगे जोडण्याचा प्रयोग ते करणार होते. त्यापैकी आतल्या फुग्यात ६७००० घनफूट हायड्रोजन वायू ते भरणार होते.

डॉ. फर्ग्युसन यांनी कागदावर मांडलेली वजने पुढीलप्रमाणे होती:

वस्तू: व्यक्ती	वजन पौंड
फर्ग्युसन	१३५
केनेडी	१५३

ज्यो	१२०
बाहेरचा फुगा	६५०
आतला फुगा	५१०
जाळे व परडे	२८०
नांगर, हत्यारे, बंदुका, पांघरुणे, भांडीकुंडी	१९०
खाद्यपेये	३८६
पाणी	४००
इतर सामान	७००
फुग्यातला वायू	२७६
वाळूची पोती	२००
एकूण	४०००

बलून जास्त उंचीवर न्यायचे झाले तर काहीतरी जड वस्त फेकून देऊन बलूनचे वजन कमी करण्याची प्रथा होती. तेवढ्यासाठी ही दोनशे पौंड वजनाची वाळूची पोती होती. पण त्यांचा उपयोग डॉ. फर्ग्युसन यांना फारसा करावा लागणार नव्हता. कसे ते पुढे कळेल.

आपला मित्र अगदीच ऐकत नाही असे पाहून केनेडी अखेरीस त्याच्याबरोबर बोटीने झांझीबारपर्यंत गेला. तिथे त्याचे मन वळवण्याचा एक शेवटचा प्रयत्न त्याने केला. पण फर्ग्युसननी बिलकुल दाद दिली नाही. ठरलेल्या दिवशी सुप्रभाती या 'व्हिक्टोरिया' नामक बलूनने झांझीबारहून उड्डाण केले. सांगण्याची विशेष गोष्ट ही की डॉ. फर्ग्युसननी योजल्याप्रमाणे त्यात तीन प्रवासी होते - ते स्वतः, ज्यो आणि केनेडी!

- २ -

आणि हवेच्या लाटांवर तरंगत बलून १५०० फूट उंचीवर पोचले. आणि मग जरा नैऋत्य दिशेला सरकल्याबरोबर एक मोठा रमणीय देखावा आमच्या प्रवाशांच्या नजरेला पडला. झांझीबारचे सबंध बेट त्यांना स्वच्छ दिसत होते. काळ्या रंगाचा तो एक थापटका लंबगोल वाटत होता. शेते म्हणजे निरनिराळ्या रंगांचे चौकोन होते. जिथे वृक्षांची विशेष गर्दी दिसत होती तो जंगलभाग होता. बेटावरचे रहिवासी मुंग्यांप्रमाणे छोटे दिसत होते. त्यांनी आरोळ्या ठोकून या मंडळींना निरोप दिला होता. ते आवाज हळूहळू वातावरणात विरून गेले होते. फक्त यांच्या प्रयाणसमयी जी तोफ डागण्यात आली होती तिच्या ध्वनीलहरींनी अजून बलूनचा अंतर्भाग कंप पावत होता. बाकी सर्व शांत होते. त्या शांततेचा भंग पहिल्याने ज्योने केला.

'आहाहा! किती सुंदर दृश्य हे!' तो उद्गारला, 'पाहिलंत?'

त्याला उत्तर मिळाले नाही. डॉक्टरसाहेब वायुमापक यंत्रातले फेरफार पाहण्यात गर्क होते तर केनेडीचे डोळे जरी बाहेर लागले होते तरी तो आत्मानंदात तल्लीन झाला होता.

सूर्यकिरणांनी गॅसची नळी तापली होती आणि बलूनचा फुगवटा वाढला होता.

२५०० फुटांवरून खाली बंदरात उभी असलेली आगबोट एखाद्या लहान होडक्यासारखी दिसू लागली. आफ्रिकेचा पूर्व किनारा म्हणजे शुभ्र धवल फेसाची एक लांबच लांब धार वाटू लागली.

'तुम्ही कुणी बोलत का नाही?' ज्योने विचारले.

'कारण आम्ही पाहतो आहो' डॉ. फर्ग्युसनने आपली नजर खाली भूखंडाकडे वळवून म्हटले.

'मला राहवत नाही बुवा! मी पाहत असलो तरी बोलणार!'

'बोल की ! तुला हवं तेवढं बोल !'

आणि ज्यो बोलत राहिला. मनमोकळ्या हर्षोद्गारांची त्याने नुसती खैरात उधळून दिली.

बलूनचा वेग ताशी आठ मैलांचा असेल. निघाल्यापासून दोन तासांनी ते पूर्व किनाऱ्यावरच्या म्रिया प्रांतावर पोचले. या ठिकाणी त्यांना आमरायांची दाटी दिसली. हिंदी महासागर मोठमोठ्या आम्रवृक्षांची पाळेमुळे कुरडताना दिसला. किनाराभाग खाड्यांनी नि डबक्यांनी गजबजलेला होता. वायव्येकडे अंगुरू पर्वताने डोके वर काढले होते. खाली एक लहान खेडे दिसत होते. नकाशात पाहून डॉ. फर्ग्युसननी त्याचे नाव सांगितले - काओले. खेड्यातले अडाणी लोक त्यांच्या विचित्र वाहनाकडे सभय आश्चर्याने पाहत उभे होते. कोणी त्यांना बाण मारण्याचा प्रयत्न केला पण बाण इतक्या उंचीपर्यंत पोचलेच नाहीत.

'झकास वाहन आहे आपलं ! याच्यापुढे घोडागाडी काहीच नाही.'

'आगबोटसुद्धा यापुढे तुच्छ वाटते !'

हा प्रवास आगगाडीपेक्षा छान वाटतो. कारण आगगाडी झपाट्याने पुढे धावत असते. निसर्गाची दृश्यं बघायला मिळत नाहीत ! या बलूनमधून सारं काही शांतपणे पाहता येतं !'

'न्याहारी करूया का आपण ?' ज्योने हळूच प्रश्न केला. सर्वांना ती कल्पना एकदम पसंत पडली.

'आणि कॉफी ?'

'अवश्य !' डॉ. फर्ग्युसन म्हणाले.

'वायुनलिकेतून थोडा गॅस जळणासाठी घेणार आहोच आपण ! तेवढ्याने बलून पेटबीट घेईल अशी बिलकूल भीती नाही. नळ्या हवाबंद केलेल्या आहेत.'

'तरीपण जर पेटलं तर भयंकर स्थिती होईल आपली नाही ?'

'मला नाही वाटत. गॅस पेटला तरी हळूहळू पेट घेईल आणि आपण मंद गतीने खाली उतरू.'

'व्हिक्टोरिया' बलूनसाठी डॉ. फर्ग्युसननी वापरलेला गॅस म्हणजे सर्वात हलका जो हायड्रोजन वायू तो होता हे आम्ही सांगितलेच आहे, आणि बलून वरखाली नेण्यासाठी त्यांनी वापरलेली क्लृप्ती अगदी अभिनव अशी होती. त्यांच्या बलूनमधला वायू दाबून घट्ट केलेला होता. तो हवा तसा घन किंवा विरळ करण्याची यंत्रणा त्यात होती. वायुमान घट्ट असेल तेव्हा बलून खाली येई आणि ते पातळ असेल तेव्हा बलून वर जाई. यामुळे वेळप्रसंगी वजन बाहेर फेकून बलून हलके करण्यासाठी जी वाळूची पोती घेतलेली होती त्यांचा अपव्यय टळणार होता. अगदीच आणीबाणीच्या प्रसंगी वापरण्यासाठी ही पोती होती.

'व्हिक्टोरिया' चा प्रवास मोठ्या मजेत चालू होता. सुरवातीच्या त्या सर्वच प्रवासाचे वर्णन आम्ही इथे देत नाही. एवढेच सांगतो की दोन दिवसांत बलूनने ५०० मैल अंतर तोडले आणि आफ्रिकेच्या अंतर्भागातले काझे गाव गाठले.

'हे गाव गाठायला' डॉ. फर्ग्युसननी माहिती दिली, 'कॅप्टन बर्टन आणि स्पीक या भूसंशोधकांना साडेचार महिने लागले होते!' काझे गाव म्हणजे मध्य आफ्रिकेतले एक महत्त्वाचे ठाणे आहे. त्याला शहर म्हणता येणार नाही. अफाट पसरलेल्या सहा मोहल्ल्यांचा तो एक समुदाय आहे म्हणा. या वस्तीत लहान मोठ्या झोपड्या आहेत. लहान झोपड्या गुलामांच्या, मोठ्या मालकांच्या. विस्तीर्ण पटांगणे नि बागा आहेत. कांदे, बटाटे, वांगी, भोपळे नि पालेभाज्या यांचे भरपूर पीक इथे निघते. मध्यभागात ओमानी जातीचे लोक रोहतात. ते मूळ अरबी रक्ताचे आहेत आणि कित्येक वर्षे आफ्रिकेच्या अंतर्भागापर्यंत त्यांनी व्यापार केलेला आहे. बंदुका, हस्तिदंत, कापडचोपड नि गुलाम या त्यांच्या व्यापारी वस्तू होत!

पूर्व किनाऱ्याकडून, तसेच दक्षिण अन् उत्तर या भागातून येणारे कारवान-

खेचरांचे नि गाढवांचे तांडे काझे गावी थांबतात. बाजारपेठ सदैव गजबजलेली असते. ढोलक्यांचे नि शिंगांचे कर्कश ध्वनी, जनावरांचे खिंकाळणे अन् मिश्र-जातीय हमालांचा आरडाओरडा यांची तिथे एकच धमाल उडालेली असते.

आजही तिथे असाच गलबला सुरू होता. पण हे चमत्कारिक वाहन तिथल्या आकाशात येऊन थडकताच तो एकदम थांबला आणि दुसरीच गडबड उडाली. सर्व लोक आ करून मोठाल्या डोळ्यांनी वर पाहू लागले. हा काय प्रकार आहे तेच त्यांना कळेना. कितीतरी वेळ कोणाच्याही तोंडून एक अक्षर निघाले नाही. मग एकमेकांकडे पाहून त्यांनी गंभीरपणे माना हलवल्या आणि आपापल्या खोपटात पळ काढून दारे बंद करून घेतली.

'हे असंच चाललं तर या लोकांशी व्यापारी संबंध जोडणं आपल्याला अशक्य होईल !' केनेडी म्हणाला.

'त्यांच्याशी व्यापारी संबंध जोडणं अगदी सोपं आहे' ज्यो म्हणाला, 'निमूटपणे खाली उतरायचं, त्यांच्या वस्तू उचलायच्या अन् आलो तसं निघून जायचं!'

'हे लोक घाबरलेले आहेत' फर्ग्युसननी आपले मत सांगितले, 'पण त्यांची चौकसबुध्दी अन् अंधश्रध्दा त्यांना स्वस्थ बसू देणार नाही. लवकरच ते परत येतील!'

'असं वाटतं तुला?'

'खरं काय ते कळेलच की आता. पण आपण फार जवळ न गेलेलं बरं. एखादा बाण किंवा बंदुकीची गोळी आपल्या स्वागताला यायची!'

'मग निघूनच गेलेलं काय वाईट? की तुला या लोकांशी काही बोलायचं आहे?' केनेडीने विचारले,

'जमलं तर बोलू की! काय हरकत आहे?' फर्ग्युसन म्हणाला. 'बर्टन नि स्पीक यांना या लोकांनी चांगलं वागवलं होतं. प्रयत्न तर करून पाहू!'

व्हिक्टोरिया बलून खाली येत असता त्याचा एक नांगर एका वृक्षाच्या

शेंड्यात अडकला. आणि फर्ग्युसनने तर्क केल्याप्रमाणे त्याच सुमाराला लपून बसलेले गावकरी हळूहळू घराबाहेर आले. त्यांत शंखशिंपलांचे दागिने घातलेले कित्येक 'वागांझा' होते. वागांझा म्हणजे जादूटोणा करणारे चेटूक डॉक्टर! त्यांच्या कंबरपट्ट्यात लहान लहान काळे कमंडलू लटकत होते. त्यात मंतरलेली औषधे होती. त्या औषधांचे हात लागून त्यांचे कपडे मेणचट तेलकट बनलेले होते.

हळूहळू 'व्हिक्टोरिया' भोवती लोकांचा घोळका जमला. स्त्रिया, पुरुष, मुले सर्व मोठ्या उत्सुकतेने पण भीत भीत पुढे येऊ लागली. मग जोरजोरात ढोलकी वाजू लागली आणि लोकांनी वर बलूनकडे डोळे लावून टाळ्या पिटल्या.

'त्यांची पूजा करण्याची पध्दत दिसते आहे ही!' डॉ. फर्ग्युसन म्हणाले, 'मला वाटतं, आपल्याकडून ते काही तरी मोठी अपेक्षा करीत असावेत.'

'मग पुरी करूया आपण ती अपेक्षा!' ज्यो म्हणाला.

'हं!म्हणजे आपल्याला देव बनलं पाहिजे.-ज्यो,तुलासुद्धा!'

ज्यो खुषीत येऊन म्हणाला, "माझी काही हरकत नाही देव व्हायला.'

त्याच क्षणी एका पुढाऱ्याने हाताचा इशारा केला. लगेच सर्व गोंगाट एकदम बंद झाला. सर्वजण गप्प होऊन उभे राहिले. पुढाऱ्याने त्यांना उद्देशून काही तरी भाषण केले. पण ती भाषा आमच्या लोकांना कळली नाही. हे लक्षात येताच तो माणूस अरबी भाषेत काही तरी बोलला आणि डॉ.फर्ग्युसननी ताबडतोब त्याला अरबीत उत्तर दिले. मग त्या माणसाने एक मोठे स्तुतीपर भाषण केले. त्याचा मथितार्थ हा की व्हिक्टोरिया बलून म्हणजे या मंडळींना खुद्द आकाशातून खाली उतरलेला चंद्र वाटत होता. आपल्या तीन सुपुत्रांना घेऊन चंद्रदेवाने त्यांच्या गावाला दिलेली ही भेट होती. आफ्रिका हा वस्तुत: सूर्याचा आवडता प्रदेश. त्याला चंद्राने भेट द्यावी हा ओमानी लोकांचा मोठाच बहुमान होता. तो आपण कधीही विसरणार नाही अशी पुढाऱ्याने आपल्या

भाषणात ग्वाही दिली.

त्यावर डॉक्टरसाहेबांनी मोठ्या ऐटीत उत्तर दिले, 'ठीक आहे. दर हजार वर्षांनी चंद्रदेव तुमच्या प्रांतात भक्तांना दर्शन देण्यासाठी येत असतो! बोला, तुम्हाला काय पाहिजे?'

पुढारी म्हणाला,' आमचे मवानी म्हणजे सुलतानसाहेब- अनेक वर्षे बीमारीने अंथरूणाला खिळून आहेत. आपण प्रत्यक्ष औषधीपतीचे चिरंजीव. आपण त्यांच्या रुग्णाशय्येला भेट दिली तर उपकार होतील!'

ही मागणी फर्ग्युसनने आपल्या सोबत्यांना समजावून सांगितली तेव्हा केनेडी म्हणाला, 'या नीग्रो राजाकडे तुम्ही जाणार की काय, डॉक्टरसाहेब ?'

'अर्थात! ही माणसं भली वाटतात. वातावरण शांत आहे. वारा बिलकुल सुटलेला नाही. बलूनबद्दल आपल्याला काळजी बाळगण्याचं कारण नाही.'

'पण-पण-करणार काय तुम्ही जाऊन ?'

'ते तिथे गेल्यावर पाहीन. माझ्याजवळची औषधं उपयोगी पडली तर देईन त्याला.'

मग लोकांना उद्देशून डॉ.फर्ग्युसन म्हणाले, 'तुमच्या लाडक्या राजावर चंद्रदेवाने कृपा केली आहे. हे आम्ही आलो!'

- ३ -

लगेच जमलेल्या लोकांनी आनंदाचा जयघोष केला आणि तो प्रचंड जमाव मुंग्यांच्या थव्याप्रमाणे एका विशिष्ट दिशेने चालू लागला. ''मित्रांनो,'' डॉ.फर्ग्युसन म्हणाले,'' आपण कोणत्याही प्रसंगाला तोंड देण्याची तयारी ठेवली पाहिजे. एखादवेळेस क्षणार्धात इथून आपल्याला प्रयाण करावं लागेल. डिक, तू बलूनमध्येच बसून रहा अन् गॅसच्या नळ्या थोड्या प्रमाणात तापलेल्या

ठेव. नांगर घट्ट बांधलेला आहे, तेव्हा भीती नाही. मी नि ज्यो शिडीवरून खाली उतरतो. पण ज्यो माझ्याबरोबर येणार नाही. तो शिडीच्या खालच्या पायरीपाशी उभा राहील.'

'म्हणजे तुम्ही एकटे जाणार की काय?'

'साहेब, मला तरी येऊ द्या!' ज्यो म्हणाला.

'नाही. मी एकटाच जाणार! आपल्याकडे चंद्रदेव आला आहे अशी या शूर लोकांची समजूत झालेली आहे. त्यांच्याकडून मला कोणताही त्रास पोचणार नाही.'

लोक आता अधीर बनले होते. गलबला वाढत चालला होता.

ज्यो म्हणाला, 'शिंच्यांना जरा धीर धरवत नाही म्हणजे काय ? काही झालं तरी आम्ही चंद्राचे पुत्र आहो. आमच्या कलाने येऊ आम्ही!'

डॉ. फर्ग्युसननी आपली औषधांची पेटी बरोबर घेतली आणि ते शिडी उतरून खाली आले. ज्योही आला आणि जमिनीवर पहारा करण्याची त्याने तयारी केली. खाली बसून गांभीर्याचा आव आणून अरब पध्दतीने त्याने पायाची मांडी घातली. काही लोक त्याच्याभोवती गोळा होऊन अदबीने उभे राहिले. डॉ. फर्ग्युसनना मांत्रिक पुढारी अत्यादराने राजखोपटाकडे घेऊन चालले.

वेळ दुपारी तीनची होती. आकाशात सूर्य तळपत होता. राजाचे खोपट गावाबाहेर अंमळ दूर होते. पण डॉक्टरसाहेब देवपुत्राला शोभेशी ऐट आणून ती मंडळी नेतील तिकडे चालले होते.

पहिल्याने तिथल्या पध्दतीने राजाचा मुलगा पाहुण्यांना सामोरा आला. डॉ.फर्ग्युसनना त्याने साष्टांग नमस्कार घातला आणि डॉक्टरसाहेबांनी त्याच्यावर मोठी मर्जी दर्शवून त्याला स्वहस्तांनी उठवले. मिरवणूक पुढे निघाली.

आता झाडी चांगली लागली होती. गर्द छायेतून पाऊण तास वाटचाल केल्यावर मिरवणूक राजखोपटापुढे थांबली. एका टेकडीवर बांधलेले हे खोपट

म्हणजे एक बैठा बंगलाच होता म्हणा ना. त्याच्या उतरत्या छपराखाली सभोवार एक आयताच वरांडा तयार झाला होता. त्याच्या खांबावर कोरीव काम केलेले होते. भिंतीवर लाल रंगाच्या रेघोट्या होत्या. माणसे अन् सर्प यांची ती रेखाचित्रे होती. छप्पर भिंतींना पूर्णपणे टेकलेले नव्हते. मध्यंतरी फट होती अन् त्या फटीतून मोकळी हवा आत खेळत होती. एरवी खोपटाला खिडक्या नव्हत्या. प्रवेशासाठी जे छिद्र होते त्याला दार म्हणणे धाडसाचे झाले असते.

आतले नोकरचाकर नि चौकीदार वान्यामेझी जातीचे होते. मध्य आफ्रिकेतील ही एक प्रसिध्द जमात आहे. या जातीतले लोक अंगाने धष्टपुष्ट निरोगी असतात. त्यांचे लांब केस खांद्यावर रुळत होते. त्यांनी आपले कपाळ नि गाल काळ्या निळ्या रेघोट्यांनी झेब्र्याच्या पट्ट्यांप्रमाणे रंगवले होते. कानांचा आकार हिडीस बनलेला होता; कारण त्यात मोठमोठ्या लाकडी बशा अडकवलेल्या होत्या. त्यांचे कपडे भडक रंगाचे होते. सैनिकांच्या हातात धनुष्यबाण होते. बाण साधे नव्हते- वीष लावलेले. शिवाय वाकड्या तलवारी अन् छोट्या कुऱ्हाडी होत्या.

डॉक्टरसाहेब सरळ राजखोपटाच्या अन्तर्भागात गेले. या ठिकाणी बरोबरच्या मंडळींचा गलका थांबण्याऐवजी अधिक वाढला. राजेसाहेब आजारी आहेत तेव्हा आपण शांत राहिले पाहिजे याची कोणालाही कल्पना दिसली नाही. दरवाजावर सशांच्या शेपट्या नि झेब्र्यांच्या आयाळी टांगून ठेवलेल्या होत्या.

राजेसाहेबांच्या स्त्रिया डॉक्टरांना सामोऱ्या आल्या. नुसत्या नाही, पितळी झांजांच्या तालावर. याला पाच फूट उंचीच्या नगाऱ्याची जोड मिळत होती. बहुतेक स्त्रिया सुरेख होत्या. त्यांनी कंबरेभोवती वल्कले गुंडाळलेली होती आणि त्यांच्या तोंडात चिलमींच्या लांब लांब नळ्या होत्या. तंबाखूचे झुरके घेतच त्या हसतमुखाने पुढे आल्या. त्यांच्यापैकी सहाजणी बाजूला उभ्या राहिल्या. त्याही वरकरणी हसत होत्या पण त्यांच्यापुढे भीषण भवितव्य वाढून

ठेवलेले होते. राजेसाहेबांना या आजारात मृत्यू आला तर त्यांच्या प्रेताबरोबर या सातजणींचे जिवंतपणी दफन होणार होते!

डॉ. फर्ग्युसननी ते सर्व दृश्य एका दृष्टिक्षेपात पाहून घेतले. मग ज्या लाकडी खाटेवर राजेसाहेब पहुडले होते तिकडे त्यांनी मोर्चा वळवला.

राजा वयाने चाळिशीच्या आसपास असेल, पण वाटेल तसे वागून अन् दारू ढोसून त्याने आपल्या शरीराची हानी करून घेतलेली होती त्याचे शरीर इतके थकलेले दिसत होते की डॉक्टरांना त्याच्याबद्दल मुळीच आशा वाटली नाही. दुखणे कित्येक वर्षांचे होते आणि या क्षणाला तर रोगी शुध्दीवरसुद्धा नव्हता. जगातला सारा आमोनिया कोळून त्याला घातला असता तरी त्याने डोळे उघडले नसते. पण डॉक्टरसाहेबांजवळ एक जालीम औषध होते. त्याचे काही थेंब पाजताच त्याने थोडीशी हालचाल केली. लगेच जमलेल्या मंडळींनी हर्षभराने या चंद्रपुत्राचा जयजयकार केला. आपल्या वैद्यकीय करामतीचा तो मासला दाखवल्यावर डॉक्टरसाहेब आणखी एक क्षणभरही तिथे थांबले नाहीत. आपल्या भक्तगणाला दोन्ही हातांनी बाजूला सारीत ते झपाट्याने बलूनकडे परत निघाले.

- ४ -

एव्हाना संध्याकाळ झाली होती. हा सारा वेळ ज्योने संमिश्र मन:स्थितीत काढला होता. देवाचे सुपुत्र म्हणून त्याला जी ऐट चढली होती ती लवकरच उतरली. कारण त्याचे भक्त त्याला फारच सतावू लागले. त्यांनी त्याच्याभोवती भजनच सुरू केले होते. निरनिराळ्या झोपड्यातून निरनिराळी पक्वान्ने त्याच्यापुढे येऊन पडत होती. प्रसादाचा ढीग साचला होता. पण त्यातले काहीही चाखून पाहण्याचा त्याला धीर झाला नाही. पोम्बे नावाची दारूही त्याच्यापुढे आली आणि तिचे दोन-तीन थेंब चाखणे त्याला भाग पडले.

दुसऱ्याच क्षणी त्याने वाटी खाली ठेवली अन् तोंड वाकडे केले. पण भक्तांची अशी समजूत झाली की देवपुत्र हसतो आहे. तेव्हा त्यांनी आणखीच खुषीत येऊन टाळ्या पिटल्या.

मग काही सुंदर मुलींनी येऊन गाणी म्हणत नाचायला सुरुवात केली. ज्योलाही उठून नाचावे लागले. आपल्या तऱ्हेवाईक नृत्यात त्याने हातपाय, गुडघे, नाकडोळे, तोंड साऱ्यांचा उपयोग केला. त्याने इतक्या काही वाकुल्या दाखवल्या अन् असे काही कर्कश आवाज काढले की कोणाही माकडाने त्याच्यापुढे हात टेकावेत. हा चंद्रलोकातला नाचगाण्याचा प्रकार असावा अशी त्या भोळ्या लोकांची खात्री झाली. आफ्रिकन लोक एकपाठी असतात. त्यांनी ताबडतोब ज्योची हुबेहूब नक्कल केली.

हा धांगडधिंगा चालू असतानाच डॉ.फर्ग्युसन धावत तिथे आले. त्यांच्या मागे काही अंतरावर मोठा जमाव होता आणि त्याने ज्या पध्दतीने कोलाहल आरंभला होता त्यावरून एकंदर लक्षणे ठीक दिसत नव्हती. काहीतरी भयंकर घटना घडली असावी अन् पारडे फिरले असावे.

पण काय ? झाल होतं तरी काय ? राजेसाहेब अचानक स्वर्गवासी तर झाले नव्हते ?

डॉक्टरांनी बलूनपाशी येताक्षणी शिडीच्या पायऱ्या चढायला सुरुवात केली. ज्योही नांगर सोडवण्यासाठी धावला. बलूनच्या परड्यात बसलेल्या केनेडीला या प्रकाराचा अर्थच कळत नव्हता. पण काहीतरी संकट ओढवले असावे असा तर्क करून त्याने उड्डाणाची तयारी केली.

''एक क्षणही घालवू नकोस!'' डॉ. फर्ग्युसन ज्योला म्हणाले. नांगर सोडवू नकोस. दोऱ्या तोड अन् झपाट्याने वर ये!''

''पण-पण झालं तरी काय ?'' ज्योने दोऱ्या तोडल्या आणि वांनराप्रमाणे सरसर शिडी चढत विचारले.

तेवढ्यात दोघे वर पोचले होते. हातात बंदूक घेऊन सज्ज असलेल्या

केनेडीने तोच प्रश्न विचारला, ''झालं तरी काय?''

''तिकडे बघा!'' डॉक्टरसाहेबांनी क्षितिजाकडे बोट करीत उत्तर दिले.

- ५ -

दोघांच्याही नजरा तिकडे वळल्या. पूर्व क्षितिजावर भले मोठे चंद्रबिंब उदय पावत होते. आकाशाच्या निळ्या पार्श्वभागावर त्याची लालभडक शोभा मोठी अप्रतिम वाटत होती. चंद्र पूर्व क्षितिजावर उगवत होता. चंद्रदेव ! तो चंद्र, तर हे बलून म्हणजे काय ?

ओमानी लोकांना कळून चुकले होते की या भामट्यांनी आपली फसवणूक केली!

ज्योला हे कळताच त्याला पोट धरधरून हसू आले. पण ती हसण्याची वेळ नव्हती. प्रत्येक क्षण मोलाचा होता. डॉक्टरसाहेबांनी भराभर शिडी वर ओढून घेतली. केनेडीने गॅस तापवला, तत्क्षणी बलूनचा तप्त फुगा डौलाने वर डोके काढू लागला आणि त्याच्या दोऱ्या ताणल्या जाऊ लागल्या.

'गुन्हेगार' पळून जात आहेत हे पाहून काझे गावची प्रजा क्रुद्ध झाली होती. लोक मुठी वळीत होते; रागाने ओरडत होते. बंदुका सरसावल्या जात होत्या. धनुष्ये खेचली जात होती. ज्याच्या शेंड्यांवर बलून स्थिर झाले होते, त्या झाडाचे खोड पकडून एक धाडसी मांत्रिक सरसर वर चढू लागला. बलूनची दोरी धरून ते खाली खेचण्याचा त्याचा बेत होता.

ज्योने कुऱ्हाड सरसावली.

'तोडू का दोरी?' त्याने विचारले.

'थांब जरा!' डॉ. फर्ग्युसन म्हणाले.

'पण-पण-तो नीग्रो-'

'हा नांगर तरी वाचवूया आपण ! एवढ्यात तोडू नकोस!'

एव्हाना त्या माणसाने नांगर गाठला होता. आणि मग जे काम ज्योने करायचे तेच त्याने केले. दोरी धरून ओढण्यापूर्वी त्याने नांगर सोडवला. तत्क्षणी बलून मोकळे झाले. दोरीला एक हिसका बसला अन् नांगरासकट दोरी वर ओढली गेली. त्या माणसाने नांगर धरलेला होता त्यामुळे त्याचेही झाडावरून उच्चाटन झाले. बलून जेव्हा वर उडाले तेव्हा नांगराला लोंबकळत हाही वर उडाला. खाली जमलेल्या गर्दीतून आश्चर्याचे नि भीतीचे उद्गार निघाले. जो तो वर बोट दाखवून काहीतरी ओरडू लागला.

'हुर्रा!' बलून सपाट्याने वर जाऊ लागले तशी ज्यो ओरडला.

'घाबरण्याचं कारण नाही' केनेडी म्हणाला. 'त्याने नांगराला घट्ट धरलेलं आहे. थोड्या हवाई प्रवासाने त्याची प्रकृती बिघडायची नाही!'

'पण पुढे काय करायचं आपण ?' ज्यो म्हणाला. 'त्याला मध्येच कुठे तरी टाकायचा का?''

'अर्थात नाही !' डॉ.फर्ग्युसन म्हणाले. 'आपण थोडे दूर गेल्यावर त्याला अलगद जमिनीवर उतरवू. एवढं विलक्षण साहस केल्यानंतर या मांत्रिकाच्या कीर्तीत निखालस भर पडेल!'

'देवच बनेल की तो!' ज्यो म्हणाला.


'व्हिक्टोरिया' ने एक हजार फुटांची उंची गाठली होती. नीग्रो वैद्यबुवांनी दोरीला घट्ट कवटाळले होते. दारुण भीतीबरोबरच त्याला आश्चर्याने पछाडले होते. पश्चिमेकडून आलेल्या वाऱ्यामुळे बलून आता गावाबाहेर पडले होते. अर्ध्या तासानंतर वस्ती पूर्णपणे मागे पडलेली पाहून डॉ. फर्ग्युसननी हवेचा दाब वाढवला. बलून खाली खाली येऊ लागले. जमिनीपासून वीस फुटांवर येताच वैद्यबुवांनी दोरीचे हात सोडले अन् खाली उडी मारली. तो कसाबसा जमिनीवर कोलमडला. पण दुसऱ्याच क्षणी उठून उभा राहिला आणि मोठमोठ्याने बोंबा मारीत ढुंगणाला पाय लावून गावाच्या दिशेने धावत सुटला.

बलून परत मार्गस्थ झाले.

या अभूतपूर्व बलूनचा पुढला प्रवास कसा झाला ? आफ्रिकेचा पश्चिम किनारा गाठला का या बलून-बहाद्दरांनी ?

एकंदर पाच आठवडे ही मंडळी बलूनमध्ये होती. त्यांच्यावर अनेक मासलेवाईक प्रसंग गुदरले. त्यासाठी बलून प्रवासाची ज्यूल व्हर्नची सबंध कादंबरीच वाचायला हवी.

♦ ♦ ♦



चंद्राभोवती चक्कर

"फायर!"

खणखणीत आवाजात उच्चारलेला तो हुकूम आमच्या कानांवर आदळतो न आदळतो तो मी धाडदिशी खाली कोसळलो. आवाज आम्हाला ऐकू आला नाही, कारण आवाजापेक्षाही तीव्रतर वेगाने आम्ही उड्डाण केले होते. पण अर्धा क्षण का होईना आम्हाला तिघांनाही एक जबरदस्त धक्का बसला होता अन् त्याच क्षणी आमची शुद्ध हरपली होती. पण आम्ही जेव्हा शुद्धीवर आलो तेव्हा आम्हाला म्हणण्यासारखी दुखापत झालेली नव्हती. तिघांचीही प्रकृती उत्तम होती. आमच्या वाहनाच्या आतून स्प्रिंगच्या लठ्ठ लठ्ठ गाद्या बसवलेल्या होत्या, त्यामुळे त्या भयंकर हादऱ्याचा परिणाम आमच्या शरीरावर झाला

नव्हता. आम्ही कपडे झटकीत उठलो अन् गवाक्षातून बाहेर दिसणारी अंतराळाची शोभा पाहू लागलो. बाहेर काळाकुट्ट अंधार पसरलेला होता. त्यात अवकाशातली प्रत्येक तारका विलक्षण तेजाने चमकत होती. तेजाची असली झळाळी पृथ्वीवरच्या मानवांना कधीही बघायला मिळत नाही, कारण वाटेत वातावरणाचा अडथळा येत असतो ना ? आधीच तेज:पुंज असलेला सिरीयस ऊर्फ व्याधाचा तारा आता जास्तीच डोळ्यांत भरत होता. मृगनक्षत्र जवळ आल्यासारखे दिसत होते. आल्फा ॲरिआड्नी ऊर्फ यमुना आणि अगस्ती, वगैरे कितीतरी ओळखीचे तारे आम्हाला दिसले. युरेनस अन् नेपच्यून सुद्धा बघायला मिळाले. आकाशगंगेचे भरगच्च शेपूट पिठोरी पट्ट्यासारखे धूसर दिसू लागले. स्वर्गंगेची सुरम्य शोभा आकाश व्यापू लागली.

अंतराळातले हे वैभव जवळून बघणारे इतिहासातले आम्ही पहिलेच भाग्यवान् मानव होतो. पण ज्या काळात विमानेसुध्दा नव्हती त्या काळात हा अद्‌भुत विक्रम आम्ही कसा केला ? अंतराळप्रवासासाठी आम्ही कोणते वाहन वापरले?

प्रिय वाचकहो, सांगितले तर खरेसुद्धा वाटणार नाही; पण आमचे वाहन म्हणजे एक प्रचंड कुलपी गोळा होता. अक्षरश: तोफेच्या पोकळ गोळ्यात आम्ही बसलो होतो. नऊशे फूट लांबीच्या नि ४८ लक्ष पौंड वजनाच्या तोफेतून उडवलेला हा कुलपी गोळा वजनात २० हजार पौंड होता आणि त्याला वर रेटण्यासाठी खालच्या बाजूस ४ लक्ष पौंड स्फोटक दारू ठासलेली होती. धगधगीत लोहरस एका खोलच खोल विहिरीवजा साच्यात ओतून आम्ही ही तोफ तयार केली. या अद्‌भुत अन् अचाट प्रयोगासाठी आम्ही अमेरिकन जनतेकडून पन्नास लाख डॉलर गोळा केले आणि फ्लॉरिडा प्रांतातल्या टाम्पाच्या पठारावर हे राक्षसी कर्म केले.

चंद्र पृथ्वीच्या जवळ आलेला होता. अशा मध्यरात्री पृथ्वीवरच्या

आमच्या तंत्रज्ञ दोस्तांनी तोफेला बत्ती दिली अन् आम्हाला तिघांना घेऊन हे अपूर्व यान चंद्राकडे जायला निघाले.

मि.इम्पी बार्बिकेन हे मध्यमवयीन धाडसी गृहस्थ आमचे पुढारी होते. त्यांच्या सबंध प्रयोगाची सुरवातीपासून टिंगल करून अखेरीस त्यात सामील झालेले त्यांचे प्रतिस्पर्धी कॅप्टन निकोल हे आमचे नंबर दोनचे प्रवासी. या दोघांची नेहमीच चकमक झडत असे ! आणि तिसरा शिलेदार या दोघांपेक्षा वयाने तरुण, अकलेने कमी पण उत्साहात जबरदस्त असा मी स्वत:. माझे नाव आर्डन. आम्ही तिघांनीही लष्करातली हवा खाल्लेली होती. सेवानिवृत्त सैनिकांचे मीलनस्थळ जो बाल्टिमोरचा 'गन क्लब' त्याचे आम्ही सदस्य होतो. युध्द संपुष्टात आले तेव्हापासून क्लबाची सर्वच मेंबर मंडळी निष्क्रिय बनली होती. या निष्क्रियतेचा त्यांना कंटाळा आला होता. काहीतरी करायला त्यांचे हात शिवशिवत होते. त्यामुळे बार्बिकेनसाहेबांनी चंद्रावर स्वारी करण्याची राक्षसी कल्पना क्लबापुढे मांडल्यावर तिचे सर्वांनी हर्षाने स्वागत केले होते. आणि आमच्या उड्डाणाची सर्व प्राथमिक तयारी क्लबकडून मोठ्या उत्साहाने करण्यात आली होती.

आणि आता आमच्या प्रत्यक्ष प्रयोगाला सुरुवात झाली असून ताशी १८००० मैल वेगाने आम्ही चंद्राकडे निघालो होतो.

- २ -

आमच्या अत्यद्‌भुत अंतराळयात्रेचे सविस्तर वर्णन करणे इथे शक्य नाही. आमच्याबरोबरचा लाडका कुत्रा वाटेतच मरण पावल्यामुळे त्याचा दफनविधी-किंवा तरणविधी म्हणा !- आम्हाला अंतराळाच्या पोकळीतच कसा उरकावा लागला; पृथ्वीचे गुरुत्वाकर्षण संपून चंद्राचे सुरू झाले तेव्हा त्या

सीमा-रेषेवर आम्ही वजनरहित कसे बनलो अन् तरंगनृत्य कसे केले, आमचे मेंदू हल्लक कसे बनले, आमच्या 'विमाना' वर उल्कांचा मारा कसा झाला ते सगळे सांगायचे म्हणजे पुरा ग्रंथच होईल. एवढेच सांगतो की आमचा अंदाज फसला.आम्ही चंद्र गाठला पण अखेरीस चंद्रावर उतरलोच नाही. आमच्या अवकाशयानाने चंद्राभोवती फेरी घालायला सुरुवात केली. चंद्राची ती तुम्हाला कधीही न दिसलेली पलीकडची गारढोण अंध:कारमय बाजू आम्ही आता पाहात होतो. पृथ्वी सोडल्याला ८० च्या वर तास लोटले होते. आम्ही आपले काळोखातून चाललोच होतो. मध्यंतरी एकदा चहाफराळ आम्ही केला होता आणि दोनदा गरमागरम कॉफी प्यालो होतो. पण अंगात उष्णता येण्याऐवजी थंडीचे प्रमाण वाढत होते. गरम कपड्यांच्या आत आम्हाला विलक्षण हुडहुडी भरत होती. आतली उष्णता गोठून तिचे थर गवाक्षांच्या तावदानांवर बसत होते. त्यामुळे बाहेर बघणेही कठीण होत होते.

कुलपी गोळ्याचा पायथा हळूहळू चंद्राकडे वळत होता. पण ते कुठे चालले आहे याचा काहीसुद्धा अंदाज लागत नव्हता. अंधारात समजणार काय ? बरं, आमचा वेग वाढला होता की कमी झाला होता ? आम्ही चंद्राच्या जवळ चाललो होतो की दूर ? या प्रश्नांनाही उत्तरे मिळत नव्हती. बार्बिकेनसाहेब बुचकळ्यात पडले होते. पण बऱ्याच विचाराअंती त्यांनी एक निष्कर्ष काढला आणि तो आम्हाला समजावून दिला.

त्यांनी सांगितलेली माहिती अशी होती-

'अंतराळात फेकलेली वस्तू तिला दिलेला वेग ओसरताच दोहोंपैकी एक दिशा घेऊ शकते. एकतर ती 'पॅराबोल्या' च्या रेषेत जाते किंवा 'हैपरबोल्या' च्या रेषेत जाते. हे पॅराबोला नि हैपरबोला काय आहेत ? शंकू किंवा 'कोन' (Cone) म्हणून जी आकृती आहे तिचा उभा छेद पाडा. म्हणजे तो आतला पृष्ठभाग तयार होईल. त्याच्या उभ्या समांतर रेषांनी हे आकार सूचित होतात. हा छेद शंकूच्या तिरक्या पृष्ठभागाला समांतर असा पाडला तर जी आकृती तयार

होते तिला ‘पॅराबोला’ म्हणतात. आणि शंकूच्या आसाला समांतर म्हणजे बरोबर उभा छेद पाडला तर जी आकृती मिळते तिला ‘हैपरबोला’ म्हणतात. चिमट्याचे दोन पाख दोन बाजूंनी निघावेत तशी यातली प्रत्येक आकृती आहे. दोन्ही बाबतीत पाख एकमेकांपासून दूर जातात, एकमेकांना मिळत कधीच नाहीत. तोफेतून फेकलेला गोळा पॅराबोला करतो हे प्रसिद्धच आहे. आणि मला वाटतं, आपली स्थिती त्या गोळ्यासारखीच आहे-’

‘मुळीच नाही !’ कॅप्टन निकोल आपल्या भांडखोर स्वभावानुसार म्हणाले, ‘आपली आतापर्यंतची दिशा लक्षात घेतली तर आपल्या तोफेने पृथ्वीशी काटकोन केला होता हे लक्षात घेतलं तर आपण पॅराबोला करणार नाही; हैपरबोला करू !’

‘नॉन्सेन्स !’ बार्बिकेन म्हणाले, ‘जी गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट आहे (हे बोलताना त्यांनी नकळत बाहेरच्या अंधाराकडे हात पसरला !) तिच्यावर चर्चेची जरूरच नाही. आपला पॅराबोला-’

‘हैपरबोला-’

‘पॅराबोला-’

‘हैपर-’

त्यांच्या द्वंद्वयुध्दात मध्यस्थी करणे मला पामराला भाग पडले. मी म्हणालो, ‘महाशय ! आपण कशाला हा वाद घालता आहा ? या दोहोंपैकी कोणताही धोका आपल्या वाट्याला आला तरी आपलं यान आता चंद्रापासून दूर दूरच जाणार, त्याला आपण टेकणं शक्य नाही हे उघडच आहे. मग या गणिताचा आपल्याला उपयोग तरी काय ?’

यावर मात्र ते दोघेही खजील झाले आणि मग कुडीत प्राण आहेत तोवर ज्ञानसेवन करावे म्हणून आम्ही पुन्हा गवाक्षातून सृष्टिशोभा पाहू लागलो.

आकाशगंगेच्या मध्याजवळ पुनर्वसूंची जोडगोळी लकाकत होती. तिच्याकडे मी सहज पाहात होतो; इतक्यात शेजारीच एखादी ठिणगी उडावी

तसे दृश्य मला दिसले. ही ठिणगी हा हा म्हणता मोठा आकार घेऊ लागली अन् पाच-दहा मिनिटात तिथे फुटबॉलएवढा मोठा प्रकाशगोल दिसू लागला. हा काय प्रकार असावा ते आम्हाला आधी कळेना. तो एखादा ग्रह असावा अन् अतिशय तीव्र वेगाने तो आमच्या बाजूला येत असावा एवढीच कल्पना करणे आम्हाला शक्य होते.

"धूमकेतू!" बार्बिकेनसाहेबांनी दबलेल्या सुरात घोषणा केली.

आम्ही तिघेही घाबरून गवाक्षाजवळ उभे राहिलो. तो प्रकाशगोल म्हणजे आम्हाला जणू मृत्युदूतच वाटला. शेवटी चाळीस मिनिटातच तो एवढा प्रचंड दिसू लागला की मी भिऊन चटदिशी डोके मागे घेतले. जणू काही असे करण्याने नाश टळणारच होता.

पण दुसऱ्याच क्षणी कॅ.निकोल ओरडले, "ओहो!"

मी चटकन डोळे उघडून पाहिले तो काय ? अंतरिक्षात प्रकाश-प्रकाश-प्रकाश! गारांचा पाऊस पडावा तसा लक्षावधी ताऱ्यांचा जिकडे तिकडे पाऊस पडत होता. मात्र हे तारे म्हणजे रंगीबेरंगी तेज:कण होते किंवा कारंज्यातून फवारा उडावा तसा शुभ्र नि रंगीत तेजोगोलकांचा फवाराच उडत होता म्हणा ना ! दारूची रोषणाईच सुरू होती जशी काही !

"आहे तरी काय हे ?" मी डोळे फाडून तिकडे पाहात विचारले.

"दोन ग्रहांची टक्कर!" बार्बिकेन म्हणाले. "आपलं सुदैव म्हणून आपण वाचलो. तो धूमकेतू किंवा तारा चंद्रावर आपटला अन् त्याचे तुकडे तुकडे झाले!"

मी नुसता आ वासून पाहातच राहिलो. दोन ग्रहांची टक्कर म्हणजे साधीसुधी का घडामोड होती ? केवढा प्रचंड आवाज झाला असता त्याचा ! आमच्या हवाबंद यानाच्याही भिंती फोडून तो आत घुसायला हवा. मग आम्हाला काहीच कसं ऐकू आलं नाही ?

पण मग लगेच माझी चूक माझ्या ध्यानात आली. अंतराळात सगळे

नि:शब्द असते, कसलाही आवाज होत नाही हे मी विसरलोच होतो !

- ३ -

तो दिवस तसाच निघून गेला. रात्रही गेली. पहाटे अडीच वाजता चंद्राचे दक्षिण क्षितिज लखलखीत दिसू लागले आणि लवकरच आम्ही चंद्राच्या शंक्वाकृती छायेतून बाहेर पडून लगेच सूर्यप्रकाशात प्रवेश केला. तांबडे फुटले नाही किंवा संधिप्रकाश दिसला नाही. मध्यरात्र संपली नि मध्यान्ह सुरू झाली. बार्बिकेनसाहेबांनी गणित केले तो चंद्र ४५ मैलांवर आलेला होता. आणखी १५ मिनिटांनी तो ४० मैलांवर आला. आणि त्याच्या दक्षिण गोलार्धातले प्रदेश आम्ही मागे टाकू लागलो म्हणजे एक गोष्ट आता नक्की झाली ती ही की बार्बिकेनसाहेबांचे गणित चुकले होते. कुलपी गोळ्याने पॅराबोलाही केला नव्हता किंवा हैपरबोलाही केला नव्हता. गोळा चंद्राला प्रदक्षिणा घालीत होता.

आमच्यात आता नवचैतन्य संचरले होते. भरपूर उजेड मिळाल्यावर दिव्यांची गरज उरली नाही. यांत्रिक शेगड्याही विझवण्यात आल्या; कारण आतली हवा केव्हाच गरम झाली होती. तावदानाचे हिमपुंज वितळून बाहेरचा देखावाही स्वच्छ दिसत होता. त्यातच छानदार गरम कॉफीने आम्हाला आणखीच ऊब दिल्यानंतर आम्ही नव्या उमेदीने चंद्राचे निरीक्षण करू लागलो.

चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर डोअरफेल आणि लाइबनिझ नावाच्या दोन पहाडांच्या रांगा आहेत. डोंगरांच्या या रांगा खूपच शुभ्र, तकतकीत दिसतात. रोमन ज्योतिषी सेची याने त्यांचा उल्लेख केलेला आहे.

"किती लकाकताहेत हे डोंगर !" कॅ. निकोल उद्गारले. "गोठलेला लाव्हा रस इतका आरशासारखा चकाकणं शक्य नाही. तिथून किरणांचं परावर्तन किती होतंय् ते पाहा ना !"

"म्हणजे ते बर्फ आहे, असंच ना?"

"शक्य आहे" बार्बिकेनसाहेब दुर्बीण खाली ठेवीत म्हणाले.

त्यांची ती कृती पाहून एखाद्याला असे वाटले असते की सर्व समजत असून हे मुद्दाम उमजून घेत नाहीत की काय? चंद्रावर वस्ती नाही असे त्यांचे जे ठाम मत होते त्याच्याविरूद्ध एकही पुरावा ऐकून घ्यायला ते तयारच नाहीत काय?

आम्हाला दिसणारे उत्तुंग कडे म्हणजे २४,६०० फूट उंचीचे वर्तुळाकृती कोट होते. त्यांच्या चकाकीमुळे असे वाटावे की जणू टोलेजंगी आरसेच उभे करून ठेवले आहेत. पण त्या आरशात दिसणारे प्रतिबिंब म्हणजे मृत्यूची पडछाया होती. कारण दुर्बिणीतून सारे स्वच्छ दिसत असूनही कुठे काही प्राण्यांची हालचाल असेल असा एकही चिन्ह आम्हाला आढळले नाही. मग ही एखादी मानवनिर्मित नगरी तर काळनिद्रा घेत नव्हती? पाँपेसारखे प्राचीन काळी- लाखो वर्षांपूर्वी-नष्ट झालेले हे एखादे शहर तर नसेल?

या वेळी आम्ही चंद्राच्या विषुववृत्तापासून ८० अंश दक्षिणेला व ३० व्या रेखांशावर पूर्वेकडे येऊन पोचलो होतो. तोही भाग आम्ही मागे टाकला. आणि मग ७७ अक्षांशावर अन् १६ रेखांश पूर्वेला एक अभेद्य किल्ला आमच्या दृष्टीला पडला. जणू काही एकीमागे एक अशा शेकडो तटबंद्या उभारून कुणीतरी हा किल्ला बांधलेला होता. किल्ल्याचे नाव न्यूटन. ह्या साऱ्या पर्वतांचा गुरूच म्हणायचा. कारण गुरुत्वाकर्षणाच्या संशोधकाचे हे तेजस्वी स्मारक! याची उंची २१,३०० फूट. एवढ्या उंच धिप्पाड भिंती; पण कशा मोजमाप घेऊन रेखल्यासारख्या बांधलेल्या! पण इतक्या रेखीव किल्लेबंदीचाही कारागीर अज्ञातच होता. प्राण्याची हालचाल कुठे म्हणता कुठेही दिसत नव्हती.

न्यूटनच्या शिखरावर आम्ही आलो तेव्हा त्याचे विलक्षण खोल विवर आम्हाला दिसले. खोल म्हणजे किती खोल! पृष्ठापासून शिखरापर्यंत त्याचे कडे जितके उंच होते, तितकेच पृष्ठाच्या खाली त्याचे विवर खोल असावे. आम्हाला इतक्या जवळूनसुध्दा त्याचा अंतर्भाव काळाकुट्ट दिसत होता.

हंबोल्टने असे लिहून ठेवले आहे की सूर्याचे किंवा पृथ्वीचे किरण या विवराच्या तळापर्यंत पोचणेच शक्य नाही.

संध्याकाळी ५८ अक्षांशावरचा क्लॉव्हियस आम्ही गाठला. पूर्वेकडे १५ रेखांशावर असलेला हा ज्वालामुखी आम्हाला फारच जवळून बघायला मिळाला. हा ज्वालामुखी एवढा अवाढव्य आहे की त्याच्या मुखावरून प्रवास करायला आम्हाला तब्बल एक तास लागला. मनुष्याला माहीत असलेल्या ज्वालामुखींमध्ये एवढे रुंद भगदाड दुसऱ्या कुणाचेही नाही. आपल्या पृथ्वीवर वेसुवियस नि एटना या ज्वालामुखींची विवरे ३ मैल रुंद आहेत. फ्रान्समधला कन्ताल हा सुप्त ज्वालामुखी ६ मैल रुंद आहे. क्लॉव्हियसच्या मुखाचा व्यास १५० मैल भरेल.

इथून पुढे आम्हाला डोंगरच डोंगर लागले. नाहीतरी चंद्रावर डोंगरांशिवाय दुसरे आहे काय ? गारठून गोठून गेलेले अन् हजारो बांडगुळे अंगावर उठलेले ते एक जीर्ण खोड आहे.

पण हजारो डोंगरांचा राजा शोभणारा पर्वतेश्वर आम्हाला अजून दिसायचाच होता. दक्षिणेला ४३ व्या अक्षांशावर अन् पूर्वेकडे १२ व्या रेखांशावर आम्हाला टायकोचे देदीप्यमान शिखर दिसले. इटलीचा बुध्दिमान ज्योतिषी टायको ब्राही याची जाज्ज्वल्य प्रतिभाच जणू मूर्त रूप घेऊन चंद्रावर अवतरली होती. राजाधिराज टायकोने शिरावर जणू तेज:पुंज मुकुट परिधान केला होता. त्या मुकुटाचे तेज जणू सहस्र किरणांनी बाहेर फेकले जात होते; आणि ते अत्यंत वेगाने फिरत असल्यामुळेच जणू स्थिर दिसत होते. त्यातून बाहेर पडणाऱ्या अग्निस्फुल्लिंगांनी अंतरिक्ष पार भरून गेले होते.

या अद्वितीय पर्वताची काय बरे जन्मकहाणी असेल ? असे तर झाले नाही ? कोण्या एका काळी विधात्याने एक तेजोगोल तयार करून हातात धरला आणि मग त्याची उष्णता त्याला स्वत:लाच असह्य होऊन त्याने तो अंतराळात भिरकावून दिला ? - आणि तो चंद्रावर आपटून फुटला; अन् असे अजस्र विवरे

चंद्रावर पडले, आणि सर्व दिशांना प्रभा फाकणारी एखादी तारकाच जणू असा हा तेजोनिधी पर्वत जन्माला आला ?

बऱ्याच ज्योतिष्यांच्या मते धूमकेतूशी चंद्राची टक्कर झाल्यामुळे चंद्राचा पृष्ठभाग फुटून टायकोची उत्पत्ती झाली. नॅसमिथ नावाच्या ज्योतिष्याने त्यांना खोडून काढले आहे. त्याचे म्हणणे असे की चंद्र गोठून गारठून आवळला गेला त्या वेळी त्याच्या पृष्ठभागाला साहजिकच भेगा व छिद्रे पडली. त्यातलेच एक छिद्र किंवा विवर म्हणजे टायको.

टायकोपासून आम्ही ५० मैलांवर होतो तरी त्याचे तेज आम्हाला सहन होईना. शेवटी गारेचे चष्मे लावूनच आम्हाला त्याचे दर्शन घ्यावे लागले. त्याचे तेज:किरण इतक्या दूरवर फाकलेले होते की त्यांनी चंद्राची क्षितिजे उजळली होती. एकेका किरणाची लांबी ६०० मैल भरली असती. त्यातल्या काही किरणशलाका १२ पासून ३० मैल रुंदीच्या होत्या. हर्शलच्या मते हे किरण म्हणजे गोठलेला लाव्हारस होय. पण बऱ्याच शास्त्रज्ञांनी असे अनुमान काढले आहे की चंद्राचा स्फोट झाला त्या वेळी उडालेल्या पत्थरांच्या या रांगा होत. हे मत दुसऱ्या कित्येक ज्योतिषांना मान्य नाही. पुष्कळ संशोधन होऊनही या किरणांची उपपत्ती अजून लागलेली नाही.

टायको पंधरा हजार फूट उंच आहे. त्याचे मूख पूर्ण गोल नसून किंचित लंबगोलाकार आहे. त्याचा व्यास जास्तीत जास्त ५० मैल असेल. पृथ्वीवरून टायकोचा तेजोगोल नुसतासुद्धा पाहता येतो. पौर्णिमेच्या रात्री त्याचा ठिपका देदीप्यमान दिसतो.

– ४ –

पण हे काय ? टायको पाहण्याच्या नादात आमचे लक्षच नव्हते. कुलपी गोळ्याची दिशा पुन्हा बदलली होती की काय ? कारण आता पायथा अगदी

निश्चितपणे पृथ्वीकडे वळलेला होता अन् चंद्रापासून आम्ही नक्कीच दूर दूर जात होतो.

'डॅश इट् ऑल् !' कॅ. निकोल उद्गारले. 'आपण चंद्राचा निरोप घेतलेला दिसतो.'

बार्बिकेनसाहेबांनी मान डोलावली. ते म्हणाले, 'संपली; आपली नि चंद्राची निकटची मैत्री संपली. छत्तीस तास आपण चंद्राभोवती रिंगण घातलं पण चंद्र आपल्याला बधला नाही. आता चाललो आपण परत !'

'परत ?' मी आश्चर्याने विचारले.

'ज्या मार्गावरून आपला कुलपी गोळा चंद्राकडे गेला होता, त्याच मार्गावरून तो परत निघाला आहे. लवकरच आपण पुन्हा ती गुरुत्वाकर्षण हद्द गाठू !'

'काय सांगता, साहेब ? आणि लवकरच म्हणजे केव्हा ?'

बार्बिकेनसाहेबांनी वहीतली टिपणे पाहून लगेच सांगितले, 'येताना लागला तेवढाच वेळ म्हणजे बावीस तास लागणार आपल्याला. म्हणजे आज मध्यरात्र उलटल्यानंतर एक तासाने आपण त्या सीमेवर पोचू.'

'आणि मग ?'

'मग दोन गोष्टी शक्य आहेत. पृथ्वी नि चंद्र या दोघांची ओढ त्या वेळी आपल्या कुलपी गोळ्यावर असेल. त्यामुळे आपला वेग जर अपुरा पडला तर आपल्याला यत्किंचित हालचाल न करता त्या रेषेवर उभं राहावं लागेल.'

'किती वेळ ?'

'वेळाबिळाची मग चिंताच करायला नको. अनंत काळपर्यंत आपण तिथेच राहू. पृथ्वी-चंद्र प्रवास कंपनी जेव्हा सुरू होईल तेव्हा तिला आपल्या या कुलपी गोळ्याच्या रूपाने एक आयतं स्टेशनच मिळेल.'

'छान !' मी सर्द होऊन म्हणालो. 'दुसरी शक्यता सांगा. ती याहून भयंकर खचित नसणार.'

'दुसरी शक्यता अशी की कुलपी गोळा चंद्राभोवती प्रदक्षिणा घालील.'

'आणखी एक प्रदक्षिणा ?'

'एक नाही- पुष्कळ! अनंत प्रदक्षिणा. आपला कुलपी गोळा मुळी चंद्राचा उपग्रहच बनेल.'

'ग्रँड!' मी ओरडलो आणि त्या ओरडण्याला अगदी विसंगत अशी कृती केली- तक्तपोशीवर मटकन बसलो.

कॅ. निकोल म्हणाले, 'बाबा रे! ग्रँड असो नाहीतर ट्रॅश असो, आपल्याला आल्या प्रसंगाला तोंड दिलेच पाहिजे.'

'खरं आहे' असे म्हणून मी थोड्या वेळाने उठलो खरा; पण त्या वेळी माझ्या डोक्यात कल्पनाचक्र गरगर फिरत होते.

मी बार्बिकेनसाहेबांचा बाहू धरून अस्फुट सुरात तक्तपोशीकडे बोट करीत म्हटले, 'साहेब, आपण एक गोष्ट विसरलो.'

'ती कोणती ?'

'अग्निबाण! मध्यंतरी एकदा आपलं यान चंद्राकडे वळवण्यासाठी आपण अग्निबाण उडवणार होतो. आता ते पृथ्वीकडे वळवण्यासाठी उडवूया!'

हे ऐकताच बार्बिकेनसाहेबांचा चेहरा उद्दीपित झाला.

'उत्तम!' ते म्हणाले. 'मात्र अग्निबाण उडवण्याची तयारी आधीपासून जय्यत ठेवली पाहिजे. त्या सरहद्दीवर आपण पोचू तेव्हा कुलपी गोळ्याचं टोक बरोबर चंद्राकडे वळलेलं असेल अन् पायथा पृथ्वीकडे असेल. त्या वेळी जर सेकंदाचीही चूक न करता आपण अग्निबाण उडवले तर कुलपी गोळा पृथ्वीकडे गेलाच पाहिजे!'

'चूक होणार नाही याबद्दलची काळजी मी घेतो. तुम्ही चिंता करू नका.' कॅप्टनसाहेबांनी ग्वाही दिली.

बार्बिकेनसाहेबांनी चेहरा लांबट केला आणि कडीपाटाकडे पाहात सांगितले, 'एवढ्याने आपली सुटका झाली असं समजू नका. पृथ्वीकडे आपण

किती वेगाने जाऊ याची कल्पना आहे तुम्हाला ? मनोऱ्यावरून खाली टाकलेल्या चेंडूचा वेग सारखा वाढत जातो. आपलं वजन, गुरुत्वाकर्षण नि गतीनियम या सर्व गोष्टी लक्षात ठेवून गणित केलं तर पृथ्वीकडे जाताना आपला वेग ताशी १,१५,२०० मैल असेल !'

'बबबब ! आतापर्यंतचा आपला धूमधडाका काहीच नाही म्हणायचा ! हा सगळ्यावर कळस होणार !'

'याचा अर्थ असा की अग्निबाण उडाल्यापासून दीड तासात आपण पृथ्वीवर पोचू.'

'पोचू' म्हणण्यापेक्षा 'आपटू' म्हणा ना ! आपल्या ठिकऱ्या पोचतील पृथ्वीवर !'

'चालेल !' मूठ आवळून ती टेबलावर आपटीत मी त्वेषाने म्हणालो, 'चंद्रावर आपण उतरू शकत नाही. मग मायभूमीवर मरण आलेलं काय वाईट ? निदान अंतराळात स्टेशनमास्तर म्हणून राहण्याची तरी आपली इच्छा नाही.'

'आणि चंद्राभोवती फेऱ्या मारण्याची तर त्याहून नाही !' कॅ. निकोल म्हणाले.

तेव्हा अग्निबाण उडवण्याचे नक्की ठरले. निर्णय घेतल्यामुळे आमच्या डोक्याचा ताण बराच कमी झाला. त्यावेळी संध्याकाळचे सात वाजले होते अन् भूकही सपाटून लागली होती. तेव्हा आमच्या कोठारातल्या ठेवणीतल्या बरण्या आम्ही उघडल्या आणि त्यातले मुरांबे नि लोणची तोंडी लावण्याला घेऊन स्वादिष्ट जेवणावर आडवा हात मारला.

'छे बुवा ! जेवण अंगावर आलं,' मी सुस्तपणे म्हणालो, 'डोळे मिटावेसे वाटतात.'

बार्बिकेनसाहेबांनी जांभई दिली. 'मिटा की मग !'' ते म्हणाले. ''परत कदाचित उघडावेच लागणार नाहीत.'

'पण तुम्ही खरोखरच झोपा की !' कॅ. निकोल म्हणाले. 'अग्निबाणांबद्दल

काळजी करू नका. मी जागा राहणार आहे.'

पण मि. बार्बिकेन कोणताही धोका पत्करायला तयार नव्हते. ते स्वत: टेबलापाशी जाऊन बसले.

मला मात्र झोप आवरेना. डोळ्यांवर झापड येत असता मी मनाशी म्हटले, 'त्या सरहद्दीवर पोचलं की अग्निबाण उडवायचे एवढंच ना? आपल्याला चिंता करण्याचं कारण नाही. हे दोन महारथी आहेतच. त्यांच्यापेक्षा जास्त आपण काय करणार ? आणि पुन्हा पृथ्वीवर आपटायचंच असेल तर ते जागेपणी आपटलं काय अन् झोपेत आपटलं काय सारखंच!''

आणि तरी-कुणी मला उठवलं, कुणास ठाऊक ! कदाचित माझ्या अंतर्मनाने असेल. रात्री एक वाजायच्या बेताला मी कसा ठरवल्यासारखा जागा झालो अन् ताडदिशी उठून बसलो.

बार्बिकेनसाहेब तोंडापुढे एक वळकटी गच्च बांधून उभे होते. तक्तपोशीतल्या गवाक्षाजवळ कॅप्टनसाहेब गुडघे टेकून बसले होते. त्यांच्या डाव्या हातात क्रॉनोमीटर होता आणि उजव्या हातात विद्युत् स्फुल्लिंग पाडण्याचा डीटोनेटर होता. तोंडाने ते सेकंदे मोजीत होते-

नऊ-आठ-सात-सहा-पाच-चार-तीन-दोन-एक. . . ढुम् !-

त्याच क्षणी आमची शुद्ध गेली. आणि या प्रवासवृत्ताचेही बारा वाजले ! चंद्रावरच्या स्वारीचा हा अविश्वसनीय किस्सा समग्र वाचायचा असेल तर ज्यूल व्हर्नची ती कादंबरीच वाचली पाहिजे.

♦ ♦ ♦



हा सूर्य, ती पृथ्वी

धडाड्- धुम्-

३१ डिसेंबरच्या मध्यरात्री तो प्रचंड हादरा बसला आणि पृथ्वीचे काय झाले कुणास ठाऊक!

त्या महाभयंकर रात्री भूमध्य समुद्राच्या परिसरात जी माणसे होती त्यांना काहीतरी विचित्र अनुभव आले खरे.

पृथ्वी नि आकाश जिथे एकत्र मिळाल्यासारखी दिसतात ती क्षितिजरेषा सर्वांच्याच परिचयाची आहे. पण त्या रात्री मुरब्बी खलाशालाही क्षितिज बेपत्ता झाल्यासारखे वाटले, ते का?

समुद्र एकदम वर उचलला जात आहे असा चमत्कारिक भास त्याला

झाला, तो का ? वर म्हणजे किती वर- उंच म्हणजे किती उंच ? 'पर्वतप्राय लाटा' हे वर्णन त्यापुढे काहीच नाही असे म्हटले पाहिजे.

दहा हजार तोफा एकदम उडाव्यात असा गगनभेदी आवाज त्याच्या कानावर पडला तो कशाचा ? ही घनघट्ट पृथ्वी फाटून दुभंगून तिच्या ठिकऱ्या तर उडत नव्हत्या ?

प्रचंड उंचीवरून पाण्याचे अजस्र लोट खाली कोसळावेत तशी अगडबंब कृती लाटांनी केली ती कशासाठी ? लाटा उसळत नव्हत्या, खोल खाली जात होत्या. खोल म्हणजे कुठे ? खाली म्हणजे कुठे ?

आणि झंझावातालाही मागे सारणारे शिट्ट्यांसारखे कर्णकर्कश नाद आकाशात उमटले ते कशामुळे ? वाराच होता का तो ?

अकस्मात् अन् भव्य स्वरूपात आकाश एका अद्वितीय तेजाने व्यापून गेले ते कसे काय ? कुठून आला तो तेजाचा झोत, की ज्याने आकाशातल्या एकूण एक तारकांना अस्तंगत केले ?

त्या इतिहासकारक क्षणी भूमध्य समुद्राने एकाएकी काळ्या पोकळीचे रूप धारण केले ते कसे काय ? काळ्याकुट्ट भिंतीचे ते खोलच खोल विवर होते की काय ?आणि पाण्याचा प्रचंड लोट पडत होता तो त्या विवरातच की काय ? कान फिरवणारे उन्मत्त नाद उमटले ते त्यामुळेच की काय ?

आणि चंद्र एकदम मोठा दिसायला लागला तो कसा काय ? नेहमीच्या दसपट आकार त्याने कुठून धारण केला ?

की चंद्र नव्हताच तो ? दुसरेच एखादे बिंब होते ? भूमी, समुद्र, आकाश आणि अवकाश या सर्वांना एकसमयावच्छेदेकरून हादरून सोडणारा तो चमत्कार होता तरी कसला ?

- २ -

या प्रश्नांची उत्तरे त्या क्षणी तरी कोणीच देऊ शकत नव्हते. पण एवढे खरे की उत्तर आफ्रिकेच्या किनाऱ्यावर जो आल्जेरिया देश आहे, तिथल्या मोस्तगानेम आखाताचे त्या उत्पाताने काही वाकडे केले नसावे. त्या ठिकाणी प्रदेश-पाहणीसाठी आलेल्या एका फ्रेंच लष्करी अधिकाऱ्याचे तात्पुरते खोपट होते; ते भुईसपाट झाले आणि कॅप्टन हेक्तर सर्वादाक नि त्याचा नोकर बेन झूफ दोघे मूर्च्छित होऊन त्या ढिगाऱ्यात पडले. पण त्यांच्या जिवाला फारशी इजा झालेली नव्हती.'

दोघेही आपली शस्त्रे नि उपकरणे नीट मांडून ठेवण्याच्या उद्योगाला लागले. हेक्तर म्हणाला, 'वाजले किती, बेन झूफ ?'

सूर्य चांगलाच क्षितिजावर आलेला होता, तिकडे पहात बेन म्हणाला, 'आठ तरी वाजले असणार !'

'आठ ?'

'यात सेकंदाचीही चूक नाही, साहेब ! आपली निघायची वेळ झाली !'

'निघायची ? कुठे जायला ?'

'काऊंटसाहेबांना भेटायचंय ना तुम्हाला ? द्वंद्वयद्ध !'

'खरंच की !' कॅप्टनसाहेबांना एकदम आठवण झाली. कशावरून तरी बोलाचाली होऊन काऊंट तिमाशेफबरोबर आपले द्वंद्वयुद्ध ठरले आहे खरे !

त्यांनी घड्याळ काढून डोळ्यांपुढे धरले. कितीतरी वेळ भ्रुकुटी वक्र करून ते त्याच्याकडे पाहात होते; 'ते आठ वाजण्याचं काय म्हणालास बेन झूफ तू ? वेडा आहेस की काय ? आत्ताशी दोन वाजताहेत !'

'पहाटेचे की दुपारचे ?' बेन झूफने पुन्हा सूर्याकडे पाहात विचारले.

उत्तर देण्यापूर्वी हेक्टरने आपले घड्याळ कानाशी धरले.

'चाललंय तर ठीक!'

'सूर्य पण ठीक चाललाय की!'

'तेही खरं म्हणा-'' असे म्हणत हेक्तरने सूर्याकडे काळजीपूर्वक पाहिले. 'क्षितिजापासूनची त्याची उंची-अरेच्या! असं तर नसेल?'

'कसं?'

'संध्याकाळचे तर आठ नसतील हे?'

'संध्याकाळचे!'

'हो. तूच बघ. सूर्य कोणत्या दिशेला आहे? पश्चिमेला. म्हणजे तो मावळतो आहे.'

'छट्! तो उगवतो आहे. नीट बघा, साहेब. सूर्य वरवर येतो आहे. आता आपण बोलत असतानाच किती वर आला बघा!'

'म्हणजे सूर्य पश्चिमेला उगवतोय् की काय तरी?' हेक्टर पुटपुटला. 'हो! ते नाकारण्यात अर्थ नाही. च्यॅ:! काय चमत्कार आहे! मला बुद्धिभ्रंश तर झालेला नाही?'

पण जे दिसत होते ते अगदी खरे होते. तो तेजोनिधान वासरमणी पश्चिम दिशेला उगवून आकाशात वरवर चढत होता. आखाताच्या पाण्यात पडलेले त्याचे प्रतिबिंबही हीच गोष्ट जाहीर करीत होते.

हेक्तर विस्मयचकित झाला. पश्चिमेला सूर्य उगवणे यापेक्षा दुसरी विपरीत घटना ती कोणती? खगोलशास्त्राच्या मूल सिद्धान्तावरच त्यामुळे पाणी पडले होते.

- ३ -

घटना इतकी चमत्कारिक होती तरी बेन झूफला बरोबर घेऊन कॅप्टनसाहेब

आधी त्या द्वंद्वस्थळाकडे जायला निघाले.

इकडे हवा विलक्षण बदलत होती. सूर्य अदृश्य झाला. काळे तांबूस विद्युद्भारित मेघ खाली उतरू लागले. क्षितिज पार झाकले गेले. आगामी वृष्टीची तर ही चिन्हे नव्हती ? पण ढग नुसतेच डोक्यावर तरळत होते. त्यातून पाण्याचा थेंबही पडला नाही.

त्यांच्या उजव्या हाताला समुद्र होता. बेनच्या लवकरच लक्षात आले की समुद्र सुनसान दिसतो आहे. मोस्तगानेमचं आखात म्हणजे नेहमी कसं गजबजलेलं असतं. पण आज दूरवर नजर फेकली तरी एकही शीड दिसत नाही. धुराचा एकही लोट दिसत नाही. त्याला वाटले, हा दृष्टिभ्रम तर नसेल ?

पण त्याहून बुचकळ्यात टाकणारी एक गोष्ट हेक्तरला दिसली. समुद्राकडे पाहतानासुध्दा क्षितिज गाठण्यासाठी नजरेला फार दूर जावे लागत नव्हते. ते ज्या कड्यावरून चालत होते तो शंभर फूट उंच होता. म्हणजे भूमितीच्या एका नियमाप्रमाणे त्यांचे क्षितिज बारा मैलांवर असायला हवे. इथे फार फार तर तीन मैलांपलीकडचे काही दिसत नव्हते.

आणखी एक आश्चर्य असे की त्यांना श्वासोच्छ्वास चांगला करता येत होता. जलद गतीने ते चालत असूनही त्यांना धाप लागत नव्हती. थकवा वाटत नव्हता. आणि जलद म्हणजे किती ? आपल्याला आगगाडीतून जाताना वाटते तसे त्यांना वाटत होते. झाडेझुडपे खडक झपाट्याने मागे पडत होते. ही जोडगोळी चालत होती म्हणण्यापेक्षा तरळत, तरंगत, उडत होती !

इतक्यात एकाएकी एक चमत्कारिक भुंकणे त्यांच्या कानांवर पडले. दुसऱ्याच क्षणी बाजूच्या जंगलातून एक कोल्हा उडी मारून आला आणि एका उंच खडकाच्या पायथ्याशी उभे राहून त्याने मागे वळून अस्वस्थ नजरेने आमच्या प्रवाशांकडे पाहिले.

आफ्रिकेच्या या भागात आढळणारी कोल्ह्याची ही जात आकाराने कुत्र्यापेक्षा मोठी नसते आणि कुत्र्यापेक्षा जास्त भिण्यासारखेही त्याच्यात काही नसते.

उलट त्या भित्र्या जनावरानेच यांना घाबरून त्वरेने धूम ठोकली. आणि त्याने पहिली उडी मारली तीच इतकी उंच होती, की त्या प्रचंड खडकाच्या तो थेट माथ्यावर जाऊन पोचला. तिथे बसून तो जेव्हा खाली पाहू लागला तेव्हा बेन झूफने आश्चर्याने उद्‌गार काढले, 'च्यॅ: ! केवढी हाय जंप मारलीन् ! तो खडक कमीत कमी छत्तीस फूट उंच असेल !'

कोल्हा अजूनही आपल्याकडे उपहासबुध्दीने टक लावून पाहतो आहे असे वाटून बेन झूफला इतकी चीड आली की त्याला मारण्यासाठी पायाशी पडलेला दगड त्याने उचलला.

म्हणजे त्याने जे उचलले ते दिसण्यात दगडासारखे होते अन् स्पर्शावरूनही तो दगड वाटत होता. आणि तरी हाताला मऊ लागला की जणू स्पंजचा एखादा तुकडाच.

'च्यॅ: !' बेन म्हणाला, 'हा दगड म्हणायचा की पावाचा तुकडा!' त्याने तो अंमळ तुच्छतेनेच भिरकावला.

बेनचा नेम चुकला; आणि तो धूर्त प्राणी टणाटण उड्या मारीत दिसेनासा झाला. सांगायचा विशेष हा-कोल्ह्याची एकेक उडी इतकी उंच होती की खडक, झाडेझुडपे इतकेच नाही तर मोठमोठे वृक्ष त्याने सहज लीलेने पायांखाली घातले. जसे काही एखादे रबराचे कांगारू. तेही पोटात हायड्रोजन भरलेले !

पण बेनला त्याहीपेक्षा आश्चर्य वाटले ते त्या दगडाचे. दगड आपला चाललाच होता. एखाद्या बाणासारखा तो उंच गेला होता, खूप लांबच लांब चपटा 'पॅराबोला' तयार करून. अखेरीस तो इतक्या दूर जाऊन पडला की ती जागा त्याला दिसली नाही किंवा पडल्याचा आवाजही ऐकू आला नाही.

'माशाल्ला!' बेन झूफने एखाद्या अरबाप्रमाणे आश्चर्योद्‌गार काढला. 'माझ्या हातात एवढी ताकद असेल अशी मला कल्पना नव्हती.'

आपला चालण्याचा वेग वाढवून तो कॅप्टनसाहेबांच्या बराच पुढे गेला होता. तेवढ्यात दहा-बारा फूट रुंदीचा एक ओढा वाटेत आडवा आल्यामुळे तो थबकला आणि लांब उडी मारण्यासाठी त्याने 'स्टार्ट' घेतला.

पण त्याची 'स्टार्ट' ची उडीच इतकी उंच गेली की ओढा कुठच्या कुठे मागे राहिला.

'चालला आहेस कुठे तू, बेन झूफ?' हेक्तर ओरडला. 'मान मोडून घ्यायची आहे की काय ?'

पण बेन आपला उंचच जात राहिला. त्याने चाळीस फुटांची उंची गाठली तेव्हा थक्क झालेल्या हेक्तरला काय बोलावे ते सुचेना. पण एव्हाना तोही ओढ्यापर्यंत आलेला होता. तेव्हा त्यानेही एक उडी घेतली.

आपल्या नोकराइतका जोर त्याने केला नसणार. कारण त्याची उडी फक्त तीस फूट उंच गेली. पण त्या उडीला मिळालेला रेट जबरा असावा; कारण उंच जात असतानाच त्याने गिरकी घेऊन बेनला मागे टाकले होते. नंतर वर जाण्याची क्रिया संपून गुरुत्वाकर्षणाच्या नियमाप्रमाणे तो तीव्र वेगाने खाली येऊ लागला.

आता केवढ्या दणक्याने आपण जमिनीवर आपटतो कुणास ठाऊक अशी साहजिक भीती हेक्तरला वाटली. पण आश्चर्याची नि समाधानाची गोष्ट ही की त्याचे पाय सुखरूप जमिनीला टेकले. त्याला जरासुद्धा लागले नाही.

'बेन झूफ!' तो आश्चर्यातिशयाने म्हणाला, 'माझ्या डोळ्यांकडे बघ. मी झोपेत तर नाही ? मला स्वप्न तर पडत नाही ना ?'

'स्वप्नच वाटतं खरं साहेब! पण कसलं स्वप्न हे!- पूर्वी मला स्वप्नं

---

* पॅरिसच्या परिसरातला एक डोंगर. याच्यावर बेन झूफचे प्राणापलीकडे प्रेम होते.

पडलेली आहेत. एकदा तर मी मॉन्तमार्त्रच्या शिखराभोवती* पक्ष्यासारखं उड्डाण केलंय् स्वप्नांत. पण हा प्रकार भलताच अजब बुवा!'

हेक्तर बुचकळ्यात पडून म्हणाला, 'छे! मला नाही वाटत हे स्वप्न असेलसं! आपल्याला वेड लागलंय हेच खरं! पण-पण-'

पण हेक्तर असल्या अनाकलनीय गोष्टीची जास्त काळ चिकित्सा करणारा माणूस नव्हता. लवकरच त्याने तो नाद सोडून दिला आणि मग हरणासारख्या उड्या मारीत दोघेही हां हां म्हणता इच्छित स्थळी जाऊन पोचले. ते स्थळ म्हणजे गुलमोहर, ओक वृक्ष नि डिंकाची राक्षसी झाडे यांनी वेढलेली एक मखमली हिरवळ होती. पण हे तिथे गेले त्या वेळी ती निर्मनुष्य होती.

'हे ठीक झालं' हेक्तर सभोवार पाहात म्हणाला. 'आपण आधी पोचलो. माझा प्रतिस्पर्धी अजून आलेला नाही.'

'आधी की शेवटी ते अजून ठरायचं आहे.' बेन झूफ उद्गारला.

'शेवटी? शक्य नाही!' असे म्हणून कॅप्टनसाहेबांनी खिशातून घड्याळ काढून पाहिले. गुर्बी सोडण्यापूर्वी सूर्यावरून त्यांनी ते बरोबर लावले होते.

'साहेब, आपल्या डोक्यावर ढगांच्या मधोमध तो लहानसा ठिपका दिसतो, तो पाहिलात?'

'पाहिला. त्याचं काय?'

'तो सूर्य आहे.'

'सूर्य? जानेवारी महिन्यात डोक्यावर सूर्य! आणि आपण विषुववृत्ताच्या उत्तरेला छत्तीस अंशावर असताना! काहीतरीच काय, बेन झूफ!

'माफ करा, साहेब! तो साक्षात् सूर्यच आहे. भलत्याच घाईने वर चढला की! आणखी तीन तासांत मावळेल गुलाम!'

आणि खरोखरच तसेच झाले. आणखी तीन तासांनी सूर्यमहाराज अस्ताला गेले. द्वंद्वाचा बेत अर्थात रद्द झाला.

त्यानंतरचे पाच-सहा दिवस या दोघांनी प्रदेश संशोधन करण्यात

घालवले. आणि त्यांनी कितीतरी आश्चर्यजनक शोध लावले. क्षितिज जवळ आले होते. सूर्याचा आकार मोठा झाला होता. तो पश्चिमेला उगवून सहा तासात पूर्वेला मावळत होता. दिवसाप्रमाणे रात्रही सहा तासांची झाली होती.

- ४ -

आणि मग अचानक पावसाला सुरुवात झाली. १२ तारखेपर्यंत पाऊस धो धो कोसळत होता. १३ तारखेला मात्र त्याचा जोर कमी झाला आणि वाऱ्यापुढे ढग पळ काढू लागले. सूर्यास्तानंतर फार दिवसांनी निळेशार आकाश पाहायला मिळाले. कमालीचे सुंदर आकाश! त्या आकाशात असंख्य चांदण्या अपूर्व तेजाने चमकत होत्या. असे दीप्तिवैभव हेक्तरने पूर्वी कधी पाहिलेले नव्हते. तारे इतके देदीप्यमान वाटत होते की हेक्तरला वाटले, हे सगळे तारांगण खाली तर आलेले नाही? काही तेजोमेघ तर स्पष्ट ओळखता येत होते-दुर्बीण वगैरे न घेता.

ध्रुवतारा शोधायला त्याला जरा अडचण पडली; पण तोही शेवटी सापडला. तो पाहा की ध्रुव आणि तो ध्रुवमत्स्य. पण हे काय? किती खाली आलेले दिसतात हे तारे! खरं म्हणजे मोस्तगानेमच्या अक्षांशावर ध्रुवाचा तारा क्षितिजापासून ३६ अंशावर दिसायला हवा. या चमत्काराचा काय अर्थ? पूर्वीप्रमाणे पृथ्वीच्या आसाचा तो मानबिंदू राहिलेला नाही की काय? छट्! ही कसली मूर्खपणाची कल्पना? पण थांबा. कल्पना मूर्खपणाची नव्हती. सत्य होते ते. कारण हेक्तरच्या देखताडोळा ध्रुव तारा खाली सरकत होता. एका तासाच्या अवधीत त्याने क्षितिज गाठले.

ध्रुवाने आपले अढळपद गमावले होते. इतर ताऱ्यांत नि त्याच्यांत कोणताही फरक राहिलेला नव्हता.

दुसरा प्रश्न हा की त्याची जागा कोणी घेतली होती? पृथ्वीचा आस आता

कुठे कललेला होता? तिच्या भ्रमणाचा मानबिंदू कोणता होता? याचे उत्तर शोधायचे म्हणजे तारांगणाचा काही वेळ अभ्यास करायला हवा. एकाच जागी स्थिर असलेला तारा कोणता हे शोधले पाहिजे. इतर नक्षत्रे ज्याच्याभोवती फिरत आहेत असा केंद्रबिंदू हुडकून काढला पाहिजे.

थोड्याशा निरीक्षणानंतर असा तारा हेक्तरला सापडला. तो तारा स्वतः निश्चल असून इतर नक्षत्रे त्याच्याभोवती फिरत होती. 'लिरा' किंवा 'स्वरमंडल' तारकापुंजातला 'व्हेगा' किंवा 'अमिजित' नावाचा तारा होता तो. उज्ज्वल निळ्या तेजाबद्दल या तारकेची ख्याती आहे. शास्त्रज्ञांच्या मते आणखी बारा हजार वर्षांनी तोच आपला ध्रुव तारा बनणार आहे.

बारा हजार वर्षांनी कशाला? आजच ती घटना घडली होती की!

आणि हे काय? पश्चिम क्षितिजावर एक मोठे तेजस्वी बिंब सपाट्याने वर येत होते ते कसले?

'चंद्र!' बेन झूफ उद्‌गारला.

पण चंद्रच होता का तो? की सूर्यमालेतला दुसरा एखादा ग्रह अंतर कमी झाल्यामुळे मोठा दिसत होता?

हेक्तरने आपल्या दुर्बिणीतून त्याचे बराच वेळ निरीक्षण केले. ' तो चंद्र असणं शक्य नाही' तो म्हणाला, 'चंद्राएवढा मोठा दिसतो खरा; पण मग त्याच्यावरच्या त्या आकृत्या कुठे आहेत? ते 'समुद्र', ते पट्टे, ते ज्वालामुखी? टायकोचं ते तेज ओकणारं विवर या दुर्बिणीतून स्पष्ट दिसायला हवंच. - छे! चंद्र नाहीच तो! हं, एक मात्र शक्यता आहे. चंद्राची ही मनुष्याने न पाहिलेली पलीकडची बाजू असणं शक्य आहे.'

'म्हणजे चंद्रच म्हणा की!' बेनला आपण लावलेल्या शोधाचं श्रेय गमवायचे नव्हते.

'नाही' हेक्तरने ठामपणे आता उत्तर दिले. 'तो चंद्र असणं शक्य नाही. तो एखादा ग्रह असावा. कारण तो बघ, त्याला स्वतःचा एक चंद्र आहे अन् तो

त्याच्याभोवती फिरत आहे.'

त्या प्रचंड बिंबाच्या शेजारी एक सूक्ष्म तेजोबिंदू होता खरा. बेनलाही ते कबूल करावे लागले. आणि ते दृश्य पाहून त्याला आपल्या लहानपणची एक आठवण झाली. निरभ्र उन्हाळी रात्र असली की मॉन्त मार्त्रच्या शिखरावरून दुर्बीणवाला बुवा एक सूचे नाणे घेऊन मुलांना आकाशाचे दृश्य दाखवायचा. ग्रहांचा दादा गुरू आणि त्याच्याभोवती लेकरे त्यात बघायला मिळत.

'चंद्र नाहीच तो!' वाढत्या उतावीळपणाने हेक्तर म्हणाला. 'पण मग कोणता ग्रह आहे? शुक्र? बुध? छे! त्यांना स्वतःचे उपग्रह माहीत नाहीत. आपल्या चंद्राला पण उपग्रह नाहीत. पण पृथ्वीच्या कक्षेच्या आतून ज्यांची कक्षा जाते असे ग्रह एवढेच. बेन झूफ! वाईट वाटतं रे! खगोलशास्त्राचा जास्ती अभ्यास मी केला नाही याचं फार दुःख होतंय आज मला!'

- ५ -

पण प्रिय वाचकहो! तुमचा काही तर्क धावतो का? ज्या ग्रहाचे बिंब त्या वेळी वर येत होते तो तुमच्या आमच्या सर्वांच्याच परिचयाचा ग्रह आहे. खुद्द सूर्यचंद्रापेक्षाही जवळचे नाते आहे त्या ग्रहाशी! पण ते असो. तो ग्रह शुक्र नव्हता एवढी गोष्ट दुसऱ्याच रात्री निश्चित ठरली. कारण शुक्राचे अवाढव्य बिंब हेक्तरला बघायला मिळाले. हेक्तरने आपल्या फोटोमीटरच्या साह्याने पाहिले तर गुर्बी बेटावर पडलेले ऊन आणि शुक्राचे तेज- म्हणजेच त्याचे ऊन- यांची तीव्रता सारखीच असल्याचे त्याला आढळले. पृथ्वी नि शुक्र सूर्यापासून सारख्याच अंतरावर असल्याचा हा एक पुरावा होता.

शुक्र म्हणजे प्रतिचंद्रच वाटत होता. चंद्राप्रमाणे त्याच्या कलाही रोज बदलत होत्या. पृथ्वीवरून दिसते तशी शुक्राची कडा रेखीव ठसठशीत दिसत नव्हती. तिला पुसटपणा दंतुरपणा दिसत होता. शुक्रावरचे वातावरण अन् त्या

वातावरणातून जाताना सूर्यप्रकाशाचे होणारे वक्रीभवन हीच कारणे त्याच्या मुळाशी असावीत. शुक्रबिंबावर दिसणारे काही पांढरे ठिपके म्हणजे त्या ग्रहावरचे पर्वत असावेत. तिथे हिमालयाच्या पाचपट उंचीचे पर्वत आहेत असे शास्त्रज्ञ सांगतात.

या एकंदर हिशेबावरून हेक्तरने अशी खूणगाठ बांधली की शुक्र आपल्यापासून ५० किंवा ६० लक्ष मैलांपेक्षा जास्त दूर नाही. या विचाराने त्याच्या मनात चांगलीच दहशत उत्पन्न केली, आणि केव्हा एकदा हे बेन झूफला सांगतो असे त्याला झाले. शेवटी एक दिवस आपला अंदाज त्याने बेनला ऐकवलाच.

'पन्नास साठ लक्ष मैल ? म्हणजे चिकार झाले की!' बेनने शांतपणे उत्तर दिले.

'दोन शत्रुसैन्यं सामोरी उभी असतील तर त्यांना हे अंतर चिकार आहे कबूल. दोन ग्रहांना ते हाकेच्या अंतरासारखं आहे.'

'म्हणजे कसं काय ?'

'म्हणजे असं की आपण शुक्राला गाठायला चाललोत.'

'असू द्या. तुमच्या शुक्रावर हवा आहे का ?'

'आहे.'

'पाणी आहे का ?'

'आहे.'

'मग आपल्याला पृथ्वी काय नि शुक्र काय सारखेच. इथून उडून तिथे पडलो तर काही बिघडायचं नाही!'

'अरे वेड्या, इतकं सोपं नाही ते! मजा अशी की दोन्ही ग्रह एकमेकांवर चालून येत आहेत. त्यांचे आकार जवळ जवळ सारखेच आहेत. तेव्हा टक्कर होण्याची भीती आहे.'

'बाप रे! म्हणजे दोन आगगाड्यांसारखंच म्हणा ना! टक्कर झाली की एक

आगगाडी दुसरीत घुसते तसं. या टकरीत शुक्र पृथ्वीत घुसेल की पृथ्वी शुक्रात हो ?'

'मूर्खा, तुला कसं समजावून सांगू ? या दोन गाड्यांचा वेग इतका भयानक आहे की तुला त्याची कल्पनाच करता येणार नाही. एकच सांगतो- या टकरीनंतर तुझा मॉन्त मार्त्र शिल्लक राहणं शक्य नाही.'

हा मात्र बेन झूफच्या वर्मी घाव होता. त्याची बेफिकीर वृत्ती क्षणात मावळली. त्याने दातओठ चावले, बोटे मोडली आणि क्षणभर तो पांढरा फटफटीत पडला. पण मग एक जोराचा प्रयत्न करून त्याने स्वत:ला सावरले आणि मग काही क्षण थांबून तो जेव्हा बोलला, तेव्हा त्याच्या भावनांचा क्षोभ केवळ त्याच्या किंचित् कापऱ्या आवाजात उमटला असेल तेवढाच.

'साहेब, तो म्हणाला, 'हा मी आपल्यासमोर उभा आहे. काय आज्ञा द्यायची असेल ती द्या. हा प्रसंग टाळण्यासाठी मी काय करावं ते सांगा.'

'तुला नि मला काहीही करतां येणं शक्य नाही. बेन झूफ, शुक्र किंवा पृथ्वी आपलं कुणाचंही ऐकायला तयार नाहीत. ते फक्त देवाची इच्छा मानतात.'

'मग इतकं निराश होण्याचं कारण नाही'' बेन झूफ खाली बसून दुर्बीण उचलीत म्हणाला. 'कारण देव दयाळू आहे अशी माझी खात्री आहे. मॉन्त मार्त्रचा नाश तो होऊ देणार नाही.'

हेक्तरची एका गोष्टीबाबत आता खात्री झाली होती. पृथ्वी निश्चितपणे सूर्याकडे चाललेली होती. उष्णता असह्य होत होती. सूर्यबिंबही नेहमीपेक्षा दुप्पट मोठे दिसत होते. सूर्याकडे थेट धडक मारून पृथ्वीने अवघ्या पंधरा दिवसांत दोन कोटी मैल अंतर तोडले होते ! हा क्रम असाच चालू राहिला तर सूर्याच्या वाढत्या गुरुत्वाकर्षणाची त्यात भर पडून अनिवार वेगाने पृथ्वी सूर्याकडे खेचली जाईल आणि एक दिवस प्रचंड आग पेटून तिची राखरांगोळी होईल. ही सूर्यावरची स्वारी म्हणजे पृथ्वीची आत्महत्या ठरणार आहे.

पण खरोखरच पृथ्वी सूर्याकडे चाल करून जात होती का ? होय, हेक्तरचा

तर्क अंशत: खरा होता- म्हणजे एक प्रकारे या मंडळींची सूर्यावर स्वारी होत होती हे खरे आहे. पण पृथ्वी मात्र सूर्याकडे जात नव्हती. पृथ्वी आपल्या नेहमीच्या भ्रमणमार्गावरूनच फिरत होती. ही मंडळी पृथ्वीवर नसून पृथ्वीच्या एका तुकड्यावर होती! ३१ डिसेंबरच्या त्या मध्यरात्री जो उत्पात झाला- पृथ्वीशी एका धूमकेतूची जी टक्कर झाली तिचा परिणाम होऊन पृथ्वीचा हा टवका उडाला होता. पृथ्वीचा हा तुकडा सर्व बाजूंनी समुद्रवेष्टित होता. आणि त्या समुद्रात यांच्या गुर्बी बेटासारखी फारच थोडी बेटे शिल्लक होती.

हेक्तरला हे सर्व कालांतराने कळले. त्यापूर्वीच काऊंट तिमाशेफशी त्याची गाठ पडली. काऊंटसाहेब नि कॅप्टनसाहेब यांना ते क्षुद्र द्वंद्व खेळण्याची आता फारशी उत्सुकता वाटत नव्हती. कारण त्यापेक्षा फार मोठ्या समस्या त्यांच्यापुढे उभ्या होत्या. रौद्रस्वरूप निसर्गाशी त्यांना द्वंद्व खेळायचे होते. पृथ्वीच्या या तुकड्यावर त्यांच्याखेरीज आणखीसुध्दा काही मंडळी होती. ती सर्व एकत्र आली आणि विलक्षण धैर्य, असामान्य कल्पकता, अवर्णनीय ऐक्यभाव या गुणांचा उपयोग करून त्यांनी आपल्यावर कोसळलेल्या प्रसंगांना तोंड कसे दिले त्याचे वर्णन ज्यूल व्हर्नच्या सूर्यावर स्वारीच्या कादंबरीत सापडते. ते संपूर्ण वाचल्याशिवाय त्याची कल्पना येणार नाही.

◆ ◆ ◆



तोलून मापून धूमकेतू !

'मंडळी! आपली काय कल्पना आहे? कुठे आहोत आपण या क्षणाला?'

प्रश्न विचारणारी मूर्ती मोठी और होती. मांस चरबी जवळ जवळ अजिबात नसलेला तो एक अस्थिपंजर होता. हातपाय म्हणजे जशा काही शेवग्याच्या शेंगा. गालफडे बसलेली, डोईला टक्कल, चष्म्याआडून लुकलुकणारे डोळे विलक्षण भेदक.

'एका नव्या लघुग्रहावर' हेक्तरने उत्तर दिले. 'अंतराळाच्या पोकळीतून हा ग्रह भरकटत चालला आहे.'

वाचकांच्या माहितीसाठी आधीच सांगायला हरकत नाही की पूर्वी ज्यांची

यदृच्छया सूर्यावर स्वारी सुरू झाली होती तीच पात्रे याही कथेत झळकत आहेत.

कॅ. हेक्तर सर्वादाक, त्याचा नोकर बेन झूफ, मित्र काऊन्ट तिमाशेफ आणि काऊन्टसाहेबांच्या 'दोब्रिना' जहाजाचा कप्तान लेफ्टनंट प्रकोपिअस यांचे अंतराळभ्रमण अजून संपलेले नाही; आणि आपण कुठे जात आहो हेही त्यांना अद्याप नीट समजलेले नाही. थंडीचा कडाका वाढतो आहे त्यावरून आणि ग्रहताऱ्यांच्या स्थितीवरून आपण आता सूर्यापासून दूर चाललो आहो एवढाच अंदाज त्यांनी बांधलेला होता. थंडी जेव्हा फारच असह्य झाली तेव्हा एका सुप्त ज्वालामुखीच्या पोटात उतरून त्यातल्या भुयारात त्यांनी वास्तव्य केले होते. तिथे त्यांना पुरेशी उष्णता मिळत होती. लोकही आता थोडे नव्हते. दुसऱ्या एका बेटात जिवंत राहिलेले अकरा रंगेल स्पॅनिश जवान, हान्सा नावाच्या व्यापारी बोटीचा मालक कवडीचुंबक इसाक, निना नावाची गोड बालिका- हिच्याचवरून त्यांनी आपल्या छावणीला 'निना मोहोळ' नाव दिले होते- नि पाब्लो नावाचा तिचा दोस्त, एवढी मंडळी त्यांना येऊन मिळाली होती. जिब्राल्टरच्या जलदुर्गावर तेरा तुसडे इंग्रज होते; ते मात्र काही केल्या यांच्याकडे येत नव्हते. आपल्या गुर्बी बेटाची लोकसंख्या आता पस्तीस होती आणि हेक्तर सर्वादाक हा त्यांचा गव्हर्नर बनला होता.

ज्या छोट्या भूखंडावर बसून त्यांची ही अंतराळ यात्रा चाललेली होती, त्याला त्यांनी- त्यांनी म्हणण्यापेक्षा त्यांना वेळोवेळी संदेश पाठवणाऱ्या एका गूढ अनामिक व्यक्तीने 'गालिया' नाव दिले होते. ही व्यक्ती कोणीतरी प्रकांडपंडित असा शास्त्रज्ञ असणार अशी या मंडळींची खात्री झाली आणि ते त्या व्यक्तीचा कसून शोध करू लागले.

त्यांचा अंदाज बरोबर ठरला.एका लहानशा निर्जन बेटावर, पडक्या लाकडी खोपटात आकाशाकडे दुर्बीण लावून बसलेला एक शास्त्रज्ञ रहात असे. खगोलशास्त्र हे त्याचे सर्वस्व होते. त्याच्यापुढे त्याला कशाचीही शुद्ध

नव्हती. जवळजे अन्न संपले तेव्हा तो मरणोन्मुख होऊन शय्येवर पडला. तशा अवस्थेत हेक्तर नि प्रकोपिअस तिथे जाऊन पोचले आणि त्याला अलगद उचलून त्यांनी आपल्या निना मोहोळात आणले. तिथे पुष्कळ उपचार करूनही तो शुध्दीवर आला नाही. तेव्हा तो मेला अशी खात्री होऊन त्यांना अतोनात दु:ख झाले. कारण अंतराळातून भरकटत असताना त्यांना खगोलज्ञानाची फार फार आवश्यकता होती. ते ज्ञान विराट प्रमाणात असलेली एकटी एक व्यक्ती म्हणजे प्राध्यापक हे महाशय. तेच त्यांचे एकमेव आशास्थान होते.

आणि आशा माणसाला सोडीत नाही हेच खरे. मनाची जवळ जवळ खात्री पटली असूनही सर्वादाक मंडळींनी उपचार चालूच ठेवले. उत्साहमूर्ती बेन झूफ 'पेशन्ट' ला असे मस्त मालिश करीत होता की ते पाहून काऊन्ट तिमाशेफ म्हणालासुध्दा, 'अरे, तू हे करतो आहेस तरी काय ? एखाद्या प्राण्याला बुकलून बुकलून ठार करतात हे आम्ही ऐकलेलं आहे. पण बुकलून जिवंत करण्याचा तुझा हा प्रकार मात्र अजब आहे खरा.'

'त्याचं कारणं म्हणजे हा पेशंटच तसा अजबच आहे!' बेन झूफने चटकन उत्तर दिले. 'आणि काऊन्टसाहेब, आमच्या या रगडण्याने त्याला काही अपाय होईल असं मुळीच समजू नका. उलट आमचेच हात भाजायची जास्त भीती आहे! अहो, ही काय हाडं म्हणायची ? लोखंडाच्या काटक्या आहेत या!'

आणि मग आपल्या अंगमर्दनाला त्याने गाण्याची साथ दिली. त्या गाण्याचा आशय असा सांगता येईल-

'त्रिपोलीची माझी तलवार
आहे कशी तालेवार!
घासून घासून तिचे पाते
करतो चमकदार!'

बेनच्या गाण्यातील अतिशयोक्ती वगळली तरी त्याच्या पेशंटला ते वर्णन पुष्कळच लागू पडत होते यात शंका नाही. प्रोफेसरसाहेबांचा जेमतेम साडेपाच

फूट लांबीचा देह म्हणजे तलवारीचे एक पातेच होते. कठीण चिवट ताठ अशा हाडकांची ती एक छडी होती. आणि ती छडी लवकरच सणसणू लागली.

प्रोफेसरसाहेब मेले नव्हतेच मुळी. ते चांगले जिवंत होते आणि थोड्या वेळाने ते चांगले शुध्दीवर आले. त्यांच्या रोडक्या चेहऱ्यावर गुलाबी छटा दिसू लागली.

आणि हेक्तर सर्वादाकला तो चेहरा एकदम ओळखीचा वाटला!

'हं-बरोबर!' तो आपल्याशी म्हणाला, 'हे गृहस्थ कोण ते आत्ता लक्षात आलं! आमच्या कॉलेजमधले प्रोफेसर रोझेत हे! माझ्या हूडपणाबद्दल ज्यांनी अनेकदा मला शिक्षा ठोठावल्या होत्या, ते विद्वद्वर्य प्रो. रोझेत!

आणि मग जास्तच हिरिरीने हेक्तर आपल्या गुरुजींची सेवा करू लागला. त्याचा परिणाम होऊन प्रोफेसरसाहेब खडखडीत बरे झाले. त्यांच्या आठवणी जाग्या झाल्या. आणि मग आपल्या सभोवती जमलेल्या मंडळींशी ते कथेच्या प्रारंभी सांगितल्याप्रमाणे भाषण करू लागले.

हेक्तरचे उत्तर ऐकून प्रोफेसरसाहेबांनी त्याच्याकडे रोखून पाहिले. मग ते तुच्छतेने म्हणतात, 'लघुग्रह! हे:! कसला लघुग्रह?'

'आम्हाला असं वाटतं की पृथ्वी फुटून उडालेला हा एक तुकडा आहे आणि त्याच्यावर बसून चाललोत आपण-'

'फुटून! हे:! फुटून म्हणे! कुणी फोडला हा तुकडा?'

'धूमकेतूशी टक्कर झाल्यामुळे पृथ्वी फुटली अन् हा तुकडा उडाला. मला वाटतं, त्यालाच तुम्ही गालिया नाव दिलं असावं!'

यावर प्रोफेसरसाहेब काही बोलणार तोच बेन झूफ मध्ये पडला अन् म्हणाला, 'प्रोफेसरसाहेब, तुमचा हा धूमकेतू वस्ताद खरा! पृथ्वीला ढुशी मारायची ठरल्यावर त्याने तिचा जास्तीत जास्त मऊ भाग शोधून काढलान अन् मगच टक्कर दिलीन!'

'मऊ भाग!' प्रो. रोझेत ओरडले आणि आपल्या भीतिदायक चष्म्यातून

त्यांनी बेनवर क्रुद्ध नजर फेकली. 'तुला म्हणायचंय काय ? पृथ्वीचा टणक भाग कोणता असं तुझं म्हणणं आहे ?'

'मॉन्त मार्त्र !' बेन झूफने धिटाईने उत्तर दिले. पॅरिसच्या परिसरातला तो डोंगर म्हणजे बेन-झूफचे तीर्थस्थान ! 'तुमच्या त्या धूमकेतूची छाती असती तर मॉन्त मार्त्रला टक्कर द्यायची होती त्याने ! चांगला त्याचा नक्षा उतरला असता.'

'मॉन्त मार्त्र !' प्रोफेसरसाहेब कमालीची तुच्छता दाखवीत म्हणाले, 'मॉन्त मार्त्रसारखं भिकार वारूळ म्हणे माझ्या गालियाला टक्कर देणार ! अरे गृहस्था, हिमालयाची उत्तुंग शिखरं जरी आड आली असती तरी गालियाने त्यांचा चुराडा केला असता, माहीत आहे ?'

'वारूळ ! मॉन्त मार्त्रला वारूळ म्हणतो !' बेन झूफ खवळला अन् सारे शिष्टाचार विसरून जाऊन मुठी वळून ओरडला, 'मिस्टर प्रोफेसर ! जरा तोंड आवरून बोला ! तुम्हाला बजावून सांगतो की माझा मॉन्त मार्त्र असा तसा नाही. तुमच्या दहा धूमकेतूंच्या ठिकऱ्या करील तो ! मॉन्त मार्त्रचा इंगा तुम्ही पाहिलेला नाही अजून !'

'बेन झूफ, तूच तोंड आवर !' हेक्तरने त्याला बाजूला ओढले.

प्रो. रोझेतनी मॉन्त मार्त्र प्रकरणावर तुच्छतापूर्वक पडदा पाडला आणि ते ताठ होत म्हणाले, 'हेक्तर सर्वादाक, तुझं उत्तर फारसं वाईट नाही. पण यापेक्षा चांगलं उत्तर आहे माझ्या प्रश्नाचं ! ते ऐका आता. पृथ्वीची धूमकेतूशी टक्कर झाली म्हणण्यापेक्षा धूमकेतू तिला नुसता चाटून गेला म्हणा ! आणि जाता जाता त्याने पृथ्वीचा एक भूखंड आपल्या शेपटावर घेतला !'

'म्हणजे-'

'म्हणजे-' विजयाने धुंद झालेल्या दणदणत्या स्वरात प्रोफेसरसाहेब म्हणाले, 'तुमचा आमचा सर्वांचा सध्या शेंडेनक्षत्रावर मुक्काम आहे. आपण सर्व मंडळी धूमकेतूवर स्वार झालो आहो- गालियावर स्वार ! माझ्या गालियावर स्वार !'

- २ -

प्रोफेसर रोझेत यांनी त्यानंतर आणखीसुद्धा कितीतरी माहिती आपल्या श्रोत्यांना दिली. मधून मधून असा वर्ग घेण्याची लहर त्यांना येई. व्याख्यान देताना ते मध्येच चिडत, उखडत, हातवारे करीत. पण त्यांची ज्ञानसरिता अखंड वहात असे.

एकदा ते म्हणाले, 'आपला हा गालिया मोठा अजब धूमकेतू आहे. क्वचित आढळणाररा धूमकेतू. तो वायुरूप नसून घनरूप आहे. त्याची मोजमापं मी ढोबळ आकड्यांत तुम्हाला सांगतो. गालियाचा परीघ २००० मैल; व्यास ६३०० मैल; पृष्ठभाग १३,००,००० चौरस मैल, आकारमान किंवा व्हॉल्यूम १३,४८,३२,००० चौरस घन मैल!'

'म्हणजे पृथ्वीपेक्षा फारच लहान झाला-नाही का?' प्रकोपिअसने भीत भीत सुचवले.''पृथ्वीवरच्या लोकांना आपला हा गालिया यदाकदाचित दिसलाच तरी सातव्या प्रतीच्या ताऱ्याएवढा क्षुद्र दिसेल.'

'बस्स् का?' बेन झूफने आता पर तोंड उघडले.' असलाच का धूमकेतू आहे तुमचा? फुस्स्!'

'तू तोंड मीट पाहू?' व्याख्याते त्याच्यावर चिडून म्हणाले.

'हा म्हणे धूमकेतू!' मॉन्त मार्त्रचा कैवारी आता कसचा स्वस्थ बसतो! त्याची सूडबुद्धी जागी झाली होती. तो पुढे म्हणाला. 'मी याला गोटी म्हणतो-गोटी! किंवा वाटाणा म्हणा!- किंवा टोचणीचं डोकं!-किंवा-'

'बेन झूफ!'

आपल्या मालकाची ती गर्जना ऐकून बेन झूफ उठून चालता झाला. पण सभात्याग करतानाही त्याने 'मोहरीचं बी! वाळूचा कण! 'काही नाही' चं टोक!'

अशी काहीतरी वटवट चालवली होतीच. तो बाहेर गेला तरी त्याचा आवाज कितीतरी वेळ गुहेत घुमत होता.

इकडे बेन निघून जाताच या महापंडिताची क्रोधाग्न विझवण्याच्या सद्बेतूने प्रकोपिअसने खिशातून एक टिप्पणबुक काढले आणि भुवया वक्र करून तो अति गंभीरपणे म्हणाला, 'प्रोफेसरसाहेब, मला असं दिसतं की गालिया हा वाटतो तितका लहान धूमकेतू नाहीच मुळी. १७९८ चा पहिला धूमकेतू किंवा १८०५ चा गँबार्तचा धूमकेतू यांच्या २२ पट त्याचा व्यास आहे.'

प्रोफेसरसाहेबांना ही खुशामत आवडली तरी वरकरणी त्यांनी तसे दाखवले नाही. उलट ते प्रकोपिअसला तोडून बोलले,' ते सगळं माहीत आहे मला, लेफ्टनंटटसाहेब. मला माहीत नसलेल्या गोष्टी सांगा. किंवा तुम्हाला माहीत नसलेलं मी सांगतो. - उदाहरणार्थ, तुम्हाला हे माहीत नसेल, की माझा धूमकेतू जेव्हा सूर्याजवळ चालला होता तेव्हा त्याचं शेपूट मंगळापर्यंत पोचेल एवढं मोठं होतं!'

'प्रोफेसरसाहेब,' काऊंट तिमाशेफ आपली थोडी भर घालीत म्हणाले, 'दहा लघुग्रहांना भारी होईल एवढा मोठा आपला धूमकेतू आहे यात शंकाच नको!'

'मोठा!' हेक्तर कागदावर झटपट काही आकडेमोड करून म्हणाला, 'अहो, त्याचं नुसतं वरवरचं क्षेत्रफळ साडेबारा लक्ष चौरस मैल आहे म्हटलं! म्हणजे इटली, फ्रान्स, स्पेन, ऑस्ट्रिया, जर्मनी, डेनमार्क, हॉलंड, बेल्जियम अन् ब्रिटिश बेटं यांच्या संयुक्त क्षेत्रफळापेक्षा मोठं अशा! धूमकेतूला लहान म्हणणारा महामूर्खच म्हटला पाहिजे.'

प्रोफेसरसाहेबांची कळी या तिहेरी प्रयत्नांनी चांगलीच खुलली. ते म्हणाले, 'गालियाबद्दल बऱ्याच गोष्टी आपल्याला कळल्या. आता फक्त त्याचं वस्तुमान अन् गुरुत्वाकर्षण काढायचं राहिलं!'

'बापरे!' काऊंटसाहेब डोळे विस्फारीत म्हणाले, 'म्हणजे त्याचं वजन

काढायचं की काय? -एवढ्या मोठ्या गालियाला तराजूत घालणार? हे अंमळ अडचणीचंच होईल, नाही का प्रोफेसरसाहेब?'

'अडचणी रोजच माझ्या वाट्याला येत असतात' प्रोफेसरसाहेब गर्वभराने म्हणाले. 'मी त्यांच्यावर मात करतो. पण असो. तूर्त मला दुसरी काही गणितं करायची आहेत. तेव्हा आजचा वर्ग आपण बरखास्त करू या.'

- ३ -

गालियासारख्या प्रचंड धूमकेतूला तराजूच्या पारड्यात घालणे शक्य नाही हे लहान पोरही सांगू शकला असता! पण गालिया मुख्यत्वेकरून ज्या खडकाचा बनलेला आहे त्याचा एक विवक्षित आकाराचा तुकडा घेऊन त्याचे वजन केले की त्यावरून गालियाचे वजन काढणे सहज शक्य होते. प्रोफेसरमहाशयांनी ही गोष्ट सर्वांना समजावून सांगितली. ते म्हणाले, 'काऊंटसाहेब, तुमच्या बोटीवरच्या कारागिराला सांगून मला इथल्या घट्ट खडकाचा बरोबर एक घन फूट तुकडा कापून द्या!'

'एक घन फूट-अ-अ-' तिमाशेफ चाचरत म्हणाला. 'दिला असता पण आमच्याकडे फूटपट्टी नाही, साहेब!'

'फूटपट्टी नाही?' प्रोफेसरसाहेब ओरडले. 'तुम्ही सुधारलेली माणसं आहात की जंगली जनावरं? फूटपट्टी नाही म्हणे! हे:!'

'फूटपट्टी इसाक यहुद्याकडे मिळू शकेल' बेन झूफने सुचवले.

तेव्हा ठरले! इसाक यहुद्याकडे जायचे आणि फूटपट्टी मिळवायची. नुसती फूटपट्टी नाही; त्याच्या 'स्टॉक' मधला स्प्रिंग-बॅलन्स पण!

'जे वजन आपण करणार ते पृथ्वीवरच्या परिभाषेत करायला हवं!' प्रो. रोझेत म्हणाले होते; 'तरच पृथ्वीच्या मानाने गालिया किती हलका आहे ते

आपल्याला कळणार. साध्या तराजूत खडक घालून तोलला तर त्याचं वजन पूर्वी होतं तेवढंच भरेल. कारण दोन्ही तराजूंची पारडी सारख्याच प्रमाणात खाली खेचली जातात; त्यामुळे गुरुत्वाकर्षणात पडलेला फरक जाणवत नाही. तो फरक दाखवू शकेल असा काटा एकच आहे. तो म्हणजे स्प्रिंग -बॅलन्स!'

तडकाफडकी या प्रश्नाचा निकाला लावावा म्हणून प्रो. रोझेत, हेक्तर, तिमाशेफ, प्रकोपिअस अन् बेन झूफ ही मंडळी लगेच इसाक यहुद्याकडे निघाली. वाचकांना इथे सांगितले पाहिजे की इसाक इतर मंडळींपासून फटकून वेगळा राहात असे. आपल्या 'हान्सा' बोटीवरच त्याने मुक्काम ठोकला होता. कारण एकच. बोटीवरचा बहुमोल माल कुणी चोरील की काय ही भीती!

किनाऱ्यापासून दोन-तीन फर्लांग अंतरावर एक छोटी खाडी होती आणि त्या खाडीत 'दोबिना' व 'हान्सा' या दोन्ही बोटी नांगरलेल्या दिसत होत्या. त्यांच्या तळाखालचे पाणी थिजल्यामुळे बर्फाने त्यांना वर उचललेले होते. पूर्वीपेक्षा कमीत कमी वीस फूट अधिक उंचीवर बोटी उभ्या होत्या. इसाकने बर्फ फोडून जो तात्पुरता जिना तयार केला होता तो चढून ही मंडळी वर गेली आणि बेन झूफने कॅबिनचा दरवाजा खडखडावला.

इसाकने घाबऱ्या घाबऱ्या येऊन दार उघडताच आत घुसून या शिष्टमंडळाने सरळ आपली मागणी त्याच्यापुढे मांडली. प्रथम इसाक दादच देईना. पण विनवण्या, धमक्या वगैरे सर्व उपाय योजून झाल्यावर तो एकदाचा स्प्रिंग बॅलन्स एक दिवस वापरायला देण्यास तयार झाला. मात्र एका दिवसाचे भाडे म्हणून त्याने पाच डॉलर मागितले आणि आपला स्प्रिंग बॅलन्स ही नाजूक वस्तू आहे या सबबीखाली वीस डॉलर रक्कम अनामत मागितली. बेन झूफ एकटा असता तर त्याने या त्याच्या मागण्या धुडकावून लावून जबरदस्तीने आपल्याला हव्या असलेल्या जिनसा घेतल्या असत्या. पण हेक्तर सर्वादाक म्हणजे मूर्तिमंत सौजन्य. त्याला शक्य तोवर सक्तीचा उपयोग करायचा नव्हता. त्याने इसाकच्या मागण्या मान्य केल्या. अखेरीस इसाक आपली 'नाजूक वस्तू' घेऊन परत

आला; आणि एका हातात ती घट्ट पकडून दुसरा हात त्याने पैशासाठी पुढे केला.

पंचवीस डॉलर मोजून त्याच्या हातात ठेवण्यात आले तेव्हाच त्याने स्प्रिंग बॅलन्स कॅप्टनसाहेबांच्या पुढे केला. त्यांनी बेन झूफला तो ताब्यात घेण्याबद्दल खूण केली. बेन झूफने असे तोंड केले की जणू एखाद्या महारोग्याला स्पर्श करण्याची आपल्यावर पाळी आली आहे! त्याने पहिल्याने तो इसाकला टेबलावर ठेवायला लावला. मग दोन्ही हातांना कागद गुंडाळून घेऊन फुंकरा मार्‌मारून त्याच्यावरची धूळ उडवली. कागदाने घासून पुसून तो साफ केला. या सर्व कृती तो अशा प्रकारे करीत होता की जणू त्याचे जीवनमरण त्यावर अवलंबून आहे! शेवटी दुसरा स्वच्छ कागद घेऊन त्याने ती वस्तू गुंडाळली अन् आपल्या खिशात ठेवली. आणि तो आता सर्वांबरोबर बाहेर पडणार, इतक्यात प्रोफेसरसाहेब काहीतरी स्मरण झाल्यासारखे थबकलेले त्याला दिसले.

'थांबा!' ते म्हणत होते, 'नुसत्या स्प्रिंग बॅलन्सचा उपयोग नाही. तू आम्हाला एक यार्डाची पट्टी नि एक पौंडाचं वजन पण दिलं पाहिजे.'

'अरेरे! सिन्यॉर प्रोफेसर!' इसाक कळवळत म्हणाला. 'माझ्या जवळ यापैकी एकही चीज नाही. मी तरी काय करू?'

तो खरे बोलतो आहे अशी त्याच्या श्रोत्यांची खात्री झाली. पण त्याचे ते शब्द ऐकून प्रोफेसरसाहेब भयंकर निराश झाले अन् आपला त्रागा त्यांना आवरता आला नाही.

'वजन नाही, पट्टी नाही- मग माप कसलं घेणार कपाळाचं? या मूर्खपणाच्या मोहिमेवर मला आणलंत तरी कशाला? आता मी करू तरी काय?- पण हा प्रश्न तुम्हाला करून उपयोग काय म्हणा! तुम्हाला काही समजण्याची अक्कल असेल तर ना!'

आणि क्रोधाविष्ट झालेले प्रोफेसरसाहेब झटक्यात मागे फिरले आणि जिना

चढू लागले. त्यांचे अनुयायी निमूटपणे त्यांच्यामागून निघाले होते. पण दोन-तीन पायऱ्या चढतात न चढताच तो प्रोफेसरासरांनी एक गिरकी खाल्ली आणि लोकांना जोराने बाजूला सारीत त्यांनी दणकन पुन्हा बोटीवरच्या खोलीत उडी टाकली.

'इसाक!' त्याच्याजवळ जाऊन त्याचा बाहू पकडीत त्यांनी गर्जना केली, ' तुझ्या त्या खणात काही चांदीची नाणी आहेत होय ना?'

'चांदीची नाणी!' आत्ता मिळालेली रक्कम खणात टाकून तो बंद करण्याच्या उद्योगात असलेला इसाक कापऱ्या आवाजात ओरडला, 'आपली काही तरी चूक झाली आहे, सिन्यॉर प्रोफेसर!'

'काही चूक नाही!' प्रोफेसरसाहेब ओरडले. 'पायऱ्या चढत असताना मी खणखण ऐकली ती चांदीच्या नाण्यांची होती! बोला, फ्रेंच नाणी आहेत, खरं ना? पाच फ्रँकची?'

'हो- म्हणजे- न - न नाही!' इसाक अडखळत बोलला. या अचानक हल्ल्यामुळे तो चांगलाच गडबडून गेला होता आणि खण बंद करण्यासाठी त्याची धडपड चालू होती.

पण प्राध्यापकमहाशयांची चपळाई काही और होती. त्यांनी एकदम खणाची मूठ पकडली आणि तो खसकन बाहेर ओढला.

' ती बघ!- नाही म्हणतोस काय?- ती बघ पाच फ्रँकची नाणी!'

आणि एकदम एक जबरदस्त झेप मारून त्यांनी ते पैसे उचलले. पण आता इसाकच्याहि अंगात वाघ संचारला. प्रोफेसरांनी हात बाहेर काढण्यापूर्वीच त्याने सपाट्याने खण मागे दाबला आणि त्यामुळे त्यांची बोटे आत चेमटली गेली.

'राक्षसा! सोड-सोड माझा हात!' प्रोफेसरसाहेब किंचाळले. पण त्यांच्या ओरडण्यात वेदनेपेक्षा क्रोधच जास्त होता. 'मला ती पाच फ्रँकची नाणी मिळालीच पाहिजेत.'

'मिळणार नाहीत!' इसाक आपली सर्व शक्ती एकवटून खण रेटीत

ओरडला. 'मी आधी मरेन, पण तुला पैसे देणार नाही!'

पण प्रोफेसरसाहेबन आकाराने किरकोळ अस्थिपंजर असले तरी त्यांचा एकेक स्नायू म्हणजे लोखंडाची स्प्रिंग होती. पैसे दृष्टीला पडल्यामुळे अन् डाव्या हाताच्या वेदना जाणवू लागल्यामुळे ते जिद्दीला पेटले होते. त्यांनी आता उजव्या हाताने इसाकचे नरडे पकडले आणि ते इतक्या जोराने दाबले की थोड्याशा झटापटीनंतर इसाकचा श्वास पुरता कोंडला गेला आणि प्रोफेसरांचा डावा हात मोकळा झाला.

'मेलो-मेलो! धावा- धावा! खून- खून!' तो कसाबसा ओरडला.

ते दृश्यच इतके विस्मयजनक होते की काही क्षण तरी कॅप्टन सर्वादाक नि त्याचे मित्र नुसते अवाक् होऊन पाहात राहिले. पण बेन झूफची मात्र त्यामुळे भरपूर करमणूक झाली. खुषीत येऊन तो जोरजोराने टाळ्या पिटू लागला.

'शाब्बास प्रोफेसरमूर्ती!' तो ओरडला. 'दाबा-दाबा त्याला! सोडू नका! मुरगळा त्याची मान चांगली!'

प्रकरण फारच विकोपाला चाललेले पाहून कॅप्टन सर्वादाक नि त्याचे मित्र पुढे झाले. प्रथम त्यांनी इसाकची मान सोडवली आणि मग प्रोफेसरांना आवरून धरले. नंतर दोघांनाही श्वासोच्छ्वास करण्यापुरता अवधी दिल्यावर हेक्तरने आपल्या गुरुजींना शांत स्वरात विनंती केली, 'सर, हे लहानसं प्रकरण मी बरोबर हातावेगळं करतो. आपण काळजी करू नका!'

इसाक इतका घाबरलेला होता की अजूनही आपण संकटमुक्त झालो आहो असे त्याला वाटत नव्हते. तो कापऱ्या आवाजात हेक्तरला म्हणाला, 'गव्हर्नरसाहेब! आपणच माझे तारणहार आहा. मी एक गरीब धडपड्या माणूस आहे, सरकार!'

'तू गप्प बैस!' हेक्तरने त्याला दरडावले आणि मग प्रोफेसरांकडे वळून विचारले, 'सर, तुम्हाला पाच फ्रँकची किती नाणी हवी आहेत?'

'चाळीस!' बोटावर फुंकर मारीत प्रोफेसरांनी उत्तर दिले.

'बाप रे!' इसाक पुटपुटला. 'म्हणजे दोनशे फ्रँक झाले की!'

'शिवाय-' प्रोफेसर म्हणाले, 'मला दोन फ्रँकवाली दहा नाणी लागतील, आणि अर्धा फ्रँकवाली वीस!'

'म्हणजे आणखी तीस फ्रँक!' इसाक कण्हायला लागला. 'हा काय नाणेबाजार आहे? निढळाच्या घामाने मिळवलेले गरिबाचे पैसे-एकंदर किती लुटणार आहा?'

'एकंदर दोनशेतीस फ्रँक' हेक्तर म्हणाला. 'काऊंटसाहेब, हे कर्ज या माणसाकडून आपल्याला जबरदस्तीने घेतले पाहिजे. त्यासाठी अनामत ठेवायला तुमच्यापाशी काही आहे का?'

'माझी थैली तुम्ही केव्हाही वापरू शकता.' तिमाशेफ म्हणाला. 'ही घ्या. दुर्दैवाने तीत आता बहुतेक नोटाच दिसताहेत.'

'कागद नको- कागद नको!' इसाकने कावकाव सुरू केली. गालियावर कागदी चलनाला किंमत नाही!'

'हरामखोरा!' तिमाशेफ ओरडला. 'गालियावर कुठल्या चलनाला किंमत आहे ते सांग की!'

'हे बघ, इसाक-' हेक्तर कपाळावर आठ्या चढवून रागीट स्वरात म्हणाला, 'तुझं फार ऐकून घेतलं आम्ही. आता आमचा आणखी अंत पाहू नकोस. काही झालं तरी ही नाणी आम्ही घेणारच!'

'लूट-लूट-दरोडा!' इसाक किंचाळला. 'खू.....'

'जेडेदिया*, तोंड मीट! झालंय् काय तुला किंचाळायला?'

'सोड त्याला, बेन झूफ' हेक्तर म्हणाला, 'तो आपोआप तयार होईल बघ.'

'कधीच नाही-कधीच नाही!' इसाकच्या घोगऱ्या कंठातून शब्द उमटले.

'कधीच नाही म्हणून चालायचं नाही' हेक्तर म्हणाला. 'आम्हाला ही सत्तर

---

* पुराणातला यहुदी खलपुरुष

नाणी कर्जाऊ दे. त्याबद्दल तुला व्याज किती हवं ते बोल.'

'व्याज-' इसाकची कळी क्षणार्धात खुलली होती. 'असं काही तरी बोला, गव्हर्नरसाहेब. पण- पण बाजार किती गरम आहे ते आपण जाणताच.'

'ते शास्त्र मला सांगू नकोस. तुला व्याज किती हवं ते बोल.'

'व्याज- दोनशे तीस फ्रँकचं व्याज- अ-अ- दिवसाकाठी दहा फ्रँक द्याल?'

'दिवसाकाठी दहा फ्रँक?'

'म्हणजे वर्षाला छत्तीसशे पन्नास फ्रँक झाले!' प्रकोपिअस उद्गारला. 'सोळाशे टक्के व्याजाचा दर-- च्यॅ!'

'आमची शक्य तेवढी बोडंती कर!' बेन झूफ खेकसला. 'उद्या या बदमाषाचा बाप मेला अन् डोळे मिटायसाठी नाणी ठेवायची असली तर त्यांचही व्याज मागील हा हरामखोर! प्रोफेसरसाहेब, मघाशीच याची मुंडी का हो मुरगळली नाहीत?'

- ४ -

आणखी पंधरा मिनिटानंतर सर्व मंडळी पुन्हा दिवाणखान्यात गोळा झाली. प्रोफेसरमहाशय धूमकेतूचे वजन कसे करतात ते प्रत्यक्ष पाहण्याची प्रत्येकाला उत्सुकता लागली होती.

प्रोफेसरांनी टेबलावर सत्तर नाण्यांच्या चार राशी केल्या होत्या. एका राशीत अर्धा फ्रँकची वीस नाणी होती. दुसऱ्या राशीत दोन फ्रँकवाली दहा नाणी होती. आणि बाकीच्य दोन राशींत पाच फ्रँकवाली वीस वीस नाणी होती.

'मंडळी!' प्राध्यापकमहाशय संतुष्ट चित्ताने बोलू लागले, 'उत्पाताच्या हादऱ्यामुळे तुमचे मेंदू ताळ्यावर राहिले नाहीत हे उघड दिसतं. नाहीतर यार्डपट्टी किंवा मीटरपट्टी नि पौंडाचं किंवा किलोग्रामचं वजन असल्या नित्य गरजेच्या वस्तू तुम्ही बरोबर बाळगल्याशिवाय राहिला नसता. पण तुमच्या या

चुकीची भरपाई मी माझं डोकं चालवून केली आहे. कशी ती पाहा.'

आपल्या या टोमण्याखाली श्रोते कितपत चिरडले गेले ते पाहण्यासाठी प्रोफेसरांनी किंचित थांबून सर्वांवरून दृष्टी फिरवली. पण कोणावरच फारसा परिणाम झालेला नाही असे पाहून ते पुढे बोलू लागले, 'मंडळी आपण पाहताच आहा की सर्व नाणी टांकसाळीतून आत्ताच बाहेर पडल्यासारखी कोरी आहेत. त्यामुळे आकारात नि वजनात ती बिनचूक नि काटोकोर आहेत. तुम्हाला हेही माहीत असेल की फ्रेंच नाण्यांच्या बाबतीत दशमानपद्धतीचा काटेकोरपणे अवलंब केलेला असतो. फ्रँक हे फ्रान्समधील एकक किंवा युनिट मानलेलं आहे. त्याच्यापेक्षा जास्त किमतीची सर्व नाणी फ्रँकची अधिकपट करून केलेली असतात आणि फ्रँकपेक्षा कमी किमतीची नाणी फ्रँकचा कुठचातरी दशांश असतात. शिवाय सर्व नाण्यांचे आकार बिनचूक असतात. त्यांचे व्यास सरकारने ठरवून दिलेले आहेत.

'आता माझ्या पुढ्यातील ही नाणी पहा. यातलं पाच फ्रँकचं प्रत्येक नाणं मीटरच्या ३७-एक सहस्रांश एवढ्या व्यासाचं आहे. दोन फ्रँकचं प्रत्येक नाणं मीटरच्या .०२७ व्यासाचं आहे. आणि अर्ध्या फ्रँकचं प्रत्येक नाणं मीटरच्या .०१८ व्यासाचं आहे. आता पाहा- ही पाच फ्रँकची दहा नाणी मी एका ओळीत चिकटून चिकटून मांडतो. म्हणजे त्यांची .३७०मीटर लांबी झाली. त्याच ओळीत पुढे दोन फ्रँकवाली दहा नाणी मांडतो. म्हणजे .२७० मीटर झाले. आणि शेवटी त्याच ओळीत ही अर्धा फ्रँकवाली नाणी मांडून मी माझी ओळ पुरी करतो. म्हणजे हे आणखी .३६० मीटर झाले. आता तिन्हींमधल्या अंशांची म्हणजे ३७० अन् २७० अन् ३६० यांची बेरीज केली की बरोबर १००० झाले. म्हणजे ओळीची लांबी या टोकापासून त्या टोकापर्यंत १ हजार सहस्रांश किंवा बरोबर एक मीटर झाली. बरोब्बर एक मीटर- जास्त कमी काही नाही.'

हे गणित सोपे असल्यामुळे सर्वांना सहज समजले आणि सर्वांनी टाळ्या

वाजवून प्रोफेसरसाहेबांच्या डोकेबाजपणाचे कौतुक केले. बेन झूफ तर चकित होऊन म्हणाला, 'च्यॅ! या पंडित मंडळींनाही बरंच व्यवहारज्ञान असतं म्हणायचं! मला कुणीही नाणी दिली असती अन् त्याचा मीटर करायला सांगितला असता तर मी गपकन ही नाणीच गिळून टाकली असती!'

'दुसरं काय करणार तू?' प्रोफेसरसाहेब डोळे वटारून म्हणाले. 'मॉन्त मार्त्रच्या सुपुत्रा! नुसता नाण्यांचा मीटर करून अडाण्याचा पंडित बनतो असं समजू नकोस.'

नाण्यांच्या आधाराने प्रोफेसरसाहेबांनी टेबलावर बरोबर एक मीटर लांबीची रेघ आखली. मग कंपास घेऊन त्यांनी त्या रेघेचे दहा सारखे भाग पाडले. म्हणजे एकेक भाग हा एक डेसिमीटर झाला, नंतर बरोबर एक डेसिमीटर लांबीची एक काठी कापून घेऊन त्यांनी ती 'दोब्रिना' च्या कारागिराजवळ दिली. याच कारागिराला एक घन डेसिमीटरचा चौरस ठोकळा करून देण्याची आज्ञा झालेली होती. लाकडी ठोकळा नाही; ज्वालामुखीच्या खडकाचा तुकडा.

'मंडळी!' प्रो. रोझेत म्हणाले, 'हा तुकडा तयार होत आहे तोवर पृथ्वीवरचं वजनाचं प्रमाण जे पौंड- किंवा फ्रेंच पध्दतीप्रमाणे बोलायचं तर किलोग्राम-ते कसं काढायचं हे आपण पाहू.'

'फ्रेंच नाणी केवळ आकारातच नाही तर वजनातही काटेकोर असतात. त्यांची वजनंसुद्धा कायद्याने ठरवून दिलेली आहेत. पाच फ्रँकचं नाणं हे किलोग्रामच्या चाळिसांश वजनाचं म्हणजे २५ ग्राम वजनाचं असतं. अर्थात असली चाळीस नाणी एकत्र केली की आपल्याला एक किलोग्रामचं वजन मिळेल!'

' वा वा !' बेन झूफ म्हणाला. 'हा शोधं लावायचा म्हणजे मला महापंडिताहून महान बनलं पाहिजे.'

'महापंडिताहून महान या जगात कुणीही नाही, बेन झूफ!' सर्वादाक हसून

म्हणाला.

'का बरं?' बेन झूफने उत्तर केले. 'माफ करा, गव्हर्नरसाहेब. पण पैसेवाला माणूस हा महापंडितापेक्षा महान असतो. जवळ दोनशे फ्रँकची नाणी नसतील तर मी महापंडित होऊनही हे वजन काढणार कसं?'

बेनच्या या उद्गारांवर कोणी हसले नाही. कारण त्यात विनोदापेक्षा सत्याचा भागच जास्त होता. आणि कटू सत्य कोणालाच आवडत नाही! एव्हाना दोब्रिनाच्या कारागिराने खडकाचा एक घन डेसिमीटरचा तुकडा बिनचूकपणे कापून प्रोफेसरसाहेबांच्या हातात दिला होता. त्याचा समारंभपूर्वक स्वीकार करून प्रोफेसरसाहेबांनी आपले व्याख्यान पुढे चालू केले--

'मंडळी, तुम्हाला कदाचित माहीत नसेल किंवा तुम्ही विसरला असाल म्हणून मी आठवण करून देतो. न्यूटनचा प्रसिध्द नियम असा आहे की एका वस्तूचं दुसऱ्या वस्तूबद्दलचं आकर्षण हे आकर्षून घेणाऱ्या वस्तूच्या वस्तुमानाच्या किंवा 'मास' च्या समप्रमाणात असतं आणि त्या दोन वस्तूंमधलं जे अंतर असेल त्याच्या वर्गावर किंवा 'स्क्वेअर' वर व्यस्त प्रमाणात अवलंबून असतं. हे तत्त्व कृपया तुम्ही ध्यानात ठेवा.'

प्रत्येकजण लक्षपूर्वक हे भाषण ऐकत होता. अगदी मागच्या बाजूस बसलेले स्पॅनिश बंधूही जिवाचे कान करून ऐकत होते.

'आता असं बघा-' प्रोफेसरसाहेब म्हणाले, 'ही एक पिशवी आहे. तीत पाच- फ्रँकवाली चाळीस नाणी आहेत. म्हणजे हिचं वजन पृथ्वीवर बरोब्बर एक किलोग्राम भरेल- म्हणजे मी पृथ्वीवर असतो अन् याच स्प्रिंग बॅलन्सच्या हुकाला ही पिशवी अडकवली असती तर तिचं वजन एक किलोग्रॅम भरलं असतं. हे कळलं ना?'

श्रोत्यांना आपला मुद्दा कळला आहे एवढी खात्री पटताच प्रोफेसरसाहेब पुढे म्हणाले, 'मंडळी, आता हेच वजन आपण गालियावर असताना या

हुकाला अडकवून बघू- पहा, काटा थरथरू लागला! आता तो स्थिर झाला. कितीवर? १३३ ग्राम्सवर. म्हणजे याचा अर्थ असा की जी वस्तू पृथ्वीवर एक किलो किंवा एक हजार ग्राम भरली असती ती इथे जवळ जवळ ७॥ पट कमी भरली. याचाच अर्थ असा की गालियाची गुरुत्वकर्षणशक्ती पृथ्वीपेक्षा ७॥ पट कमी आहे.'

'त्याबद्दल आता शंकाच नाही' हेक्तर आपल्या आचार्यांवर खूष होऊन म्हणाला. 'आता सर, यावरून वस्तुमान किंवा 'मास' काढता येईल का आपल्याला!'

''मास' नाही. आधी 'डेन्सिटी' घनशक्ती काढली पाहिजे.'

हेक्तरच्या चेहऱ्यावर आश्चर्य दिसलेले पाहून प्रकोपिअसने त्याला एकीकडे समजावून सांगितले.

'प्रोफेसरसाहेब म्हणतात ते अगदी बरोबर आहे. आपल्याला गालियाचा व्हॉल्यूम माहीत आहेच. आता डेन्सिटी काढली की त्याचा मास माहीत व्हायला काही वेळ लागणार नाही.'

'खरंच की!' हेक्तर म्हणाला. 'ते मी विसरलोच होतो.'

इकडे प्रोफेसरांनी लोकांचे लक्ष वेधण्यासाठी डाव्या हाताची मूठ टेबलावर आपटली आणि उजव्या हातात खडकाचा तुकडा घेऊन ते म्हणाले, 'तुम्हाला माहीत आहेच की गालियावर सर्वत्र आढळणाऱ्या स्फटिकतुल्य पदार्थाचा हा तुकडा आहे. तुम्ही दोब्रिनातून प्रवास करून आलात तेव्हा जिकडे तिकडे तुम्हाला हाच पदार्थ आढळला होता. तेव्हा माझा गालिया बव्हंशी याच एकमेव द्रव्याचा बनलेला आहे असं अनुमान काढायला काही हरकत नाही. ज्या धूमकेतूवर स्वार होऊन आपला पृथ्वीचा छोटा तुकडा चाललेला आहे तो धूमकेतू म्हणजे हा पदार्थ- आता या तुकड्याचं वजन पृथ्वीवर किती भरेल? इथे जितकं भरेल त्याच्या ७॥ पट. हे अगदी निस्संदिग्ध आहे. कारण पृथ्वीचं आकर्षण गालियाच्या ७॥ पट आहे. हे कळलं ना?'

हा प्रश्न करताना प्रोफेसरांनी बेन झूफकडे रोखून पाहिले.

'नाही-' बेन झूफ डोके खाजवीत म्हणाला, 'मला नाही कळलं नीटसं!'

'मला वाटलंच!' प्रो. रोझेत म्हणाले. 'पण तुझ्यासारख्या रेम्याडोक्यांसाठी वेळ घालवायला मी तयार नाही. भर मध्यान्हीच्या वेळी 'सूर्य कुठे आहे' म्हणून कुरकुरणारे लोक जगात असतातच.'

'मध्यान्ही ढग आलेले असले तर तुम्हाला तरी दिसेल का सूर्य?' बेन झूफने सवाल केला. पण तोंडातल्या तोंडात पुटपुटत. त्याला या महापंडिताची आता अंमळ भीती वाटू लागली होती.

'आता मी या तुकड्याचं वजन करतो-' प्रोफेसरमहाशय म्हणत होते, 'म्हणजे लहान प्रमाणावर गालियाचंच वजन करतो असं म्हणा ना! पाहा, काटा १३३३ ग्राम्सवर थांबला. याला ७॥ नी गुणलं की १० हजार ग्राम येतात; म्हणजे १० किलोग्रॅम, किंवा जवळजवळ २२ इंग्लिश पौंड. असाच जर पृथ्वीच्या सर्वसामान्य द्रव्याचा तुकडा घेऊन त्याचं वजन केलं तर ते किती भरेल? जवळ जवळ ५ किलोग्राम किंवा ११ पौंड. यावरून कोणता निष्कर्ष निघतो? हाच की गालियाची घनता पृथ्वीच्या दुप्पट आहे. गालियाची गुरुत्वाकर्षणशक्ती पृथ्वीच्या ७॥पट कमी असण्याऐवजी ती जर १५ पट कमी असती, तर हे दोन्ही ग्रह सारखेच घन किंवा घट्ट आहेत असं मी म्हटलं असतं. पण वस्तुस्थिती तशी नाही. माझा धूमकेतू पृथ्वीच्या दुपटीने घट्ट आहे!''

हे शब्द उच्चारताना प्रोफेसर रोझेत इतक्या आत्मगौरवाने आपल्या श्रोतुवृंदावरून दृष्टी फिरवीत होते की त्यांचे बाह्य दर्शन एकाएकी भव्य बनले होते. हा एक मामुली हाडकुळा माणूस नसून दुप्पट मोठ्या आकाराचा राक्षस आहे असाच पाहणाऱ्यांना क्षणभर भास झाला.

अशा प्रसंगी प्रोफेसरसाहेबांनी आपले बोलणे जास्त वेळ स्थगित ठेवले असते तरी ते क्षम्य झाले असते. पण नाही. मिनिटाभरातच त्यांनी आपले

भाषण पुढे सुरू केले.

- ५ -

'मंडळी!' प्रोफेसर रोझेत म्हणाले, 'आता गालियासंबंधी मी ढोबळ आकडे सांगतो ते ऐका- परिघ २ हजार मैल; व्यास ६३०० मैल; पृष्ठभाग १३ लक्ष चौरस मैल; आकारमान किंवा व्हॉल्यूम जवळ जवळ साडेतेरा कोटी मैल. घनमान पृथ्वीच्या दुप्पट; गुरुत्वाकर्षण पृथ्वीच्या साडेसात पट. आता आपल्याला वस्तुमान किंवा 'मास' काढणं आहे. म्हणजेच निश्चित वजन किती ते काढायचं आहे.'

'हे साध्या अंकगणिताचं काम आहे. एक घन डेसिमीटर एवढ्या गालियाच्या तुकड्याचं वजन जर १० किलोग्राम भरतं, तर सबंध गालियाचं किती भरेल ? सबंध गालिया किती डेसिमीटरचा आहे ? ते काढा नि त्याला १० नीं गुणा, म्हणजे येतील तेवढे किलोग्राम हे गालियाचं वजन. गालियाचा आकार किंवा व्हॉल्यूम किती आहे ? १३ कोटी ४० लक्ष घन मैल. म्हणजेच ५३ कोटी ३० लक्ष घन किलोमीटर.

म्हणजेच तुम्ही ज्याला क्विन्टिलियन १ म्हणता तसे ५३३ क्विन्टिलियन भरतील इतके डेसिमीटर. याला दहानी गुणा पाच पूर्णांक एक तृतीयांश सेक्स्न्टिलियन किंवा २ किलोग्राम. हे गालियाचं वजन. इंग्लिश पौंड करायचे

---

१ 'क्विन्टिलियन' म्हणजे इंग्लंडमध्ये दशलक्षाचा पाचवा वर्ग (एकावर ३० शून्ये) असला तरी अमेरिका व फ्रान्स या देशांत-म्हणजे आपल्या कथानकातही-त्याचे मूल्य एकावर १८ शून्ये एवढेच आहे. म्हणजे अब्ज गुणिले अब्ज; किंवा एकूण दहा परार्ध!

२ 'सेक्स्टिलियन' म्हणजे इंग्लंडमध्ये दशलक्षाचा सहावा वर्ग (एकावर ३६ शून्ये); पण आपल्या कथानकात फ्रान्स-अमेरिकेप्रमाणे एकावर २१ शून्ये.

असतील तर १२ सेक्सटिलियन होतील. म्हणजे साडेपाच क्विन्टिलियन टन!''

'क्विन्टिलियन काय, सेक्स्टिलियन काय?' बेन झूफ एक प्रचंड हास्य करून म्हणाला, 'आपल्याला तर बाबा या भानगडी मुळीच कळल्या नाहीत!'

'सेक्सटिलियन म्हणजे किती हे खरोखर जाणून घ्यायचंय का तुला?' प्रोफेसरांनी ताडकन प्रश्न केला.

'काय हरकत आहे? नवीन ज्ञान मिळवायला मी नेहमीच हपापलेला असतो!' कोणाकडे तरी पाहून डोळा मिचकावीत बेन झूफ उद्गारला.

'कसं बरं सांगू तुला?' प्रोफेसरसाहेब कपाळावर आठ्या चढवीत म्हणाले. 'हं-असं करू. मिलियर्ड म्हणजे काय माहीत आहे तुला?'

बेन नम्रपणे म्हणाला, 'माहीत आहेसं वाटतं.'

'मग सांग किती ते?'

'अ- खूप - खूप - खूप- खूप--'

'हो का?' प्रोफेसरसाहेब उखडले. 'बरंच कळतंय म्हणायचं! पण नुसतं खूप खूप करून गणितात चालत नसतं. काहीतरी निश्चित संख्या काढावी लागते. थांब. मी तुला थोडी मदत करतो. एका वर्षाची मिनिटं केली तर खूप खूप होतील, नाही का?'

'होतील.'

'शंभर वर्षांत आणखी खूप-खूप-खूप होतील नाही का?'

'हो. होतील.'

'आणि येशूच्या जन्मापासून आजतागायत: म्हणजे १८७० वर्षांची तर खूप- खूप खूप मिनिटं होतील, हे पटतं?'

'पटतं म्हणजे काय? खूप-खूप म्हणजे चिकारच होतील. त्याचा हिशोब करणं शक्य नाही!'

'ते पाहू आपण. समज, तू येशू ख्रिस्ताच्या काळात असतास अन् एका टांकसाळीत तुला नाणी मोजण्याच्या कामावर नेमलं असतं-

बेन झूफ जिभल्या चाटीत म्हणाला, 'प्रोफेसरसाहेब, तुम्ही माझी मस्करी तर करीत नाही?'

'आणि तेव्हापासून आतापर्यंत तू मिनिटाला एक-सेकंदाला नाही, बरं? मिनिटाला एक या हिशेबाने नाणी मोजीत बसला असतास म्हणजे दर तासाला साठ, दर दिवसाला १४४०, किंवा दर वर्षाला ५ लक्ष अशी निश्चित मोजणी धरूनसुद्धा एक अब्ज नाणी तुझी आतापर्यंत मोजून झाली नसती!

'तू चिकाटीने तसाच मोजीत राहिलास तर आजपासून आणखी १८,००० वर्षांनी तू एक 'बिलियन'* च्या म्हणजे ९९ कोटीच्या जवळपास आलेला असशील. शंभर कोटी पुरे करशील तेव्हा कुठे तुझे बिलियन किंवा एक अब्ज पुरे होतील.'

"मला त्याच्या आधीच वेड लागेल, साहेब! खरं सांगायचं तर आत्ताच माझं डोकं गरगरायला लागलं आहे!"

"असे एक हजार बिलियन म्हणजेच एक ट्रिलियन किंवा एक मिलियर्ड!"*

'ब्ब- ब्ब- ब्ब- ब्ब-'

'हे ट्रिलियन पुरे करायचेच असं ठरवून तू जिद्दीने मोजीत राहिलास तर तुला आपलं ध्येय गाठायला १९,९८,१३० वर्षं लागतील, म्हणजे हिशेबाच्या सोयीसाठी २० लाख वर्षं म्हण!'

'सोय-सोय म्हणे! बया-बया-बया-! वीस लाख वर्षं!' त्याच्या पुढल्या हजार वर्षांनी तू क्वाड्रिलियन पूर्ण करून क्विन्टिलियन सुरू करशील. आणि-'

'ट्री-सुरुवात नको, साहेब! इथेच माझा शेवट झाला! प्रोफेसरसाहेब, बेन झूफच्या मेंदूचा तुम्ही सपशेल फडशा पाडलात!! आता मेंदूची ती क्विन्टिलियन शकलं बाहेर पडण्यापूर्वीच मला इथून पळ काढू द्या!'

* बिलियन - हजार 'मिलियन'

* मिलियर्ड - एक महापद्म

आणि असे म्हणून तो उठून दरवाजाकडे धावलाही.

प्रो. रोझेत त्याला समजावणीच्या सुरात म्हणाले, 'अरे बाळा मॉन्त मार्त्रच्या सुपुत्रा! आपण अजून सेक्स्टिलियनपर्यंत आलो नाही!'

पण बेन झूफ जास्त ऐकायला थांबला नव्हता. त्याच्या पलायनाबरोबर प्रोफेसरांनी सर्वांवरून एकदा विजयानंदाची नजर फिरवली होती आणि सभेने टाळ्यांचा कडकडाट करून त्यांचा सत्कार केला होता.

पण या विजयानंतर प्रोफेसरसाहेब लवकरच पुन्हा अस्वस्थ दिसू लागले. आपल्या ज्ञानाची आग कुणावर तरी पाखडायला त्यांचा मेंदू शिवशिवत होता. त्यांची ही अडचण ओळखून हेक्तर त्यांच्या मदतीला धावला.

'सर!' तो उभा राहून म्हणाला. 'मला नि माझ्या मित्रांना काही शंका आहेत.'

'विचार!' प्रोफेसरांची कळी पुन्हा खुलली.

'गालियाचं वजन तुम्ही काढलंत. आता पृथ्वीचं वजन सांगता का?'

'सहा सेक्स्टिलियन टन' प्रोफेसरसाहेब ताडकन म्हणाले.

'किती गालियांची मिळून एक पृथ्वी होईल?'

'१७२८ गालियांची.'

'पृथ्वी गालियापेक्षा किती जड आहे?'

'९०० पट जड.'

'किती गालियांचा मिळून एक चंद्र होईल?'

'पस्तीस गालियांचा.'

'चंद्राचं वजन किती?'

'१६ अब्ज गुणिले कोटी, गुणिले कोटी. सरासरी सत्तर क्विन्टिलिय टन.'

'सूर्याचं किती?'

---

६ सेक्स्टिलियन - एकावर एकवीस शून्ये.

७० क्विन्टिलियन - सत्तरावर अठरा शून्ये.

'दोन ऑक्टिलियन टन.' हे उत्तर देताना श्वास घ्यायलासुध्दा तो महापुरुष थांबला नाही.

हेक्तरचे प्रश्नांचे भांडार संपल्यामुळे त्याने एक डोळा बारीक करून प्रकोपिअसकडे पाहिले. लगेच प्रकोपिअस कुमक घेऊन आला.

'प्रोफेसरसाहेब,' तो म्हणाला, 'आपण आत्ताच सांगितलंत की गालियावर गुरुत्वाकर्षणशक्ती पृथ्वीच्या ७॥ पट कमी आहे.'

'बरं, मग?'

'म्हणजे आपली स्नायुशक्ती ७॥ पट वाढलेली असणार?'

'अर्थात!' प्रोफेसरसाहेब उतावीळपणे उद्‌गारले.

'आणि म्हणूनच आपण इतक्या सहज हालचाली करतो, वजनं उचलतो'

'अर्थात!' प्रोफेसरसाहेबांनी त्याला मध्येच तोडले. असली साधी बावळट विधाने करून याने आपला वेळ खावा याचा त्यांना भयंकर संताप आला होता.

खरी गोष्ट अशी होती की प्रकोपिअसजवळसुद्धा विचारण्याजोगे प्रश्न नव्हते. हेक्तरने ते ओळखले आणि आता तो पुढे धावला.

'त्याचं असं आहे सर-' तो म्हणाला, 'आम्हाला प्रश्न पडला आहे तो हा की दुसऱ्या ग्रहांवर गुरुत्वाकर्षण किती प्रमाणात असेल?'

'सर्वादाक!'' प्रोफेसरसाहेबांनी डोळे तांबारून गर्जना केली. 'हा प्रश्न तू विचारतोस मला? तू? माझा एके काळचा विद्यार्थी?? शरम वाटते आहे मला तुझी!'

'साहजिक आहे, सर-' सर्वादाकने मान खाली घातली. 'माझी मलासुद्धा शरम वाटते आहे. पण दुर्दैवाने अलीकडे माझं अवधान सुटत चाललंय् खरं! तुम्ही आमच्या ज्ञानाला उजाळा द्या ना, सर?'

'आम्हाला सर्वांनाच ती माहिती हवी आहे' तिमाशेफने दुजोरा दिला.

---

२ ऑक्टोलियन - दोनावर सत्तावीस शून्ये.

'ठीक आहे' प्रोफेसरसाहेब जरा नरम येऊन म्हणाले. 'ऐका पृथ्वीचं गुरुत्वाकर्षण हे आपण प्रमाण किंवा युनिट मानू. चंद्राचं आकर्षण एक षष्ठांश आहे; मंगळाचं एक द्वितियांश; बुधाचं दोन पंचामांश; शुक्राचं नऊ दशांश; शनीचं १/१/७; गुरूचं दोन साडेतीनांश आणि सूर्याचं २७ पट.'

'म्हणजे पृथ्वीवरचं एक पौंड वजन सूर्यावर २७ पौंड भरेल ?'

'अर्थात. म्हणजे पृथ्वीवर तोफ डागली असता जो गोळा ५ मैल जाऊ शकतो तो सूर्यावर जेमतेम हजार फुटांवर जाऊन पडेल.'

'भित्र्या भागूबाईंना लढायला बरं आहे ते रणांगण!' बेन झूफने दाराशी येऊन फुसकुली सोडली. आणि मग तो मोठ्याने म्हणाला, 'प्रोफेसरसाहेब, माझं वजन किती भरेल इथे ?'

'जेमतेम सहा महिन्यांच्या बेबीइतकं. फार फार तर वीस पौंड.'

'आणि बेन झूफ,'' प्रकोपिअस म्हणाला, 'गालिया जर आणखी लहान असता-'

'आणखी लहान ?' बेन झूफ डोळा मारीत म्हणतो. 'या पुटकुळीपेक्षा आणखी लहान काहीतरी असेल का ?'

'गालिया लहान असेल-' प्रोफेसरसाहेब क्रुद्ध स्वरात म्हणाले, 'पण तू ज्याला डोकं म्हणतोस त्या तुझ्या नारळातला मेंदू मात्र गालियातल्या द्रव्याच्या अणूइतकासुद्धा भरणार नाही! असले क्विन्टिलियन नारळ एकत्र केले तर त्यातून कदाचित एका बदकाच्या मेंदूपुरतं खोबरं निघेल; आणि असले सेक्सटिलियन-''

पण बेन झूफ जास्त ऐकायला थांबला नाही. प्रोफेसरांनी क्विन्टी नि सेक्सटीच्या तोफा ठासताच पाचावर धारण बसून तो तिथून पळाला होता.

सर्वादाक आणि मंडळी, मुक्काम शेंडेनक्षत्र यांना त्यांचा गालिया अंतराळातून फरपटत नेत असता त्यांची दिनचर्या अशा मजेने सुरू होती. गमतीजमतीबरोबर ज्ञानही त्यांना भरपूर मिळत होते. त्याचा समग्र वृत्तांत

वाचायचा म्हणजे ज्यूल व्हर्नची ती चित्तथरारक कादंबरीच जवळ करायला हवी!

◆ ◆ ◆

अचाट साहसाने भरलेल्या ज्यूल व्हर्न कादंबऱ्या



ज्यूल व्हर्न (१८२८-१९०५) हा फ्रान्समधला एक विज्ञानवेडा कादंबरीकार. त्याच्या प्रतिभेने पृथ्वी, समुद्र, आकाश तर व्यापलेच पण अंतराळातसुद्धा भराऱ्या मारल्या. अंवजड विमान आकाशोड्डाण करू शकेल ही गोष्ट लोकांना खरी वाटली नसती अशा काळात त्याचा कथानायक 'हवाई हुकुमशहा' कॅ. रोबर याने वाचकांना आपल्या खास विमानातून जगभर हिंडवून आणले. पृथ्वीवर जेव्हा उत्पात झाला तेव्हा त्याचे कथानायक 'धूमकेतूच्या शेपटावर स्वार' होऊन सूर्याकडे रवाना झाले!

हे विज्ञानसृष्टीतले चमत्कार तुम्ही पहिल्या संचात वाचलेत. आता हा पाच कादंबऱ्यांचा दुसरा संच वाचा. रॉकेट हा प्रकार आत्ता कुठे तुम्हा आम्हाला माहीत झाला आहे. शंभर वर्षांपूर्वी ते शक्य तरी होते का? पण ज्यूल व्हर्न रॉकेटसाठी थांबला नाही. त्याने आपल्या बहाद्दर मानसपुत्रांना तोफेच्या पोकळ गोळ्यात बसवून धुडमदिशी 'चंद्रावर स्वारी' करायला धाडले! दुसऱ्या एका प्रसंगी त्याचे दुसरे मानसपुत्र ज्वालामुखीच्या विवरात उतरले आणि त्यांनी 'पाताळलोकची अद्भुत यात्रा' केली!

पण ज्यूल व्हर्नची लेखणी अशा आगळ्यावेगळ्या वैज्ञानिक कादंबऱ्यातच रमायची असे मात्र नाही. त्याच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांची कथानके काल्पनिक असली तरी त्यातले वास्तववादी प्रसंगही इतके अद्भुत आहेत की 'बादशाही जासूद' आणि 'एका चिन्याचा जमालगोटा' वाचायला घेतलात की अखेर गाठीपर्यंत पुस्तक हातचे सोडवत नाही!

संच पहिला : १.कॅप्टन ग्रँट तुम्ही कुठे आहात? २.गिरिशिखराचे गुपित ३.हवाई हुकुमशहा ४.कंपनी चालली सूर्याकडे! ५.धूमकेतूच्या शेपटावर
संच दुसरा : १.चंद्रावर स्वारी २.पाताळलोकची अद्भुत यात्रा ३.एका चिन्याचा जमालगोटा ४.बादशाही जासूद ५.साता समुद्राचा सुलतान
संच तिसरा : १.निर्जन बेटावरचे धाडसीवीर २.अद्भुत व्यक्तीच्या शोधात धाडसी वीर ३.चला उत्तर ध्रुवाकडे! ४.बर्फ भूमीवरचे बहाद्दर ५.ध्रुवाने लावले वेड!
संच चौथा : १.ज्यूल व्हर्नची अद्भुत सृष्टी २.झपाटलेला प्रवासी ३.पोलादपूरचा रणराक्षस ४.तीन बलून बहाद्दर